Visit **Dwarkadheeshvastu.com** For

FREE **Vastu Consultancy, Music, Epics, Devotional Videos Educational Books, Educational Videos, Wallpapers**

****

All Music is also available in **CD** format. **CD Cover** can also be print with your Firm Name

****

We also provide this whole Music and Data in **PENDRIVE** and **EXTERNAL HARD DISK.**

Contact : Ankit Mishra (+91-8010381364, dwarkadheeshvastu@gmail.com)

RAM CHARIT MANAS

(MARATHI)

॥ श्रीहरि : ॥

श्रीरामचरितमानसची
विषय-सूची

अ० नं०	विषय	पृष्ठ-संख्या
१	नवाह्न पारायणाचे विश्राम स्थान	१०
२	मास पारायणाचे विश्राम स्थान	१०
३	पारायण-विधी	११
	बालकाण्ड	
४	मंगलाचरण	१
५	गुरु-वंदना	३
६	ब्राह्मण-संत-वंदना	४
७	खल-वंदना	६
८	संत-असंत-वंदना	७
९	रामस्वरूप मानून सर्व जीवांची वंदना	११
१०	तुलसीदासजींची दीनता आणि रामभक्तियुक्त कवितेचा महिमा	११
११	कवि-वंदना	१८
१२	वाल्मीकि, वेद, ब्रह्मदेव, देवता, शिव, पार्वती इत्यादींची वंदना	१९
१३	श्रीसीताराम-धाम-परिकर-वंदना	२१
१४	श्रीनाम-वंदना आणि नाम-महिमा	२४
१५	श्रीरामगुण आणि श्रीरामचरित्राचे माहात्म्य	३२
१६	मानस निर्माणची तिथी	३९
१७	मानसचे रूपक आणि माहात्म्य	४०
१८	याज्ञवल्क्य-भरद्वाज-संवाद तसेच प्रयाग माहात्म्य	४८
१९	सतीचा भ्रम, श्रीरामचंद्रजींचे ऐश्वर्य आणि सतीचा खेद	५१
२०	शिवजीद्वारा सतीचा त्याग, शिवजींची समाधी	५९
२१	सतीचे दक्ष-यज्ञाकरीता जाणे	६२
२२	पतीच्या अपमानाने दु:खी होऊन सतीचे योगाग्निने जाळून घेणे, दक्ष-यज्ञ-विध्वंस	६५
२३	पार्वतीचा जन्म आणि तपश्चर्या	६५
२४	श्रीरामचंद्रजींचा शंकरांना विवाहासाठी अनुरोध	७४
२५	सप्तऋषिंच्या परीक्षेत पार्वतीजींचे महत्त्व	७५
२६	कामदेवाचे देवकार्यासाठी जाणे आणि भस्म होणे	७९
२७	रतीला वरदान	८४
२८	देवतांकडून शंकरांना विवाहासाठी प्रार्थना, सप्तऋषिंचे पार्वतीजवळ जाणे	८५
२९	शंकरांची विचित्र वरात आणि विवाहाची तयारी	८७
३०	शंकरांचा विवाह	९६
३१	शिव-पार्वती-संवाद	१०२
३२	अवताराची कारणे	११३
३३	नारदांचा अभिमान आणि मायेचा प्रभाव	११७
३४	विश्वमोहिनीचे स्वयंवर, शिवगणांना तसेच भगवंतांना शाप आणि नारदांचा मोहभंग	१२१
३५	मनु-शतरूपा यांचे तप आणि वरदान	१३०
३६	प्रतापभानुची कथा	१३८
३७	रावण इत्यादींचा जन्म, तपश्चर्या आणि त्यांचे ऐश्वर्य तसेच अत्याचार	१५६
३८	पृथ्वी आणि देवता इत्यादींची आर्त प्रार्थना	१६४
३९	भगवंताचे वरदान	१६७
४०	राजा दशरथजींचा पुत्रेष्टी-यज्ञ, राण्यांचे गर्भवती होणे	१६८
४१	श्रीभगवंताचे प्राकट्य आणि बाळलीलेचा आनंद	१७१
४२	विश्वामित्रजींची राजा दशरथजीकडे राम-लक्ष्मणाची मागणी	१८३
४३	विश्वामित्रजींच्या यज्ञाचे रक्षण	१८६
४४	अहिल्या-उद्धार	१८७
४५	विश्वामित्रजींचा श्रीराम-लक्ष्मणासह जनकपुरात प्रवेश	१९०
४६	श्रीराम-लक्ष्मणाला पाहून जनकजींची प्रेम-मुग्धता	१९२
४७	श्रीराम-लक्ष्मणाचे जनकपुर निरीक्षण	१९५
४८	पुष्पवाटिका-निरीक्षण, सीताजींचे प्रथमदर्शन, सीतारामजींचे परस्परदर्शन	२०१
४९	श्रीसीताजींचे पार्वतीपूजन आणि वरदान-प्राप्ती तसेच राम-लक्ष्मण-संवाद	२०८

अ० नं०	विषय	पृष्ठ-संख्या
५०	श्रीराम-लक्ष्मणासह विश्वामित्रजींचा यज्ञशाळेत प्रवेश	२१२
५१	श्रीसीताजींचा यज्ञशाळेत प्रवेश	२१८
५२	बंदीजनाद्वारा जनक प्रतिज्ञेची घोषणा	२२१
५३	राजे लोकाकडून धनुष्य न उचलणे जनकजींची निराशाजनक वाणी	२२२
५४	श्रीलक्ष्मणजींचा क्रोध	२२३
५५	धनुष्य-भंग	२३०
५६	जयमाला घालणे	२३२
५७	श्रीराम-लक्ष्मण आणि परशुराम-संवाद	२३६
५८	दशरथजींकडे जनकजींचे दूत पाठवणे, अयोध्येहून वरातीचे प्रस्थान	२५१
५९	वरातीचे जनकपुरात आगमन आणि स्वागत इत्यादी	२६५
६०	श्रीसीता-राम-विवाह	२७४
६१	वरातीचे अयोध्येला परतणे आणि अयोध्येत आनंद	२९६
६२	श्रीरामचरित्र ऐकणे-गाणे ह्याचे माहात्म्य	३१८

अयोध्याकाण्ड

अ० नं०	विषय	पृष्ठ-संख्या
६३	मंगलाचरण	३१९
६४	रामराज्याभिषेकाची तयारी, देवतांची व्याकुळता तसेच त्यांची सरस्वतीस प्रार्थना	३२०
६५	सरस्वतीकडून मंथरेची बुद्धी फिरविणे, कैकेयी-मंथरा-संवाद	३२९
६६	कैकेयीचे कोपभवनात जाणे	३३८
६७	दशरथ-कैकेयी-संवाद आणि दशरथजींचा शोक, सुमंत्राचे महालात जाणे आणि तेथून येऊन श्रीरामचंद्रजींना महालात पाठवणे	३३९
६८	श्रीराम-कैकेयी-संवाद	३५२
६९	श्रीराम-दशरथ-संवाद, अयोध्यावासी यांचा विषाद, कैकेयीला समजाविणे	३५५
७०	श्रीराम-कौसल्या-संवाद	३६२
७१	श्रीसीता-राम-संवाद	३६९
७२	श्रीराम-कौसल्या-सीता-संवाद	३७२
७३	श्रीराम-लक्ष्मण-संवाद	३७६
७४	श्रीलक्ष्मण-सुमित्रा-संवाद	३७८
७५	श्रीरामजी, लक्ष्मणजी, सीतामाई यांचे दशरथजींकडे निरोप घेण्यासाठी येणे आणि दशरथजींचे सीताजीला समजावणे	३८१
७६	श्रीराम-सीता-लक्ष्मणाचे वनगमन आणि नगर-निवासीयांना झोपेतच सोडून पुढे जाणे	३८४
७७	श्रीरामजींचे शृंगवेरपुरला पोहचणे, निषाद-द्वारा सेवा	३९०
७८	लक्ष्मण-निषाद-संवाद, श्रीराम-सीतेशी सुमंत्राचा-संवाद, सुमंत्राचे परतणे	३९२
७९	केवटाचे प्रेम आणि गंगापार होणे	४००
८०	प्रयागला पोहचणे, श्रीराम-भरद्वाज-संवाद, यमुनेच्या तीरावरील रहिवाशांचे प्रेम	४०४
८१	तापस-प्रकरण	४०९
८२	यमुनेला प्रणाम, वनवासी लोकांचे प्रेम	४१०
८३	श्रीराम-वाल्मिकी-संवाद	४२०
८४	चित्रकूट येथे निवास, कोळी-भिल्लाद्वारा सेवा	४२७
८५	सुमंत्राचे अयोध्येला परतणे आणि सर्वत्र शोक पाहणे	४३५
८६	दशरथ-सुमंत्र-संवाद, दशरथ-मरण	४४०
८७	वसिष्ठमुनींचे भरतजीला बोलाविण्यासाठी दूत पाठविणे	४४२
८८	श्रीभरत आणि शत्रुघ्नाचे आगमन आणि शोक	४४८
८९	भरत-कौसल्या-संवाद आणि दशरथजींची अंत्येष्टी-क्रिया	४५२
९०	वसिष्ठ-भरत-संवाद, श्रीरामजींना आणण्यासाठी चित्रकूटला जाण्याची तयारी	४५८
९१	अयोध्यावासींसह श्रीभरत-शत्रुघ्न इत्यादींचे वनगमन	४६९
९२	निषादाची शंका आणि सावधानी	४७२
९३	भरत-निषाद भेट आणि संवाद, भरत तसेच नगर निवासीयांचे प्रेम	४७५
९४	भरताचे प्रयागला जाणे आणि भरत-भरद्वाज-संवाद	४८४
९५	भरद्वाजद्वारा भरताचा सत्कार	४९२
९६	इंद्र-बृहस्पती-संवाद	४९६
९७	भरत चित्रकूटाच्या मार्गात	४९९
९८	श्रीसीतादेवीचे स्वप्न, श्रीरामरायांना कोळी भिल्लाद्वारा भरताच्या आगमनाची सूचना, रामजींचाशोक, लक्ष्मणजींचा क्रोध	५०३
९९	श्रीरामजींचे लक्ष्मणजींना समजाविणे आणि भरतजींची महिमा सांगणे	५०७
१००	भरतजींचे मंदाकिनी स्नान, चित्रकूटला	

अ०नं०	विषय	पृष्ठ-संख्या
	पोहचणे, भरत इत्यादींच्या सर्वांशी परस्पर भेटी, पित्याविषयी शोक आणि श्राद्ध....	५०९
१०१	वनवासीलोकांकडून भरतजींच्या परिवाराचा सत्कार, कैकेयीचा पश्चात्ताप	५२२
१०२	श्रीवसिष्ठजींचे भाषण	५२६
१०३	श्रीराम-भरत इत्यादींचा संवाद.....	५३१
१०४	जनकजींचे पोहचणे, कोळी-भिल्लांची भेट, सर्वांचे परस्पर भेटणे	५३९
१०५	कौसल्या-सुनयना संवाद, श्रीसीताजींचे शील	५४८
१०६	जनक-सुनयना संवाद, भरतजींचा महिमा .	५५४
१०७	जनक-वसिष्ठ इत्यादींचा संवाद, इंद्राला चिंता, सरस्वतीचे इंद्राला समजाविणे	५५७
१०८	श्रीराम-भरत संवाद	५६२
१०९	भरतजींकडून तीर्थजल स्थापना तसेच चित्रकूट भ्रमण	५७२
११०	श्रीराम-भरत संवाद, पादुकाप्रदान, भरतजींना निरोप	५७४
१११	भरतजींचे अयोध्येला पोहचणे, भरतजींकडून पादुकांची स्थापना, नंदीग्रामात निवास आणि भरतजींच्या चरित्र श्रवणाचा महिमा	५८५
	अरण्यकाण्ड	
११२	मंगलाचरण	५८७
११३	जयंताचा कुटिलपणा आणि फलप्राप्ती.....	५८८
११४	अत्रिभेट तसेच स्तुती	५९०
११५	श्रीसीता-अनसूया भेट आणि अनुसूयाकडून सीतामाईस पातिव्रत्य धर्माचा उपदेश	५९३
११६	श्रीरामचंद्रजींचे पुढे प्रस्थान, विराधवध आणि शरभंग प्रसंग	५९६
११७	राक्षसवधाची प्रतिज्ञा करणे	५९८
११८	सुतीक्ष्णजींचे प्रेम, अगस्त्यभेट, अगस्त्य संवाद, रामजींचा दंडकवनात प्रवेश आणि जटायू भेट	५९८
११९	पंचवटीनिवास आणि श्रीराम-लक्ष्मण संवाद ...	६०६
१२०	शूर्पणखेची कथा, शूर्पणखेचे खर दूषणाजवळ जाणे आणि खर दूषणादीचा वध ..	६०९
१२१	शूर्पणखेचे रावणाजवळ जाणे, श्रीसीताजींचा अग्निप्रवेश आणि छायारूप सीता	६१६
१२२	मारीच प्रसंग आणि स्वर्णमृगरूपात मारीचाचा वध	६२०
१२३	श्रीसीताहरण आणि श्रीसीता विलाप.....	६२५
१२४	जटायू-रावण युद्ध	६२६
१२५	श्रीरामरायाचा विलाप, जटायू प्रसंग	६२७
१२६	कबन्ध उद्धार	६३१
१२७	शबरीवर कृपा नवविधा भक्तीचा उपदेश आणि पंपा सरोवराकडे प्रस्थान	६३२
१२८	नारद-राम संवाद	६४०
१२९	संतांची लक्षणे आणि सत्संग-भजनासाठी प्रेरक	६४३
	किष्किन्धाकाण्ड	
१३०	मंगलाचरण	६४६
१३१	श्रीरामचंद्रांची हनुमंताची भेट आणि श्रीराम-सुग्रीव यांची मित्रता	६४८
१३२	सुग्रीवाचे दुःख ऐकविणे, वालीवधाची प्रतिज्ञा, श्रीरामजीकडून मित्र लक्षण-वर्णन.	६५२
१३३	सुग्रीवाचे वैराग्य	६५५
१३४	वाली-सुग्रीव युद्ध, वाली उद्धार	६५६
१३५	तारेचा विलाप, तारेला श्रीरामजीकडून उपदेश, सुग्रीवाचा राज्याभिषेक तसेच अंगदास युवराज पद	६५९
१३६	वर्षाऋतू वर्णन	६६१
१३७	शरद्ऋतू वर्णन	६६४
१३८	श्रीरामजींची सुग्रीवावर नाराजी, लक्ष्मणजींचा कोप.....	६६६
१३९	सुग्रीव-राम संवाद, सीतामाईच्या शोधासाठी वानरांचे प्रस्थान	६६८
१४०	गुहेत तपस्विनीचे दर्शन.....	६७१
१४१	वानरांचे समुद्रतटावर येणे, संपातीशी भेट आणि वार्तालाप	६७२
१४२	समुद्रउल्लंघनाविषयी परामर्श, जांबवंताचे हनुमंतजींना स्वबळाचे स्मरण करवून उत्साहित करणे	६७६
१४३	श्रीरामगुणाचे माहात्म्य	६७७
	सुन्दरकाण्ड	
१४४	मंगलाचरण	६७९
१४५	हनुमंतजींचे लंकेकडे प्रस्थान, सुरसेची भेट, सावली पकडणाऱ्या राक्षसीचावध	६८०
१४६	लंकावर्णन, लंकिनीवर प्रहार, लंकेत प्रवेश.....	६८२
१४७	हनुमंत बिभीषण संवाद.....	६८५
१४८	हनुमंतजींचे अशोक वाटिकेत सीतामाईला पाहून दुःखी होणे आणि रावणाचे	

अ०नं०	विषय	पृष्ठ-संख्या
	सीतामाईला भीती दाखविणे	६८७
१४९	श्रीसीता-त्रिजटा संवाद	६९०
१५०	श्रीसीता-हनुमान संवाद	६९१
१५१	हनुमंताकडून अशोक वाटिकेचा विध्वंस, अक्षयकुमार वध आणि मेघनादाचे हनुमंतजींना नागपाशात बांधून सभेत घेऊन जाणे	६९६
१५२	हनुमान-रावण संवाद	६९८
१५३	लंका दहन	७०२
१५४	लंका दहनानंतर हनुमंतजींचे सीतामाईकडे निरोप मागणे आणि चूडामणी घेणे	७०४
१५५	समुद्राच्या अलीकडे येणे, सर्वांचे परतणे, मधुवन प्रवेश, सुग्रीवाची भेट, श्रीराम-हनुमान संवाद	७०५
१५६	श्रीरामजींचे वानर सेना घेऊन समुद्र-तटावर पोहोचणे	७१०
१५७	मंदोदरी-रावण संवाद	७१२
१५८	रावणाला बिभीषणाचे समजाविणे आणि बिभीषणाचा अपमान	७१४
१५९	बिभीषणाचे भगवान् श्रीरामरायांना शरण जाण्यासाठी प्रस्थान आणि शरण-प्राप्ती	७१७
१६०	समुद्रपार होण्यासाठी विचार विनिमय रावण-दूत शुकाचे आगमन आणि लक्ष्मण-जींचे पत्र घेऊन दूताचे परतणे	७२४
१६१	दूताचे रावणाला समजाविणे आणि लक्ष्मण-जींचे पत्र देणे	७२७
१६२	श्रीरामप्रभूंचा समुद्रावर क्रोध आणि समुद्राकडून प्रार्थना	७३१
१६३	श्रीरामगुणगायनाचे माहात्म्य	७३३
	लंकाकाण्ड	
१६४	मंगलाचरण	७३५
१६५	नल-नीलद्वारा पूल बांधणे, श्रीरामप्रभूंच्या द्वारा श्रीरामेश्वराची स्थापना	७३७
१६६	श्रीरामजींचे सेनेसह समुद्र पार करणे, सुबेल पर्वतावर निवास, रावणाची व्याकुळता	७४०
१६७	मंदोदरीचे रावणाला समजाविणे, रावण-प्रहस्त संवाद	७४१
१६८	सुबेल पर्वतावर श्रीरामजींचे स्वरूप आणि चंद्रोदय वर्णन	७४५
१६९	श्रीरामजींच्या बाणाने रावणाच्या मुकुट छत्रादीचे खालीपडणे	७४८
१७०	मंदोदरीचे पुन्हा रावणाला समजाविणे आणि श्रीरामप्रभूंची महती सांगणे	७४९
१७१	अंगदजींचे लंकेला जाणे आणि रावणाच्या सभेत अंगद-रावण संवाद	७५१
१७२	रावणाला पुन्हा मंदोदरीचे समजाविणे	७७०
१७३	अंगद-राम संवाद	७७२
१७४	युद्धारंभ	७७४
१७५	माल्यवानाचे रावणाला समजाविणे	७८१
१७६	लक्ष्मण-मेघनाद युद्ध, लक्ष्मणजींना शक्ती लागणे	७८३
१७७	हनुमंताचे सुषेण वैद्याला आणणे आणि संजीवनीसाठी जाणे, कालनेमी-रावण संवाद, मगरीचा उद्धार, कालनेमी उद्धार	७८८
१७८	भरतजींच्या बाणाने हनुमंतांचे मुर्च्छित होणे, भरत-हनुमान संवाद	७९०
१७९	श्रीरामजींची विलापलीला, हनुमंतांचे परतणे, लक्ष्मणजींचे शुद्धीवर येणे	७९२
१८०	रावणाचे कुंभकर्णाला जागवणे, कुंभ-कर्णाचा रावणाला उपदेश आणि बिभीषण-कुंभकर्ण संवाद	७९४
१८१	कुंभकर्ण-युद्ध आणि त्याची परमगती	७९७
१८२	मेघनादाचे युद्ध, श्रीरामजीचे लीलेने नागपाशात बांधून घेणे	८०४
१८३	मेघनाद यज्ञ विध्वंस, युद्ध आणि मेघनाद उद्धार	८०८
१८४	रावणाचे युद्धासाठी प्रस्थान श्रीरामरायांचा विजयरथ तसेच वानर-राक्षसांचे युद्ध	८१०
१८५	लक्ष्मण-रावण युद्ध	८१६
१८६	रावण-मूर्छा, रावण-यज्ञ-विध्वंस, राम-रावण युद्ध	८१८
१८७	इंद्राचे श्रीरामप्रभूंसाठी रथ पाठविणे, राम-रावण युद्ध	८२३
१८८	रावणाचे बिभीषणावर शक्ती सोडणे, श्रीरामजींचे शक्तीला आपल्यावर घेणे, बिभीषण-रावण युद्ध	७२९
१८९	रावण-हनुमान युद्ध, रावणाचे माया रचणे, श्रीरामजींद्वारा मायेचा नाश	८३०
१९०	घोर युद्ध, रावणाची मूर्छा	८३३
१९१	त्रिजटा-सीता संवाद	८३५

अ० नं०	विषय	पृष्ठ-संख्या
१९२	राम-रावण-युद्ध, रावण-वध, सर्वत्र जयध्वनी	८३७
१९३	मंदोदरी-विलाप, रावणाची अंत्येष्टी-क्रिया .	८४३
१९४	विभीषणाचा राज्याभिषेक	८४५
१९५	हनुमंतजींचे सीतामातेला कुशल ऐकविणे, सीतामातेचे आगमन आणि अग्नि-परीक्षा...	८४६
१९६	देवतांची स्तुती, इंद्राची अमृतवर्षा	८५०
१९७	विभीषणाची प्रार्थना, श्रीरामजींद्वारा भरत-जींच्या प्रेमदशेचे वर्णन, अयोध्येला शीघ्र पोहोचण्याचा अनुरोध	८५७
१९८	विभीषणाचे वस्त्राभूषणाचा वर्षाव करणे आणि वानर अस्वलांचे ते परिधान करणे .	८५९
१९९	पुष्पक विमानावर बसून श्रीसीता-रामांचे अयोध्येसाठी प्रस्थान	८६०
२००	श्रीरामचरिताची महती	८६४
	उत्तरकाण्ड	
२०१	मंगलाचरण	८६५
२०२	भरत-विरह, तसेच भरत-हनुमान भेट, अयोध्येत आनंद.....	८६६
२०३	श्रीरामप्रभूंचे स्वागत, भरतभेट, सर्वांचा मिलनानन्द	८७२
२०४	राम-राज्याभिषेक, वेदस्तुती, शिवस्तुती.....	८७८
२०५	वानरांना आणि निषादाला निरोप	८८५
२०६	रामराज्याचे वर्णन	८९०
२०७	पुत्रोत्पत्ती, अयोध्येची रमणीयता, सनकादींचे आगमन आणि संवाद	८९४
२०८	हनुमंतद्वारा भरतजींचा प्रश्न आणि श्रीरामजींचा उपदेश	९०४
२०९	श्रीरामचंद्रांचा प्रजेला उपदेश (श्रीराम-गीता), नगरवासी लोकांची कृतज्ञता.....	९१०
२१०	श्रीराम-वसिष्ठ-संवाद, श्रीरामजींचे भावासह आमराईत जाणे	९१४
२११	नारदांचे आगमन आणि स्तुती करून ब्रह्मलोकात परतणे.....	९१६
२१२	शिव-पार्वती-संवाद, गरुडमोह गरुडजींचे काकभुशुंडींकडून रामकथा आणि राम-महती ऐकणे.....	९१७
२१३	काकभुशुंडींचे स्वत:ची पूर्व जन्मकथा आणि कलिमाहात्म्य सांगणे	९३७
२१४	गुरुजींचा अपमान तसेच शंकरांचा शाप ह्याचे वर्णन ऐकणे.....	९६८
२१५	रुद्राष्टक.....	९६९
२१६	गुरुजींकडून शंकरांकडे अपराध-क्षमा याचना आणि शापानुग्रह आणि काकभुशुंडींची पुढील कथा.....	९७१
२१७	काकभुशुंडींचे लोमशजींकडे जाणे आणि शाप व अनुग्रह मिळणे	९७४
२१८	ज्ञान-भक्ति-निरूपण, ज्ञानदीपक आणि भक्तीचा महान महिमा	९८२
२१९	गरुडजींचे सात प्रश्न आणि काकभुशुंडी-कडून उत्तरे	९९०
२२०	भजन-महिमा.....	९९५
२२१	रामायण-माहात्म्य, तुलसीविनय आणि फलश्रुति	१००४
२२२	गोस्वामी तुलसीदासांचे संक्षिप्त जीवन-चरित्र	१००५
२२३	श्रीरामशलाका-प्रश्नावली	१००८
२२४	जानकीनाथाची आणि रामायणाची आरती..	१०१०

नवान्ह पारायणाचे विश्राम स्थान

				पृष्ठ					पृष्ठ
पहिला	विश्राम	.....	.....	११३	सहावा	विश्राम	.....	.....	६२७
दुसरा	,,	.....	.....	२१२	सातवा	,,	.....	.....	७४७
तीसरा	,,	.....	.....	३१५	आठवा	,,	.....	.....	८७८
चौथा	,,	.....	.....	४१४	नववा	,,	.....	.....	१००४
पाचवा	,,	.....	.....	५१२					

मास पारायणाचे विश्राम स्थान

				पृष्ठ					पृष्ठ
पहिला	विश्राम	.....	.....	३०	सोळावा	विश्राम	.....	.....	४१४
दुसरा	,,	.....	.....	५८	सतरावा	,,	.....	.....	४२८
तीसरा	,,	.....	.....	८५	अठरावा	,,	.....	.....	४६२
चौथा	,,	.....	.....	११३	एकोणीसावा	,,	.....	.....	४९४
पाचवा	,,	.....	.....	१३८	वीसावा	,,	.....	.....	५१२
सहावा	,,	.....	.....	१६३	एकवीसावा	,,	.....	.....	५८५
सातवा	,,	.....	.....	१८९	बावीसावा	,,	.....	.....	६४५
आठवा	,,	.....	.....	२१२	तेवीसावा	,,	.....	.....	६७८
नववा	,,	.....	.....	२३८	चोवीसावा	,,	.....	.....	७३३
दहावा	,,	.....	.....	२६५	पंचवीसावा	,,	.....	.....	७८२
अकरावा	,,	.....	.....	२८९	सव्वीसावा	,,	.....	.....	८३५
बारावा	,,	.....	.....	३१८	सत्तावीसावा	,,	.....	.....	८६४
तेरावा	,,	.....	.....	३४२	अट्ठावीसावा	,,	.....	.....	९२६
चौदावा	,,	.....	.....	३६९	एकोणतीसावा	,,	.....	.....	९८१
पंधरावा	,,	.....	.....	३९५	तीसावा	,,	.....	.....	१००४

॥ श्रीहरिः ॥

पारायण-विधी

श्रीरामचरितमानसचा विधिपूर्वक पाठ करणाऱ्या महानुभावांनी पाठ आरंभ करण्यापूर्वी श्रीतुलसीदासजी, श्रीवाल्मिकजी, श्री शिवजी तसेच श्रीहनुमंतांचे आवाहन-पूजन करून त्यानंतर तिन्ही भावांसह श्रीसीतारामचंद्रांचे आवाहन, शोडषोपचार पूजन आणि ध्यान करावे. त्यानंतर पाठाला आरंभ करावा. सर्वांचे आवाहन-पूजन आणि ध्यानाचे मंत्र क्रमशः खाली दिले गेले आहेत.

अथ आवाहनमन्त्रः

तुलसीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुचिव्रत।
नैर्ऋत्य उपविश्येदं पूजनं प्रतिगृह्यताम्॥ १॥

ॐ तुलसीदासाय नमः

श्रीवाल्मीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुभप्रद।
उत्तरपूर्वयोर्मध्ये तिष्ठ गृह्णीष्व मेऽर्चनम्॥ २॥

ॐ वाल्मीकाय नमः

गौरीपते नमस्तुभ्यमिहागच्छ महेश्वर।
पूर्वदक्षिणयोर्मध्ये तिष्ठ पूजां गृहाण मे॥ ३॥

ॐ गौरीपतये नमः

श्रीलक्ष्मण नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।
याम्यभागे समातिष्ठ पूजनं संगृहाण मे॥ ४॥

ॐ श्रीसपत्नीकाय लक्ष्मणाय नमः

श्रीशत्रुघ्न नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।
पीठस्य पश्चिमे भागे पूजनं स्वीकुरुष्व मे॥ ५॥

ॐ श्रीसपत्नीकाय शत्रुघ्नाय नमः

श्रीभरत नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।
पीठकस्योत्तरे भागे तिष्ठ पूजां गृहाण मे॥ ६॥

ॐ श्रीसपत्नीकाय भरताय नमः

श्रीहनुमन्नमस्तुभ्यमिहागच्छ कृपानिधे।
पूर्वभागे समातिष्ठ पूजनं स्वीकुरु प्रभो॥ ७॥

ॐ हनुमते नमः

अथ प्रधानपूजा च कर्तव्या विधिपूर्वकम्।
पुष्पाञ्जलिं गृहीत्वा तु ध्यानं कुर्यात्परस्य च॥ ८॥

रक्ताम्भोजदलाभिरामनयनं पीताम्बरालङ्कृतं
श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतया शोभितम्।

कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भ्रात्रादिभिर्भावितं
वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्टसिद्धिप्रदम्॥ ९ ॥
आगच्छ जानकीनाथ जानक्या सह राघव।
गृहाण मम पूजां च वायुपुत्रादिभिर्युतः॥ १० ॥

इत्यावाहनम्

सुवर्णरचितं राम दिव्यास्तरणशोभितम्।
आसनं हि मया दत्तं गृहाण मणिचित्रितम्॥ ११ ॥

इति षोडशोपचारैः पूजयेत्

ॐ अस्य श्रीमन्मानसरामायणश्रीरामचरितस्य श्रीशिवकाकभुशुण्डियाज्ञवल्क्यगोस्वामितुलसीदासा ऋषयः श्रीसीतारामो देवता श्रीरामनाम बीजं भवरोगहरी भक्तिः शक्तिः मम नियन्त्रिताशेषविघ्नतया श्रीसीतारामप्रीतिपूर्वकसकलमनोरथसिद्ध्यर्थं पाठे विनियोगः।

अथ आचमनम्

श्रीसीतारामाभ्यां नमः। श्रीरामचन्द्राय नमः। श्रीरामभद्राय नमः।
इति मन्त्रत्रितयेन आचमनं कुर्यात्। श्रीयुगलबीजमन्त्रेण प्राणायामं कुर्यात्॥

अथ करन्यासः

जग मंगल गुन ग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के॥
अङ्गुष्ठाभ्यां नमः

राम राम कहि जे जमुहाहीं। तिन्हहि न पापपुंज समुहाहीं॥
तर्जनीभ्यां नमः

राम सकल नामन्ह ते अधिका। होउ नाथ अघ खग गन बधिका॥
मध्यमाभ्यां नमः

उमा दारु जोषित की नाईं। सबहि नचावत रामु गोसाईं॥
अनामिकाभ्यां नमः

सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥
कनिष्ठिकाभ्यां नमः

मामभिरक्षय रघुकुलनायक। धृत बर चाप रुचिर कर सायक॥
करतलकरपृष्ठाभ्यां नमः

इति करन्यासः

अथ हृदयादिन्यासः

जग मंगल गुन ग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के॥
हृदयाय नमः

राम राम कहि जे जमुहाहीं। तिन्हहि न पापपुंज समुहाहीं॥

मायामुक्त नारदजी

तब मुनि अति सभीत हरि चरना।
गहे पाहि प्रनतारति हरना॥

मायामुक्त नारदजी

तब मुनि अति सभीत हरि चरना।
गहे पाहि प्रनतारति हरना॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीजानकीवल्लभो विजयते

श्रीरामचरितमानस

प्रथम सोपान

बालकाण्ड

श्लोक

वर्णानामर्थसंघानां रसानां छन्दसामपि।
मङ्गलानां च कर्त्तारौ वन्दे वाणीविनायकौ॥ १॥

अक्षरे, अर्थसमूह, रस, छन्द आणि मंगल करणाऱ्या सरस्वती आणि गणेश ह्यांना मी वंदन करतो॥ १॥

भवानीशङ्करौ वन्दे श्रद्धाविश्वासरूपिणौ।
याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरम्॥ २॥

ज्यांच्याविना सिद्धजन आपल्या अंतःकरणात स्थित असलेल्या ईश्वराला पाहू शकत नाहीत अशा श्रद्धा आणि विश्वासस्वरूपी पार्वती आणि शंकरांना मी वंदन करतो॥ २॥

वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कररूपिणम्।
यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते॥ ३॥

ज्यांच्या आश्रित असल्याने वाकडा असलेला चंद्रमासुद्धा सर्वत्र वंदनीय होतो अशा ज्ञानमय, नित्य शंकररूपी गुरूंना मी वंदन करतो.॥ ३॥

सीतारामगुणग्रामपुण्यारण्यविहारिणौ।
वन्दे विशुद्धविज्ञानौ कवीश्वरकपीश्वरौ॥ ४॥

श्रीसीतारामचंद्रांच्या गुणसमूहरूपी पवित्र वनात विहार करणाऱ्या, विशुद्ध विज्ञानसंपन्न कविश्वर श्रीवाल्मिकांना आणि कपिश्वर श्रीहनुमंतांना मी वंदन करतो.॥ ४॥

उद्भवस्थितिसंहारकारिणीं क्लेशहारिणीम्।
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम्॥ ५॥

उत्पत्ती, स्थिती (पालन) आणि संहार करणाऱ्या, क्लेश हरण करणाऱ्या तसेच संपूर्ण कल्याण करणाऱ्या श्रीरामचंद्रांची प्रियतमा असणाऱ्या श्रीसीतेला मी नमस्कार करतो.॥ ५॥

यन्मायावशवर्त्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवासुरा
यत्सत्त्वादमृषैव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः।
यत्पादप्लवमेकमेव हि भवाम्भोधेस्तितीर्षावतां
वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम्॥ ६॥

संपूर्ण विश्व, ब्रह्मादी देवता आणि असुर ज्यांच्या मायेने वशीभूत आहेत, ज्यांच्या सत्तेने दोरीवर सर्पाचा भास व्हावा त्याप्रमाणे सारे दृश्य-जगत् सत्यच प्रतीत होते आणि ज्याचे केवळ चरण हेच भवसागरातून तरुण जाणाऱ्या इच्छुकासाठी एकमेव नौका आहे, अशा संपूर्ण कारणांहून अतीत (संपूर्ण कारणांचे कारण आणि सर्वांहून श्रेष्ठ) असणाऱ्या राम म्हणविणाऱ्या भगवान् श्रीहरिंना मी वंदन करतो.॥ ६॥

नानापुराणनिगमागमसम्मतं यद्
रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि।
स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा-
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ॥ ७॥

अनेक पुराणे, वेद आणि शास्त्र (तंत्र) सम्मत जे रामायणात वर्णन आले आहे आणि काही इतरत्र उपलब्ध असलेल्या श्रीरघुनाथांच्या कथांना तुलसीदास स्वतःच्या अंतःकरणातील सुखासाठी अत्यंत मनोहर भाषेत विस्तृत करत आहे.॥ ७॥

सो०— जो सुमिरत सिधि होइ गन नायक करिबर बदन।
करउ अनुग्रह सोइ बुद्धि रासि सुभ गुन सदन॥ १॥

ज्यांच्या स्मरणाने सर्व कार्य सिद्ध होतात, जे गणांचे स्वामी आहेत आणि ज्यांचे मुख हत्तीच्या मुखासारखे आहे, अशा बुद्धीची राशी आणि शुभ गुणांचे धाम असणाऱ्या गणेशांनी माझ्यावर कृपा करावी.॥ १॥

मूक होइ बाचाल पंगु चढ़इ गिरिबर गहन।
जासु कृपाँ सो दयाल द्रवउ सकल कलि मल दहन॥ २॥

ज्यांच्या कृपा प्रसादाने मुकाही सुंदर बोलणारा होतो आणि लंगडा-लुळासुद्धा पर्वतावर चढतो, अशा त्या कलियुगाच्या सर्व पापांना जाळणाऱ्या दयाळू भगवंताने माझ्यावर करुणा करावी. ॥ २ ॥

नील सरोरुह स्याम तरुन अरुन बारिज नयन।
करउ सो मम उर धाम सदा छीरसागर सयन॥ ३ ॥

निळ्या कमळासारखा ज्यांचा शाम वर्ण आहे, पूर्ण उमललेल्या लाल कमळासारखे ज्यांचे नेत्र आहेत आणि जे सदा क्षीरसागरात शयन करतात त्या भगवान् नारायणाने माझ्या हृदयात निवास करावा. ॥ ३ ॥

कुंद इंदु सम देह उमा रमन करुना अयन।
जाहि दीन पर नेह करउ कृपा मर्दन मयन॥ ४ ॥

ज्यांचे शरीर कुंदपुष्प आणि चंद्रमा यासारखे गौर वर्णाचे आहे, जे पार्वतीचे प्रियतम आणि दयेचे धाम आहेत तसेच ज्यांचा दीनावर स्नेह आहे व जे कामदेवाचे मर्दन करणारे आहेत अशा शंकरांनी माझ्यावर कृपा करावी. ॥ ४ ॥

बंदउँ गुरु पद कंज कृपा सिंधु नररूप हरि।
महामोह तम पुंज जासु बचन रबि कर निकर॥ ५ ॥

गुरुमहाराजांच्या चरणकमलाची मी वंदना करतो, जे कृपेचे सागर आणि नररूपात श्रीहरिच आहेत आणि ज्यांचे वचन महामोहरूपी दाट अंधाराचा नाश करण्यासाठी सूर्यकिरणांचा समूह आहे. ॥ ५ ॥

बंदउँ गुरु पद पदुम परागा। सुरुचि सुबास सरस अनुरागा॥
अमिअ मूरिमय चूरन चारू। समन सकल भव रुज परिवारू॥

गुरुमहाराजांच्या चरणकमलरजाची मी वंदना करतो, जे सुंदर, स्वाद, सुगंध तसेच अनुरागरूपी रसाने पूर्ण आहे. तसेच ते संजीवनी मुळीचे सुंदर चूर्ण आहे, जे संपूर्ण भवरोगाच्या परिवाराचा नाश करणारे आहे. ॥१ ॥

सुकृति संभु तन बिमल बिभूती। मंजुल मंगल मोद प्रसूती॥
जन मन मंजु मुकुर मल हरनी। किएँ तिलक गुन गन बस करनी॥

ती रज (माती) सुकृतिरूपी (पुण्यवान पुरुष) शंकरांच्या शरीरावरची सुशोभित निर्मळ विभूती आहे आणि सुंदर, कल्याण व आनंदाची जननी आहे, भक्ताच्या मनरूपी सुंदर दर्पणाचा मळ नाहीसा करणारी आणि कपाळी धारण केल्यास गुणांच्या समूहांना वश करणारी आहे. ॥२ ॥

श्रीगुर पद नख मनि गन जोती। सुमिरत दिब्य दृष्टि हियँ होती॥
दलन मोह तम सो सप्रकासू। बड़े भाग उर आवइ जासू॥

श्रीगुरुमहाराजांच्या नखांची ज्योती मण्यांच्या प्रकाशासारखी आहे, ज्याचे स्मरण करताच हृदयात

दिव्य दृष्टी उत्पन्न होते. तो प्रकाश अज्ञानरूपी अंध:काराचा नाश करणारा आहे, तो ज्याच्या हृदयामध्ये प्रगट होतो, तो मोठा भाग्यवान आहे. ॥ ३ ॥

उघरहिं बिमल बिलोचन ही के । मिटहिं दोष दुख भव रजनी के ॥
सूझहिं राम चरित मनि मानिक । गुपुत प्रगट जहँ जो जेहि खानिक ॥

तो प्रकाश त्याच्या हृदयात प्रकट होताच निर्मळ दृष्टी प्राप्त होते आणि संसाररूपी रात्रीचे दोष व दु:ख समाप्त होतात. तसेच श्रीरामचरित्ररूपी मणि आणि माणिक्य गुप्त आणि प्रगटरूपाने खाणीत जिथे असतात ते सर्व दिसू लागतात. ॥ ४ ॥

दो०—**जथा सुअंजन अंजि दृग साधक सिद्ध सुजान।**
कौतुक देखत सैल बन भूतल भूरि निधान॥ १ ॥

जसे साधक, सिद्ध आणि सुजाण सिद्धांजन डोळ्यात घालून पृथ्वीच्या पर्वताच्या, वनाच्या आतील बऱ्याच खाणी सहजतेने पाहतात. ॥ १ ॥ (१)

गुरु पद रज मृदु मंजुल अंजन। नयन अमिअ दृग दोष बिभंजन॥
तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन। बरनउँ राम चरित भव मोचन॥

श्रीगुरुमहाराजांची चरणरज ही कोमल आणि सुंदर नयनामृत अंजन आहे, जे नेत्रांच्या दोषांना नाश करणारे आहे. त्या अंजनाने विवेकरूपी नेत्रांना निर्मळ करून संसाररूपी बंधनातून मुक्त करणाऱ्या श्रीरामचरित्राचे मी वर्णन करतो. ॥ १ ॥

बंदउँ प्रथम महीसुर चरना। मोह जनित संसय सब हरना॥
सुजन समाज सकल गुन खानी। करउँ प्रनाम सप्रेम सुबानी॥

प्रथम पृथ्वीची देवता असणाऱ्या ब्राह्मणांच्या चरणांची मी वंदना करतो. अज्ञानजनित संदेहाचे हरण करणाऱ्या आणि सर्व गुणांची खाण असणाऱ्या संत समाजाला प्रेमयुक्त सुंदर वाणीद्वारा प्रणाम करतो. ॥ २ ॥

साधु चरित सुभ चरित कपासू। निरस बिसद गुनमय फल जासू॥
जो सहि दुख परछिद्र दुरावा। बंदनीय जेहिं जग जस पावा॥

ज्याचे फळ नीरस, विशद आणि गुणमय असते अशा कापसाच्या चरित्रासारखे संतांचे चरित्र स्वच्छ असते. (कापसाचे बोंड नीरस असते, संतांच्या जीवनातसुद्धा विषयासक्ती नसते म्हणून ते देखील नीरस असतात. कापूस उज्वल असतो, संतांचे हृदयसुद्धा अज्ञान आणि पापरूपी अंध:काररहित असते म्हणून ते विशाल असते. कापसात गुण (तंतू) असतात, तसे संतांचे चरित्रसुद्धा सद्गुणांचे भांडार असते म्हणून ते गुणमय असते. (जसा कापसाचा धागा सुईच्या छिद्राला आपल्या शरीराचे दान करून झाकून टाकतो अथवा जसा कापूस पिंजणे, सूत कातणे आणि विणणे हे कष्ट सहन करून सुद्धा वस्त्ररूपात परिणत होऊन दुसऱ्यांच्या गोपनीय स्थानांना झाकून टाकतो, त्याचप्रमाणे) संत स्वत:दु:ख सहन करून दुसऱ्यांच्या छिद्रांना (दोषांना) झाकून टाकतात त्यामुळे ते जगतात वंदनीय यश प्राप्त करतात. ॥ ३ ॥

मुद मंगलमय संत समाजू। जो जग जंगम तीरथराजू॥
राम भक्ति जहँ सुरसरि धारा। सरसइ ब्रह्म बिचार प्रचारा॥

संतांचा समाज आनंदी आणि कल्याणमय असतो, जो जगातील चालता-फिरता तीर्थराज (प्रयाग) आहे. त्यांचे ठिकाणी (त्या संतसमाजरूपी तीर्थराजामध्ये) रामभक्तिरूपी गंगेची धार असते आणि ब्रह्मविचाराचा प्रचार ही सरस्वती असते. ॥ ४ ॥

बिधि निषेधमय कलिमल हरनी। करम कथा रबिनंदनि बरनी॥
हरि हर कथा बिराजति बेनी। सुनत सकल मुद मंगल देनी॥

विधी आणि निषेधरूपी (हे करा आणि हे करू नका) कर्मांची कथा कलियुगाचे पाप हरण करणारी सूर्यपुत्री यमुना आहे आणि भगवान् विष्णु व शंकरांच्या कथा त्रिवेणीरूपाने सुशोभित आहेत, ज्याचे श्रवण होताच त्या सर्व आनंद देणाऱ्या आणि कल्याण करणाऱ्या आहेत. ॥ ५ ॥

बटु बिस्वास अचल निज धरमा। तीरथराज समाज सुकरमा॥
सबहि सुलभ सब दिन सब देसा। सेवत सादर समन कलेसा॥

(त्या संतसमाजरूपी प्रयागामध्ये) आपल्या धर्मावर जो अटळ विश्वास आहे हा अक्षय वट आहे आणि शुभ कर्म हाच त्या तीर्थराजाचा परिवार (परिकर) आहे. तो (संतसमाजरूपी प्रयागराज) सर्व देशात, सर्व काळात सर्वांना सहज प्राप्त होऊ शकतो आणि आदरपूर्वक सेवन केल्यास क्लेश नष्ट करणारा आहे. ॥ ६ ॥

अकथ अलौकिक तीरथराऊ। देइ सद्य फल प्रगट प्रभाऊ॥

तो तीर्थराज अलौकिक आणि अकथनीय आहे, तसेच तात्काळ फल देणारा आहे आणि त्याचा प्रभाव प्रत्यक्ष आहे. ॥ ७ ॥

दो०—**सुनि समुझहिं जन मुदित मन मज्जहिं अति अनुराग।**
लहहिं चारि फल अछत तनु साधु समाज प्रयाग॥ २ ॥

जी माणसे या संतसमाजरूपी तीर्थराजाचा प्रभाव प्रसन्न मनाने ऐकतात आणि स्वीकार करतात, तसेच त्यात प्रेमपूर्वक डुबकी मारतात, ते ह्या देहातच धर्म, अर्थ, काम, मोक्ष—चारही फल प्राप्त करतात. ॥ २ ॥

मज्जन फल पेखिअ ततकाला। काक होहिं पिक बकउ मराला॥
सुनि आचरज करै जनि कोई। सतसंगति महिमा नहिं गोई॥

या तीर्थराजामधील स्नानाचे तात्काळ मिळणारे फल असे दिसते की, कावळे कोकीळा बनतात आणि बगळे हंस बनतात. हे ऐकून कोणी आश्चर्य करू नये कारण सत्संगती महती झाकली जात नाही. ॥ १ ॥

बालमीक नारद घटजोनी। निज निज मुखनि कही निज होनी॥
जलचर थलचर नभचर नाना। जे जड़ चेतन जीव जहाना॥

वाल्मिक, नारद आणि अगस्ती यांनी स्वमुखाने आपला जीवन वृत्तांत सांगितला आहे. जलचर, स्थलचर, नभचर आणि नाना प्रकारचे जड-चेतन जेवढे या जगतात जीव आहेत, ॥ २ ॥

मति कीरति गति भूति भलाई । जब जेहिं जतन जहाँ जेहिं पाई ॥
सो जानब सतसंग प्रभाऊ । लोकहुँ बेद न आन उपाऊ ॥

त्यापैकी ज्याने, ज्यावेळी, जेथे, ज्या प्रयत्नाने बुद्धी, कीर्ती, सद्गती, विभूती (ऐश्वर्य) आणि महानता मिळविली आहे, तो सर्व सत्संगाचाच प्रभाव समजावा. वेदात आणि लोकात हे प्राप्त होण्यासाठी दुसरा कोणताही उपाय नाही. ॥ ३ ॥

बिनु सतसंग बिबेक न होई । राम कृपा बिनु सुलभ न सोई ॥
सतसंगत मुद मंगल मूला । सोइ फल सिधि सब साधन फूला ॥

सत्संगाशिवाय विवेक प्राप्त होत नाही आणि श्रीरामचंद्रांच्या कृपेशिवाय तो सत्संग सहज मिळत नाही. सत्संगती आनंद आणि कल्याणाचे मूळ आहे. सत्संगाची प्राप्ती हेच फल आहे आणि इतर सर्व साधने तर फुले आहेत. ॥ ४ ॥

सठ सुधरहिं सतसंगति पाई । पारस परस कुधात सुहाई ॥
बिधि बस सुजन कुसंगत परहीं । फनि मनि सम निज गुन अनुसरहीं ॥

जसे परीसाच्या स्पर्शाने लोखंड शोभायमान होते, (सुंदर सोने बनते) तसे दुष्टसुद्धा सत्संगती प्राप्त करून सुधरतात. परंतु जर दैवयोगाने कधी सज्जन कुसंगतीत सापडले तर तेथेही ते सर्पाच्या मण्याप्रमाणे आपल्या गुणांचेच अनुसरण करतात. (अर्थात् ज्याप्रमाणे सर्पाचा संसर्ग होऊन देखील मणी त्याच्या विषाला ग्रहण करत नाही. तसेच आपल्या स्वाभाविक असणाऱ्या गुणाला-प्रकाशाला टाकीत नाही. त्याप्रमाणे साधू पुरुष दुष्टांच्या संगतीत राहूनसुद्धा दुसऱ्यांना प्रकाशच देतात. दुष्टांचा त्यांच्यावर कोणताही प्रभाव पडत नाही) ॥ ५ ॥

बिधि हरि हर कबि कोबिद बानी । कहत साधु महिमा सकुचानी ॥
सो मो सन कहि जात न कैसें । साक बनिक मनि गुन गन जैसें ॥

ब्रह्मदेव, विष्णु, महादेव, कवी आणि पंडित सर्वांचीच वाणी संतमहिमा वर्णन करण्यात संकोचते. माझ्याकडूनही हा महिमा कोणत्याही प्रकारे वर्णन होऊ शकत नाही. कारण भाजी-पाला विकणारा मणी-रत्नांच्या गुणसमूहाचे काय वर्णन करणार? ॥ ६ ॥

दो०—**बंदउँ संत समान चित हित अनहित नहिं कोइ ।**
अंजलि गत सुभ सुमन जिमि सम सुगंध कर दोइ ॥ ३ (क) ॥

ज्यांच्या चित्तात समता आहे ज्यांचे कोणी मित्रही नाही आणि शत्रूही नाही अशा संतांना मी प्रणाम करतो. जसे ओंजळीत ठेवलेली फुले (ज्या हाताने फुले तोडली आहेत आणि ज्या हातात ती ठेवली आहेत त्या) दोन्हीही हातांना समानरूपाने सुगंधित करतात. (तसेच संत शत्रू आणि मित्र दोघांचेही समानरूपाने कल्याण करतात.) ॥ ३ ॥ क

संत सरल चित जगत हित जानि सुभाउ सनेहु।
बालबिनय सुनि करि कृपा राम चरन रति देहु॥ ३ (ख)॥

संत सरळ चित्ताचे आणि जगताचे हितकारी असतात. त्यांच्या अशा स्वभावाला आणि स्नेहाला जाणून मी नम्र होतो. माझ्या ह्या बालिश नम्रतेला पाहून त्यांनी मला श्रीरामचंद्रांच्या चरणांविषयी प्रीती प्रदान करावी. ॥३॥ ख

बहुरि बंदि खल गन सतिभाएँ। जे बिनु काज दाहिनेहु बाएँ॥
पर हित हानि लाभ जिन्ह केरें। उजरें हरष बिषाद बसेरें॥

मी वास्तविक भावाने दुष्टांना प्रणाम करतो, जे विनाकारण आपले हित करणाऱ्याशी सुद्धा प्रतिकूल आचरण करतात. तसेच दुसऱ्यांच्या हिताची हानी हीच ज्यांच्या दृष्टीत लाभ असते आणि ज्यांना दुसऱ्यांचा सत्यानाश होण्याने हर्ष आणि दुसऱ्यांचा उत्कर्ष होण्याने विषाद होतो. ॥ १ ॥

हरि हर जस राकेस राहु से। पर अकाज भट सहसबाहु से॥
जे पर दोष लखहिं सहसाखी। पर हित घृत जिन्ह के मन माखी॥

जे हरि आणि हर यांच्या यशरूपी पौर्णिमेच्या चंद्रमासाठी राहूसारखे आहेत (अर्थात् ज्या ज्या ठिकाणी भगवान् विष्णु अथवा शंकर यांच्या यशाचे वर्णन होते. त्यात ते बाधा करतात) आणि जे दुसऱ्यांचे वाईट करण्यात सहस्त्रबाहूसारखे वीर आहेत. जे दुसऱ्यांच्या दोषांना हजार नेत्रांनी पाहतात आणि दुसऱ्यांच्या हितरूपी तुपात जे माशीप्रमाणे काम करतात. (अर्थात् ज्याप्रमाणे माशी तुपात पडून तुपालाही खराब करते आणि स्वत:ही प्राणाला मुकते. त्याप्रमाणे दुष्ट लोक दुसऱ्यांच्या पूर्ण होत असलेल्या कामाला आपली स्वत:ची हानी पत्करूनही बिघडून टाकतात. ॥ २ ॥

तेज कृसानु रोष महिषेसा। अघ अवगुन धन धनी धनेसा॥
उदय केत सम हित सबही के। कुंभकरन सम सोवत नीके॥

जे तेजात (दुसऱ्यांना जाळण्यात) अग्निप्रमाणे आणि क्रोधात यमराजासारखे आहेत, पाप आणि अवगुणरूपी धनामध्ये कुबेरासारखे धनी आहेत. ज्यांचा उत्कर्ष सर्वांच्या हिताच्या नाशासाठी केतूसारखा (शेपटीचा तारा) आहे आणि ते कुंभकर्णाप्रमाणे झोपी जाण्यातच जगताचे कल्याण आहे. ॥ ३ ॥

पर अकाजु लगि तनु परिहरहीं। जिमि हिम उपल कृषी दलि गरहीं॥
बंदउँ खल जस सेष सरोषा। सहस बदन बरनइ पर दोषा॥

जशा गारा पिकाचा नाश करून स्वत:ही विरघळून जातात, तसेच ते दुसऱ्यांचे काम बिघडविण्यासाठी स्वत: मरणसुद्धा पत्करतात. दुष्टांना (हजार मुख असणाऱ्या) शेषाप्रमाणे समजून मी प्रणाम करतो. जे दुसऱ्यांच्या दोषांचे हजार मुखाने मोठ्या रोषाने वर्णन करतात. ॥ ४ ॥

पुनि प्रनवउँ पृथुराज समाना। पर अघ सुनइ सहस दस काना॥
बहुरि सक्र सम बिनवउँ तेही। संतत सुरानीक हित जेही॥

जे दुसऱ्यांच्या पापांना दहा हजार कानांनी ऐकतात, अशांना राजा पृथुप्रमाणे (ज्याने भगवंताचे यश ऐकण्यासाठी दहा हजार कान मागितले होते) समजून मी प्रणाम करतो. तसेच ज्यांना मदिरापान चांगले व हितावह वाटते त्यांना मी इंद्रासमान मानून प्रणाम करतो. (इंद्रालासुद्धा सुरानीक म्हणजेच देवतांची सेना प्रिय असते.) ॥ ५ ॥

बचन बज्र जेहि सदा पिआरा। सहस नयन पर दोष निहारा॥

ज्यांना कठोर वचनरूपी वज्र सदा आवडते आणि जे हजार नेत्रांनी दुसऱ्यांचे दोष पाहतात. (त्यांनाही मी प्रणाम करतो.) ॥ ६ ॥

दो०— **उदासीन अरि मीत हित सुनत जरहिं खल रीति।**
जानि पानि जुग जोरि जन बिनती करइ सप्रीति॥ ४॥

दुष्टांची रीत अशी असते की, ते उदासीन, शत्रू अथवा मित्र कोणाचेही हित ऐकून जळतात. हे जाणून हा दास त्यांच्याशी प्रेमपूर्वक दोन्ही हात जोडून नम्र होतो. ॥ ४ ॥

मैं अपनी दिसि कीन्ह निहोरा। तिन्ह निज ओर न लाउब भोरा॥
बायस पलिअहिं अति अनुरागा। होहिं निरामिष कबहुँ कि कागा॥

मी आपल्याकडून विनंती केली आहे परंतु ते त्यांच्याकडून कधी चुकणार नाहीत. कावळ्यांना कितीही प्रेमाने पाळा, परंतु ते मांसाचा त्याग करू शकतील काय? ॥ १ ॥

बंदउँ संत असज्जन चरना। दुखप्रद उभय बीच कछु बरना॥
बिछुरत एक प्रान हरि लेहीं। मिलत एक दुख दारुन देहीं॥

आता मी संत आणि असंत दोघांच्या चरणांची वंदना करतो. दोन्हीही दुःख देणारे आहेत. परंतु त्यांच्यात थोडे अंतर सांगितले गेले आहे. तो फरक असा आहे की, एक (संत) तर वियोगसमयी प्राण हरण करतात आणि दुसरे (असंत) संयोगसमयीच दारुण दुःख देतात. (अर्थात् संतांचा वियोग आणि असंताचा संयोग मृत्यूसमान दुःखदायी असतो.) ॥ २ ॥

उपजहिं एक संग जग माहीं। जलज जोंक जिमि गुन बिलगाहीं॥
सुधा सुरा सम साधु असाधू। जनक एक जग जलधि अगाधू॥

दोघेही (संत आणि असंत) जगतात एकाच ठिकाणी उत्पन्न होतात, परंतु (एकाच ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या) कमळ आणि जळूप्रमाणे त्यांचे गुण वेगवेगळे असतात. (कमळ दर्शनाने आणि स्पर्शाने सुख देते परंतु जळू शरीराचा स्पर्श होताच रक्त शोसून घेते.) साधू अमृतासारखे (मृत्युरूपी संसारातून उद्धार करविणारे) आणि असाधू मदिरेसारखे (मोह, प्रमाद आणि जडता उत्पन्न करणारे) असतात. दोघांना उत्पन्न करणारा जगतरूपी अगाध समुद्र मात्र एकच आहे. (शास्त्रात समुद्र मंथनानेच अमृत आणि मदिरा दोघांची उत्पत्ती सांगितली गेली आहे.) ॥ ३ ॥

भल अनभल निज निज करतूती। लहत सुजस अपलोक बिभूती॥
सुधा सुधाकर सुरसरि साधू। गरल अनल कलिमल सरि ब्याधू॥

गुन अवगुन जानत सब कोई। जो जेहि भाव नीक तेहि सोई॥

चांगले आणि वाईट दोघेही करणीनुसार सुंदर यश आणि अपयशाची संपत्ती प्राप्त करतात. अमृत, चंद्र, गंगा आणि साधू तसेच विष, कलियुगाच्या पापांची नदी अर्थात् कर्मनाशा आणि हिंसा करणारा व्याध, यांचे गुण-अवगुण सर्वजण जाणतात, परंतु ज्याला जे आवडते, त्याला तेच चांगले वाटते. ॥ ४, ५ ॥

दो०—**भलो भलाइहि पै लहइ लहइ निचाइहि नीचु।**
सुधा सराहिअ अमरताँ गरल सराहिअ मीचु॥ ५॥

चांगला माणूस चांगुलपणाच ग्रहण करतो आणि नीच नीचताच ग्रहण करत असतो. अमृताची विशेषता अमर करण्यात असते आणि विषाची विशेषता ठार करण्यात असते. ॥ ५ ॥

खल अघ अगुन साधु गुन गाहा। उभय अपार उदधि अवगाहा॥
तेहि तें कछु गुन दोष बखाने। संग्रह त्याग न बिनु पहिचाने॥

दुष्टांच्या पापांच्या आणि अवगुणांच्या तसेच साधूंच्या गुणांच्या कथा दोन्हीही अपार आणि अथाह समुद्र आहेत. त्यातील काही गुणांचे आणि दोषांचे वर्णन केले गेले आहे. कारण त्यांचे ज्ञान झाल्याशिवाय त्यांचे ग्रहण अथवा त्याग होऊ शकत नाही॥ १ ॥

भलेउ पोच सब बिधि उपजाए। गनि गुन दोष बेद बिलगाए॥
कहहिं बेद इतिहास पुराना। बिधि प्रपंचु गुन अवगुन साना॥

चांगले-वाईट सर्व ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेले आहेत, परंतु गुण आणि दोषांचा विचार करून वेदांनी त्यांना वेग-वेगळे केले आहे. ब्रह्मदेवाची ही सृष्टीगुण-अवगुणांनी भरलेली आहे, असे वेद, इतिहास आणि पुराण सांगतात. ॥ २ ॥

दुख सुख पाप पुन्य दिन राती। साधु असाधु सुजाति कुजाती॥
दानव देव ऊँच अरु नीचू। अमिअ सुजीवनु माहुरु मीचू॥
माया ब्रह्म जीव जगदीसा। लच्छि अलच्छि रंक अवनीसा॥
कासी मग सुरसरि क्रमनासा। मरु मारव महिदेव गवासा॥
सरग नरक अनुराग बिरागा। निगमागम गुन दोष बिभागा॥

दुःख-सुख, पाप-पुण्य, दिवस-रात्र, साधू-असाधू, सुजाती-कुजाती, दानव-देवता, उच्च-नीच, अमृत-विष, सुजीवन (सुंदर जीवन)-मृत्यू, माया-ब्रह्म, जीव-ईश्वर, संपत्ती-दरिद्रता, रंक-राजा, काशी-मगध, गंगा-कर्मनाशा, मारवाड-मालवा, ब्राह्मण-कसाई, स्वर्ग-नरक, अनुराग-वैराग्य (हे सर्व ब्रह्मदेवाच्या सृष्टीत आहेत.) वेदशास्त्रांनी त्यांच्या गुण-दोषांचा विभाग केला आहे. ॥ ३-५ ॥

दो०—**जड़ चेतन गुन दोषमय बिस्व कीन्ह करतार।**
संत हंस गुन गहहिं पय परिहरि बारि बिकार॥ ६॥

विधात्याने या जड-चेतन विश्वाला गुण-दोषमय असे रचलेले आहे, परंतु संतरूपी हंस हे दोषरूपी जलाचा त्याग करून गुणरूपी दूधच ग्रहण करतात. ॥६॥

अस बिबेक जब देइ बिधाता। तब तजि दोष गुनहिं मनु राता॥
काल सुभाउ करम बरिआईं। भलेउ प्रकृति बस चुकइ भलाईं॥

विधाता जेव्हा अशा प्रकारचा (हंसासारखा) विवेक प्रदान करतो, तेव्हा दोषांचा त्याग करून मन गुणांमध्ये अनुरक्त होते. काल-स्वभाव आणि कर्माच्या प्रबलतेने भले लोक (साधू) सुद्धा मायेला वश होऊन कधी-कधी चांगुलपणापासून हटतात. ॥ १ ॥

सो सुधारि हरिजन जिमि लेहीं। दलि दुख दोष बिमल जसु देहीं॥
खलउ करहिं भल पाइ सुसंगू। मिटइ न मलिन सुभाउ अभंगू॥

जसे भगवंताचे भक्त त्या चुकीला सुधारतात आणि दुःख दोषांना समाप्त करून निर्मळ यश देतात, तसेच दुष्टसुद्धा कधी-कधी उत्तम संग मिळवून भलाई करतात, परंतु त्यांचा कधीही भंग न होणारा मलिन स्वभाव नष्ट होत नाही. ॥ २ ॥

लखि सुबेष जग बंचक जेऊ। बेष प्रताप पूजिअहिं तेऊ॥
उघरहिं अंत न होइ निबाहू। कालनेमि जिमि रावन राहू॥

जे (वेषाने) ठक आहेत पण त्यांनाही उत्तम (साधूसारख्या) वेषात पाहून जगत त्यांची पूजा करते, परंतु केव्हाना केव्हा तरी त्यांचे बिंग उघडे पडते. शेवटपर्यंत त्यांचे कपट निभत नाही, जसे कालनेमि, रावण आणि राहूचे हाल झाले. ॥ ३ ॥

किएहुँ कुबेषु साधु सनमानू। जिमि जग जामवंत हनुमानू॥
हानि कुसंग सुसंगति लाहू। लोकहुँ बेद बिदित सब काहू॥

वाईट वेष धारण केला तरीही साधूचा सन्मानच होतो, जसे जगतात जांबवान आणि हनुमंताचे झाले. वाईट संगतीने हानी आणि उत्तम संगतीने लाभ होतो, ही गोष्ट लोक आणि वेदात वर्णन केली आहे आणि सर्वलोक ही गोष्ट जाणतात. ॥ ४ ॥

गगन चढ़इ रज पवन प्रसंगा। कीचहिं मिलइ नीच जल संगा॥
साधु असाधु सदन सुक सारीं। सुमिरहिं राम देहिं गनि गारीं॥

वायूच्या संगतीने धूळ आकाशात चढते आणि तीच नीच (उताराकडे वाहणाऱ्या) पाण्यांच्या संगाने चिखलात मिळते. साधूच्या घरी असलेल्या पोपट-मैना राम राम स्मरण करतात आणि असाधूच्या घरी असलेल्या पोपट-मैना मोजून शिव्या देतात. ॥ ५ ॥

धूम कुसंगति कारिख होई। लिखिअ पुरान मंजु मसि सोई॥
सोइ जल अनल अनिल संघाता। होइ जलद जग जीवन दाता॥

कुसंगामुळे धूर काजळी म्हणविला जातो, तोच धूर (सुसंगाने) सुंदर शाई होऊन पुराण लिहिण्याच्या कामी येतो आणि तोच धूर जल, अग्नि आणि वायूच्या संगतीने ढग होऊन जगताला जीवन देणारा बनतो. ॥ ६ ॥

दो०—ग्रह भेषज जल पवन पट पाइ कुजोग सुजोग।
होहिं कुबस्तु सुबस्तु जग लखहिं सुलच्छन लोग॥७(क)॥

ग्रह, औषध,जल, वायू आणि वस्त्र—हे सर्वच कुसंग आणि सुसंगतीने जगतात चांगले आणि वाईट पदार्थ बनतात. चतुर आणि विचारवान पुरुषच ही गोष्ट जाणतात. ॥ ७ ॥ क

सम प्रकास तम पाख दुहुँ नाम भेद बिधि कीन्ह।
ससि सोषक पोषक समुझि जग जस अपजस दीन्ह॥७(ख)॥

महिन्याच्या दोन्ही पंधरवाड्यात उजेड आणि अंधार समानच राहतो, परंतु विधात्याने त्यांच्या नावात फरक केला आहे. (एकाचे नाव शुक्ल आणि दुसऱ्याचे नाव कृष्ण ठेवले.) एकाला चंद्रास वाढविणारा आणि दुसऱ्यास चंद्राला घटविणारा समजून जगताने एकाला सुयश आणि दुसऱ्याला अपयश दिले आहे. ॥७॥ ख

जड़ चेतन जग जीव जत सकल राममय जानि।
बंदउँ सब के पद कमल सदा जोरि जुग पानि॥७(ग)॥

जगतात जेवढे जड आणि चेतन जीव आहेत सर्वांना राममय जाणून मी त्या सर्वांच्या चरण-कमलांना सदा दोन्ही हात जोडून वंदन करतो. ॥ ७ ॥ ग

देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्ब।
बंदउँ किंनर रजनिचर कृपा करहु अब सर्ब॥७(घ)॥

देवता, दैत्य, मनुष्य, नाग, पक्षी, प्रेत, पितर, गंधर्व, किन्नर आणि निशाचर सर्वांना मी प्रणाम करतो. आता सर्वांनी माझ्यावर कृपा करावी. ॥ ७ ॥ घ

आकर चारि लाख चौरासी। जाति जीव जल थल नभ बासी॥
सीय राममय सब जग जानी। करउँ प्रनाम जोरि जुग पानी॥

चौऱ्यांशी लाख योनीत चार प्रकारचे (स्वेदज, अण्डज, उद्भिज, जरायुज) जीव जल, पृथ्वी आणि आकाशात राहतात, त्या सर्वांनी भरलेल्या ह्या संपूर्ण जगताला श्रीसीताराममय जाणून मी दोन्ही हात जोडून प्रणाम करतो. ॥ १ ॥

जानि कृपाकर किंकर मोहू। सब मिलि करहु छाड़ि छल छोहू॥
निज बुधि बल भरोस मोहि नाहीं। तातें बिनय करउँ सब पाहीं॥

मला आपला दास जाणून कृपेची खाण असलेले आपण सर्वलोक मिळून छलरहित होऊन माझ्यावर कृपा करा. मला माझ्या बुद्धी-बलाचा भरवसा मुळीच नाही, म्हणून मी तुम्हा सर्वांना विनंती करतो॥ २ ॥

करन चहउँ रघुपति गुन गाहा। लघु मति मोरि चरित अवगाहा॥
सूझ न एकउ अंग उपाऊ। मन मति रंक मनोरथ राऊ॥

मी श्रीरघुनाथांच्या गुणांचे वर्णन करू इच्छितो, परंतु माझी बुद्धी अल्प आहे आणि श्रीरामचंद्रांचे चरित्र अपार आहे. म्हणून मला उपायाचे एखादे अंग अर्थात् कोणताही (लेशमात्र) उपाय सुचत नाही. माझे मन आणि बुद्धी कंगाल आहेत परंतु मनोरथ राजा आहे.॥ ३॥

मति अति नीच ऊँचि रुचि आछी। चहिअ अमिअ जग जुरइ न छाछी॥
छमिहहिं सज्जन मोरि ढिठाई। सुनिहहिं बालबचन मन लाई॥

माझी बुद्धी तर अत्यंत नीच आहे आणि इच्छा फार उच्च आहे. इच्छा तर अमृत मिळविण्याची आहे परंतु जगताकडून ताक देखील मिळत नाही. सज्जनलोक माझ्या धृष्टतेबद्दल मला क्षमा करतील आणि माझे बालवचन मन लावून (प्रेमपूर्वक) ऐकतील.॥ ४॥

जौं बालक कह तोतरि बाता। सुनहिं मुदित मन पितु अरु माता॥
हँसिहहिं कूर कुटिल कुबिचारी। जे पर दूषन भूषनधारी॥

जसे बालक जेव्हा बोबडे वचन बोलतो, तेव्हा त्याचे माता-पिता ती वचने प्रसन्न मनाने ऐकतात. परंतु क्रूर, कुटिल आणि वाईट विचार असणारी माणसे, जी दुसऱ्यांच्या दोषांनाच भूषणरूपाने धारण करतात (अर्थात् ज्यांना दुसऱ्यांचे दोषच आवडतात) ती हसतील.॥ ५॥

निज कबित्त केहि लाग न नीका। सरस होउ अथवा अति फीका॥
जे पर भनिति सुनत हरषाहीं। ते बर पुरुष बहुत जग नाहीं॥

रसयुक्त असो अथवा नीरस असो स्वत:ची कविता कोणाला आवडत नाहीं? परंतु जे दुसऱ्याच्या कवित्वाला ऐकून हर्षित होतात असे उत्तम पुरुष जगतात कमी आहेत.॥ ६॥

जग बहु नर सर सरि सम भाई। जे निज बाढ़ि बढ़हिं जल पाई॥
सज्जन सकृत सिंधु सम कोई। देखि पूर बिधु बाढ़इ जोई॥

हे पहा! जगतात तलाव आणि नदीसारखी माणसेच अधिक आहेत् जी स्वत:तील जलवाढीने स्वत:ची वाढ समजतात. (अर्थात् स्वत:च्याच उन्नतीने प्रसन्न होतात.) समुद्राप्रमाणे कोणी एखादा विरळाच सज्जन असतो, जो चंद्रमाला पाहून (दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून) आनंदाने वाढतो.॥ ७॥

दो०— **भाग छोट अभिलाषु बड़ करउँ एक बिस्वास।**
पैहहिं सुख सुनि सुजन सब खल करिहहिं उपहास॥ ८॥

माझे भाग्य कमी आहे आणि इच्छा फार मोठी आहे. परंतु मला असा विश्वास आहे की, ही कथा ऐकून सर्व सज्जन माणसे सुखी होतील आणि दुष्टलोक चेष्टा करतील.॥ ८॥

खल परिहास होइ हित मोरा। काक कहहिं कलकंठ कठोरा॥
हंसहिं बक दादुर चातकही। हँसहिं मलिन खल बिमल बतकही॥

असे असले तरीही दुष्टांच्या चेष्टेने माझे हितच होईल. मधुर कंठ असणाऱ्या कोकीळेला कावळे तर कठोरच म्हणत असतात. जसे बगळे हंसाला आणि बेडुक पावशा पक्षाला हसतात, तसेच मलिन मन असणारे दुष्ट, निर्मळ वाणीला हसतात. ॥१॥

कबित रसिक न राम पद नेहू। तिन्ह कहँ सुखद हास रस एहू॥
भाषा भनिति भोरि मति मोरी। हँसिबे जोग हँसें नहिं खोरी॥

जे कवितेचेही रसिक नाहीत आणि ज्यांचे श्रीरामचंद्रांच्या चरणांचे ठिकाणी प्रेमही नाही, त्यांच्यासाठी सुद्धा हे काव्य सुखद हास्य निर्माण करील. अगोदर तर ही भाषेची रचना आहे, दुसरी माझी बुद्धी भोळी आहे म्हणून ती हसण्याच्या योग्यच आहे, त्यांच्या हसण्यात त्यांचा कोणताही दोष नाही. ॥ २ ॥

प्रभु पद प्रीति न सामुझि नीकी। तिन्हहि कथा सुनि लागिहि फीकी॥
हरि हर पद रति मति न कुतरकी। तिन्ह कहुँ मधुर कथा रघुबर की॥

ज्यांच्या ठिकाणी प्रभूच्या चरणांविषयी प्रेमही नाही आणि ज्यांना योग्य समजही नाही, त्यांना ही कथा ऐकताना नीरस वाटेल. ज्यांची श्रीहरिच्या (भगवान् विष्णु) आणि हराच्या (भगवान् शिव) चरणांविषयी प्रीती आहे आणि ज्यांची बुद्धी कुतर्क करणारी नाही. (जे श्री हरि-हरात भेदाची अथवा उच्च नीचतेची कल्पना करत नाहीत) त्यांना श्रीरामचंद्रांची ही कथा आवडेल. ॥ ३ ॥

राम भगति भूषित जियँ जानी। सुनिहहिं सुजन सराहि सुबानी॥
कबि न होउँ नहिं बचन प्रबीनू। सकल कला सब बिद्या हीनू॥

या कथेला सज्जन लोक स्वत:च्या अंत:करणाला श्रीरामचंद्रांच्या भक्तीने भूषित मानून सुंदर वाणीने कौतुक करत ऐकतील. मी कवी नाही किंवा वाक्य रचनेत सुद्धा कुशल नाही. मी तर सर्व कलारहित तसेच सर्व विद्यारहित आहे. ॥ ४ ॥

आखर अरथ अलंकृति नाना। छंद प्रबंध अनेक बिधाना॥
भाव भेद रस भेद अपारा। कबित दोष गुन बिबिध प्रकारा॥

नाना प्रकारची अक्षरे, अर्थ आणि अलंकार, विविध प्रकारची छन्दरचना, भाव आणि रस यांचे अपार भेद आणि काव्यात भिन्न भिन्न प्रकारचे गुण-दोष असतात. ॥ ५ ॥

कबित बिबेक एक नहिं मोरें। सत्य कहउँ लिखि कागद कोरें॥

उर्वरित प्रकारा पैकी एकाही गोष्टीचे मला ज्ञान नाही, हे मी कोऱ्या कागदावर माझी स्वाक्षरी करून (शपथपूर्वक) सत्य सत्य सांगतो. ॥ ६ ॥

दो०—**भनिति मोरि सब गुन रहित बिस्व बिदित गुन एक।**
सो बिचारि सुनिहहिं सुमति जिन्ह कें बिमल बिबेक॥ ९ ॥

माझी काव्यरचना सर्व गुणांनी रहित आहे. यात फक्त जगप्रसिद्ध असा एक गुण आहे. त्याचा विचार करून निर्मळ ज्ञान असलेले तीव्र बुद्धीचे पुरुष ही कथा ऐकतील॥ ९ ॥

एहि महँ रघुपति नाम उदारा। अति पावन पुरान श्रुति सारा॥
मंगल भवन अमंगल हारी। उमा सहित जेहि जपत पुरारी॥

या कथेत श्रीरामचंद्रांचे उदार नाम आहे, जे अत्यंत पवित्र आहे, वेद-पुराणांचे सार आहे, कल्याणाचे भवन आहे आणि अमंगलांना हरण करणारे आहे, ज्याला भगवान् शंकर पार्वतीसह सदा जपतात. ॥ १ ॥

भनिति बिचित्र सुकबि कृत जोऊ। राम नाम बिनु सोह न सोऊ॥
बिधुबदनी सब भाँति सँवारी। सोह न बसन बिना बर नारी॥

एखाद्या चांगल्या कविद्वारा काव्याची रचना अप्रतिम झाली असली तरी ती राम नामाविना शोभत नाही. जशी चंद्रमुखी सुंदर स्त्री सर्व प्रकाराने अलंकारित केली तरी ती वस्त्राविना शोभा देत नही. ॥ २ ॥

सब गुन रहित कुकबि कृत बानी। राम नाम जस अंकित जानी॥
सादर कहहिं सुनहिं बुध ताही। मधुकर सरिस संत गुनग्राही॥

या उलट सामान्य कविद्वारा रचलेले काव्य सर्व गुणांनी रहित असले तरी रामाच्या नामाने व यशाने अंकित असल्यामुळे बुद्धिमान लोक ती कथा आदरपूर्वक सांगतात आणि ऐकतात, कारण संतजन भ्रमराप्रमाणे गुणच ग्रहण करणारे असतात. ॥ ३ ॥

जदपि कबित रस एकउ नाहीं। राम प्रताप प्रगट एहि माहीं॥
सोइ भरोस मोरें मन आवा। केहिं न सुसंग बड़प्पनु पावा॥

जरी माझ्या या काव्यरचनेत काव्याचा एकही रस नाही तरीही यात श्रीरामचंद्रांचा प्रताप प्रगट आहे. माझ्या मनाला हाच एक भरवसा आहे. सुसंगतीने कोणाला मोठेपणा मिळणार नाही? ॥ ४ ॥

धूमउ तजइ सहज करुआई। अगरु प्रसंग सुगंध बसाई॥
भनिति भदेस बस्तु भलि बरनी। राम कथा जग मंगल करनी॥

जसे धूर सुद्धा धूपाच्या संगाने सुगंधित होऊन स्वत:च्या स्वाभाविक कटुपणाचा त्याग करतो, तसे माझी कविता अवश्य नीरस आहे, परंतु यात जगताचे कल्याण करणाऱ्या रामकथारूपी उत्तम वस्तूचे वर्णन केले गेले आहे. (म्हणून हीसुद्धा उत्तमच समजली जाईल.) ॥ ५ ॥

छं०— **मंगल करनि कलिमल हरनि तुलसी कथा रघुनाथ की।**
गति कूर कबिता सरित की ज्यों सरित पावन पाथ की॥
प्रभु सुजस संगति भनिति भलि होइहि सुजन मन भावनी।
भव अंग भूति मसान की सुमिरत सुहावनि पावनी॥

तुलसीदास महाराज म्हणतात की, श्रीरामचंद्रांची कथा कल्याण करणारी आणि कलियुगाच्या पापांचे हरण करणारी आहे. माझ्या या नीरस कवितारूपी नदीची चाल गंगेसारख्या पवित्र जल

असलेल्या नदीसारखी वाकडी आहे. ही कविता प्रभू श्रीरामचंद्रांच्या सुंदर यशाच्या संगाने सुंदर तसेच सज्जनांच्या मनाला आवडणारी होईल. स्मशानातली अपवित्र राखसुद्धा श्रीशंकरांच्या अंग स्पर्शामुळे शोभायमान होते आणि स्मरण करताच पवित्र करणारी होते.

दो०—**प्रिय लागिहि अति सबहि मम भनिति राम जस संग।**
दारु बिचारु कि करइ कोउ बंदिअ मलय प्रसंग॥१०(क)॥

जसे मलय पर्वताच्या संगाने कोणतेही लाकूड (चंदन बनून) वंदनीय होते. मग कोणी त्या लाकडाच्या तुच्छतेचा विचार करतो काय? तसे श्रीरामचंद्रांच्या यशाच्या संगाने माझी कविता सर्वांना अत्यंत प्रिय होईल. ॥ १० ॥ क

स्याम सुरभि पय बिसद अति गुनद करहिं सब पान।
गिरा ग्राम्य सिय राम जस गावहिं सुनहिं सुजान॥१०(ख)॥

जसे गाय काळी असली तरी तिचे दूध शुभ्र आणि फार गुणकारी असते. हे जाणून सर्वलोक तिचे दूध पितात. तसे ग्रामीण भाषेत ही कथा असली तरी श्रीसीतारामचंद्रांच्या यशास बुद्धिमान लोक अत्यंत आवडीने गातात आणि ऐकतात. ॥ १० ॥ ख

मनि मानिक मुकुता छबि जैसी। अहि गिरि गज सिर सोह न तैसी॥
नृप किरीट तरुनी तनु पाई। लहहिं सकल सोभा अधिकाई॥

मणी, माणिक आणि मोती जरी सुंदर आणि चमकदार असले तरी ते साप, पर्वत आणि हत्तीच्या मस्तकावर तेवढे शोभा देत नाहीत. हे सर्व राजाच्या मुकुटावर आणि नवयुवती स्त्रीच्या शरीरावर अधिक शोभायमान होतात. ॥ १ ॥

तैसेहिं सुकबि कबित बुध कहहीं। उपजहिं अनत अनत छबि लहहीं॥
भगति हेतु बिधि भवन बिहाई। सुमिरत सारद आवति धाई॥

तसेच बुद्धिमान लोक म्हणतात की, सुकविची कवितासुद्धा कोठेतरी उत्पन्न होते आणि ती अन्य ठिकाणी शोभा देते. (अर्थात् कविच्या वाणीतून उत्पन्न झालेली कविता तिचा जेथे विचार, प्रचार तसेच त्यात कथित आदर्शाचे ग्रहण आणि अनुसरण जेथे होते तेथे ती कविता शोभते.) कविने स्मरण करताच त्याच्या भक्तीमुळे सरस्वती ब्रह्मलोकाचा त्याग करून धावत येते. ॥ २ ॥

राम चरित सर बिनु अन्हवाएँ। सो श्रम जाइ न कोटि उपाएँ॥
कबि कोबिद अस हृदयँ बिचारी। गावहिं हरि जस कलि मल हारी॥

सरस्वती धावत आल्याने तिला आलेला थकवा रामचरितरूपी सरोवरात तिला न्हाऊ घातल्याशिवाय दुसऱ्या कोटी उपायांनी दूर होत नाही. कवि आणि पंडित स्वत:च्या मनात असा विचार करून कलियुगाच्या पापाला हरण करणाऱ्या श्रीहरिच्या यशाचेच गायन करतात. ॥ ३ ॥

कीन्हें प्राकृत जन गुन गाना। सिर धुनि गिरा लगत पछिताना॥
हृदय सिंधु मति सीप समाना। स्वाति सारदा कहहिं सुजाना॥

संसारी माणसांचे गुणगान केल्यास सरस्वती कपाळाला हात लावून पश्चात्ताप करते (की मी याच्या बोलावण्याने कशाला आले?) बुद्धिमान लोक मनाला समुद्र, बुद्धीला शिंपला आणि सरस्वतीला स्वाती नक्षत्रासारखे समजतात. ॥ ४ ॥

जौं बरषइ बर बारि बिचारू। होहिं कबित मुकुतामनि चारू॥

जर या समुद्रावर विचाररूपी पाऊस पडला तर ती कविता मुक्तामणीसारखी सुंदर बनते. ॥ ५ ॥

दो०—**जुगुति बेधि पुनि पोहिअहिं रामचरित बर ताग।**
पहिरहिं सज्जन बिमल उर सोभा अति अनुराग॥ ११ ॥

त्या कवितारूपी मुक्तामण्यांची युक्तीने जुळवा जुळव करून मग रामचरित्ररूपी सुंदर धाग्यात ओवून सज्जन लोक आपल्या निर्मळ हृदयात धारण करतात, ज्यामुळे अत्यंत अनुराग प्रगट होतो. (ते अत्यंतिक प्रेमाला प्राप्त होतात.) ॥ ११ ॥

जे जनमे कलिकाल कराला। करतब बायस बेष मराला॥
चलत कुपंथ बेद मग छाँड़े। कपट कलेवर कलि मल भाँड़े॥

जे लोक घोर कलियुगात जन्माला आले आहेत ज्यांची कृती कावळ्यासारखी आहे आणि वेष हंसासारखा आहे, जे वेदमार्गाचा त्याग करून कुमार्गगामी आहेत, जे कपटाची मूर्ती आणि कलियुगाच्या पापांचे भांडार आहेत. ॥ १ ॥

बंचक भगत कहाइ राम के। किंकर कंचन कोह काम के॥
तिन्ह महँ प्रथम रेख जग मोरी। धींग धरमध्वज धंधक धोरी॥

जे श्रीरामचंद्रांचे भक्त म्हणवून घेऊन लोकांना फसवितात, जे धन (लोभ), क्रोध आणि कामाचे गुलाम आहेत आणि जे निरर्थक उचापती करणारे, धर्मध्वजी (धर्माची खोटी ध्वजा फडकविणारे-दंभी) आणि कपट कारस्थाने करणारे आहेत, अशा संसारी लोकात प्रथम माझा नंबर लागतो. ॥ २ ॥

जौं अपने अवगुन सब कहऊँ। बाढ़इ कथा पार नहिं लहऊँ॥
ताते मैं अति अलप बखाने। थोरे महुँ जानिहहिं सयाने॥

जर मी स्वत:च्या सर्वअवगुणांना सांगू लागलो तर कथा फारच विस्तार पावेल. तरीही ते संपणार नाहीत. म्हणून मी माझ्या फारच कमी अवगुणांचे वर्णन केले आहे. बुद्धिमान लोक थोडक्यातच माझी स्थिती समजून घेतील. ॥ ३ ॥

समुझि बिबिधि बिधि बिनती मोरी। कोउ न कथा सुनि देइहि खोरी॥
एतेहु पर करिहहिं जे असंका। मोहि ते अधिक ते जड़ मति रंका॥

माझ्या अनेक प्रकारच्या विनंत्या समजून घेऊन या कथेचे श्रवण केल्यावर कोणीही दोषारोपण करणार नाही. तरीही जे शंका करतील ते तर माझ्यापेक्षा देखील अधिक मूर्ख आणि बुद्धिहीन असतील. ॥ ४ ॥

कबि न होउँ नहिं चतुर कहावउँ। मति अनुरूप राम गुन गावउँ॥
कहँ रघुपति के चरित अपारा। कहँ मति मोरि निरत संसारा॥

मी कविही नाही आणि चतुरही नाही. स्वत:च्या बुद्धीनुसार श्रीरामचंद्रांचे गुण गातो. कुठे श्रीरामचंद्रांचे अपार चरित्र आणि कुठे संसारात आसक्त असलेली माझी बुद्धी!॥ ५॥

जेहिं मारुत गिरि मेरु उड़ाहीं। कहहु तूल केहि लेखे माहीं॥
समुझत अमित राम प्रभुताई। करत कथा मन अति कदराई॥

ज्या वायूने सुमेरूसारखे पर्वत उडून जातात. मला सांगा, त्याच्यासमोर कापसाची काय गणती? श्रीरामचंद्रांची असीम प्रभुता लक्षात घेऊन कथा रचण्यात माझे मन फार संकोच करत आहे. ॥ ६॥

दो०—सारद सेस महेस बिधि आगम निगम पुरान।
नेति नेति कहि जासु गुन करहिं निरंतर गान॥ १२॥

सरस्वती, शेष, शंकर, ब्रह्मदेव, शास्त्र, वेद आणि पुराण—हे सर्व "नेति नेति" म्हणून (अंत न लागल्याने "असे नाही," "असे नाही" म्हणत) सदा ज्यांचे गुणगान करत असतात. ॥ १२॥

सब जानत प्रभु प्रभुता सोई। तदपि कहें बिनु रहा न कोई॥
तहाँ बेद अस कारन राखा। भजन प्रभाउ भाँति बहु भाषा॥

जरी प्रभू श्रीरामचंद्रांची प्रभुता सर्वजण अशीच (अकथनीय) जाणतात तरी कोणीही वर्णन केल्याविना राहिला नाही. यात वेदाने असे कारण सांगितले आहे की, भजनाचा प्रभाव पुष्कळ प्रकाराने सांगितला गेला आहे. (अर्थात् भगवंताच्या माहात्म्याचे पूर्ण वर्णन तर कोणीही करू शकत नाही. परंतु ज्याला जेवढे शक्य होईल तेवढे त्याने भगवंताचे गुणगान करावे. कारण भगवंताच्या गुणगानरूपी भजनाचा प्रभाव फारच विलक्षण आहे, त्याचे शास्त्रात अनेक प्रकाराने वर्णन आले आहे. भगवंताचे थोडे भजनसुद्धा मनुष्याला सहजच भवसागरातून तारून नेते.) ॥ १॥

एक अनीह अरूप अनामा। अज सच्चिदानंद पर धामा॥
ब्यापक बिस्वरूप भगवाना। तेहिं धरि देह चरित कृत नाना॥

जो परमेश्वर एक आहे, ज्याला कशाचीच इच्छा नाही, ज्याला कोणतेही रूप आणि नाव नाही, जो अजन्मा, सच्चिदानन्द आणि परमधाम आहे, जो सर्वव्यापक तसेच विश्वरूप आहे, त्याच भगवंतांनी दिव्य शरीर धारण करून नाना प्रकारच्या लीला केल्या आहेत. ॥ २॥

सो केवल भगतन हित लागी। परम कृपाल प्रनत अनुरागी॥
जेहि जन पर ममता अति छोहू। जेहिं करुना करि कीन्ह न कोहू॥

त्या लीला केवळ भक्तांच्या हितासाठीच आहेत, कारण भगवान् परम कृपाळू आहेत आणि शरणागतावर अतिशय प्रेम करतात. त्यांची भक्तांवर फार ममता आणि कृपा असते. एकदा ज्याच्यावर कृपा करतात मग त्याच्यावर कधीही क्रोध करत नाहीत. ॥ ३॥

गई बहोर गरीब नेवाजू। सरल सबल साहिब रघुराजू॥
बुध बरनहिं हरि जस अस जानी। करहिं पुनीत सुफल निज बानी॥

ते प्रभू श्रीरामचंद्र अप्राप्ताची प्राप्ती करून देणारे, दीनबंधू, सरलस्वभाव, सर्व शक्तिमान आणि सर्वांचे स्वामी आहेत. हे जाणून बुद्धिमान लोक त्या श्रीहरिचे यश वर्णन करून वाणी पवित्र आणि उत्तम फलदायी (मोक्ष आणि दुर्लभ भगवत्प्रेम देणारी) बनवितात. ॥ ४ ॥

तेहिं बल मैं रघुपति गुन गाथा। कहिहउँ नाइ राम पद माथा॥
मुनिन्ह प्रथम हरि कीरति गाई। तेहिं मग चलत सुगम मोहि भाई॥

त्याच बळावर (माहात्म्याचे यथार्थ वर्णन नव्हे, परंतु भजन हे महान फल देणारे आहे हे समजून भगवत्कृपेच्या बळावरच) मी श्रीरामचंद्रांच्या चरणांवर मस्तक ठेवून श्रीरघुनाथांच्या गुणांची कथा वर्णन करतो. याच विचाराने (वाल्मिक, व्यास इत्यादी) मुनींनी प्रथम हरिची कीर्ती गायली आहे. म्हणून त्याच मार्गाचे अनुगमन करणे माझ्यासाठी सुगम होईल. ॥ ५ ॥

दो०—**अति अपार जे सरित बर जौं नृप सेतु कराहिं।**
चढ़ि पिपीलिकउ परम लघु बिनु श्रम पारहि जाहिं॥ १३॥

ज्या अत्यंत मोठ मोठ्या नद्या आहेत, जेव्हा राजा त्या नद्यांवर पूल बांधतो तेव्हा अत्यंत लहान मुंग्यासुद्धा त्यावर चढून विनापरिश्रम नदी पार होतात. (त्याचप्रमाणे मुनींच्या वर्णनाच्या आधाराने मीसुद्धा श्रीरामचरित्राचे वर्णन सहजच करू शकेल.) ॥ १३ ॥

एहि प्रकार बल मनहि देखाई। करिहउँ रघुपति कथा सुहाई॥
ब्यास आदि कबि पुंगव नाना। जिन्ह सादर हरि सुजस बखाना॥

अशाप्रकारे मी माझ्या मनाला धीर देऊन श्रीरामचंद्रांच्या रसभरित कथेची रचना करतो. व्यास इत्यादी जे अनेक श्रेष्ठ कवी होऊन गेले आहेत, त्यांनी मोठ्या आदराने श्रीहरिचे सुयश वर्णन केले आहे. ॥ १ ॥

चरन कमल बंदउँ तिन्ह केरे। पुरवहुँ सकल मनोरथ मेरे॥
कलि के कबिन्ह करउँ परनामा। जिन्ह बरने रघुपति गुन ग्रामा॥

मी त्या सर्वांच्या (श्रेष्ठ कवींच्या) चरणकमलावर प्रणाम करतो. त्यांनी माझे सर्व मनोरथ पूर्ण करावे. कलियुगातील त्या सर्व कवींना सुद्धा मी नमस्कार करतो, ज्यांनी श्रीरामचंद्रांच्या गुणसमूहाचे वर्णन केले आहे. ॥ २ ॥

जे प्राकृत कबि परम सयाने। भाषाँ जिन्ह हरि चरित बखाने॥
भए जे अहहिं जे होइहहिं आगें। प्रनवउँ सबहि कपट सब त्यागें॥

जे फार बुद्धिमान प्राकृत कवी आहेत, ज्यांनी आपल्या भाषेत हरिचरित्राचे वर्णन केले आहे आणि असे जे कवी पूर्वी होऊन गेले आहेत, जे यावेळी वर्तमानात आहेत आणि जे पुढे होतील त्या सर्वांना मी संपूर्ण कपटाचा त्याग करून प्रणाम करतो. ॥ ३ ॥



गोस्वामी श्रीतुलसीदासजी महाराज

Gosvāmī Tulasīdāsa

Sandals (Pādukās)—Handed Over



गीध देह तजि धरि हरिरूपा। भूषन बहु पट पीत अनूपा॥
स्याम गात बिसाल भुज चारी। अस्तुति करत नयन भरि बारी॥



एकु मैं मंद मोहबस कुटिल हृदय अग्यान।
पुनि प्रभु मोहि बिसारेउ दीनबंधु भगवान॥



भूधराकार हनुमान्

Mountain-like Hanumān

अहह कंत कृत राम बिरोधा। काल बिबस मन उपज न बोधा॥

केकीकण्ठाभनीलं सुरवरविलसद्विप्रपादाब्जचिह्नं शोभाढ्यं पीतवस्त्रं सरसिजनयनं सर्वदा सुप्रसन्नम्।
पाणौ नाराचचापं कपिनिकरयुतं बन्धुना सेव्यमानं नौमीड्यं जानकीशं रघुवरमनिशं पुष्पकारूढरामम्॥

श्रीरामदरबारकी झाँकी

The Court of Śrī Rāma

होहु प्रसन्न देहु बरदानू। साधु समाज भनिति सनमानू॥
जो प्रबंध बुध नहिं आदरहीं। सो श्रम बादि बाल कबि करहीं॥

तुम्ही सर्वजण प्रसन्न होऊन, साधू समाजात माझ्या कवितेचा सन्मान होईल असा मला आशीर्वाद द्या. कारण बुद्धिमान लोक ज्या काव्याचा आदर करीत नाहीत अशा काव्यरचनेचा मूर्ख कवीच व्यर्थ खटाटोप करतात. ॥ ४ ॥

कीरति भनिति भूति भलि सोई। सुरसरि सम सब कहँ हित होई॥
राम सुकीरति भनिति भदेसा। असमंजस अस मोहि अँदेसा॥

कीर्ती, कविता आणि संपत्ती तीच उत्तम आहे जी गंगेसारखी सर्वांचे हित करणारी आहे. श्रीरामचंद्रांची कीर्ती तर फारच सुंदर (सर्वांचे अनंत कल्याण करणारीच) आहे, परंतु माझी कविता निकृष्ट आहे. हीच तफावत आहे. (अर्थात् या दोन्हीचा मेळ बसत नाही.) याचीच मला चिंता आहे. ॥ ५ ॥

तुम्हरी कृपाँ सुलभ सोउ मोरे। सिअनि सुहावनि टाट पटोरे॥

परंतु हे कवींनो आपल्या कृपेने ही गोष्टसुद्धा माझ्यासाठी सुलभ होऊ शकते. रेशमाची शिलाई पोत्यावर सुद्धा सुंदर दिसते. ॥ ६ ॥

दो०— सरल कबित कीरति बिमल सोइ आदरहिं सुजान।
सहज बयर बिसराइ रिपु जो सुनि करहिं बखान॥ १४ (क)॥

चतुर पुरुष त्याच कवितेचा आदर करतात, जी सरळ असते आणि ज्यात निर्मळ चरित्राचे वर्णन असते. तसेच जिच्या श्रवणाने शत्रूसुद्धा स्वाभाविक वैरभाव विसरून स्तुती करू लागतात. ॥ १४ ॥ क

सो न होइ बिनु बिमल मति मोहि मति बल अति थोर।
करहु कृपा हरि जस कहउँ पुनि पुनि करउँ निहोर॥ १४ (ख)॥

अशी कविता निर्मळ बुद्धिविना होत नाही आणि माझी बुद्धी फार अल्प आहे. म्हणून वारंवार विनंती करतो की, हे कवींनो, तुम्ही कृपा करा ज्यामुळे मी हरियशाचे वर्णन करू शकेल. ॥ १४ ॥ ख

कबि कोबिद रघुबर चरित मानस मंजु मराल।
बालबिनय सुनि सुरुचि लखि मो पर होहु कृपाल॥ १४ (ग)॥

कवी आणि पंडितगण हो! तुम्ही रामचरित्ररूपी मानससरोवराचे सुंदर हंस आहात, माझी-बालकाची विनंती ऐकून आणि माझी सुंदर रुची पाहून माझ्यावर कृपा करा. ॥ १४ ॥ ग

सो०— बंदउँ मुनि पद कंजु रामायन जेहिं निरमयउ।
सखर सुकोमल मंजु दोष रहित दूषन सहित॥ १४ (घ)॥

मी त्या वाल्मिक मुनींच्या चरणकमलांची वंदना करतो ज्यांनी रामायणाची रचना केली आहे, जी खर (खर नावाचा राक्षस) सहित असून सुद्धा खराहून विपरीत (कठोररहित) म्हणजेच फारच कोमल आणि सुंदर आहे, तसेच जी दूषण (दूषण नावाचा राक्षस) सहित असून सुद्धा दूषणरहित अर्थात् दोषरहित आहे. ॥ १४ ॥ घ.

बंदउँ चारिउ बेद भव बारिधि बोहित सरिस।
जिन्हहि न सपनेहुँ खेद बरनत रघुबर बिसद जसु॥ १४ (ङ)॥

जे संसार-समुद्रातून पार होण्यासाठी जहाजासमान आहेत, तसेच ज्यांना श्रीरामचंद्रांचे निर्मळ यश वर्णन करण्यात स्वप्नातदेखील थकवा येत नाही, अशा चारही वेदांना मी वंदन करतो. ॥ १४ ॥ ङ.

बंदउँ बिधि पद रेनु भव सागर जेहिं कीन्ह जहँ।
संत सुधा ससि धेनु प्रगटे खल बिष बारुनी॥ १४ (च)॥

मी ब्रह्मदेवाच्या चरणरजाची वंदना करतो, ज्यांनी भवसागर उत्पन्न केला आहे, ज्यातून एका बाजूला संतरूपी अमृत, चंद्रमा आणि कामधेनू निघाले आणि दुसऱ्या बाजूला दुष्ट मनुष्यरूपी विष आणि मदिरा उत्पन्न झाले. ॥ १४ ॥ च

दो०— **बिबुध बिप्र बुध ग्रह चरन बंदि कहउँ कर जोरि।**
होइ प्रसन्न पुरवहु सकल मंजु मनोरथ मोरि॥१४ (छ)॥

देवता, ब्राह्मण, पंडित आणि ग्रह—या सर्वांच्या चरणांची वंदना करून हात जोडून म्हणतो की, त्यांनी प्रसन्न होऊन माझ्या सुंदर अशा संपूर्ण मनोरथांची पूर्णता करावी. ॥१४॥ छ

पुनि बंदउँ सारद सुरसरिता। जुगल पुनीत मनोहर चरिता॥
मज्जन पान पाप हर एका। कहत सुनत एक हर अबिबेका॥

त्यानंतर मी सरस्वती आणि देवनदी गंगामातेची वंदना करतो. दोन्हीही पवित्र आणि मनोहर चरित्र असणाऱ्या आहेत. एक (गंगा) स्नान करण्याने आणि पाणी पिण्याने पापांना हरण करते आणि दुसरी (सरस्वती) गुण व यश याच्या वर्णनाने आणि श्रवणाने अज्ञानाचा नाश करते. ॥ १ ॥

गुर पितु मातु महेस भवानी। प्रनवउँ दीनबंधु दिन दानी॥
सेवक स्वामि सखा सिय पी के। हित निरुपधि सब बिधि तुलसी के॥

श्रीशंकर आणि पार्वती यांना मी प्रणाम करतो, जे माझे गुरू आणि माता-पिता आहेत, जे दीनबंधू आणि नित्य दान करणारे आहेत, जे सीतापती श्रीरामचंद्रांचे सेवक, स्वामी आणि सखा आहेत. तसेच माझे-तुलसीदासाचे सर्व प्रकाराने कपटरहित (वास्तविक) हित करणारे आहेत. ॥ २ ॥

कलि बिलोकि जग हित हर गिरिजा। साबर मंत्र जाल जिन्ह सिरिजा॥
अनमिल आखर अरथ न जापू। प्रगट प्रभाउ महेस प्रतापू॥

ज्या शिव-पार्वतीने कलियुगाला पाहून जगताच्या हितासाठी अशा शाबर मंत्र समूहाची रचना केली की, ज्या मंत्रांच्या अक्षरांचा मेळ लागत नाही, ज्यांचा कोणताही योग्य अर्थ निघत नाही आणि जपही होत नाही, तरीही श्रीशिवाच्या प्रतापाने त्यांचा प्रभाव प्रत्यक्ष आहे. ॥ ३ ॥

सो उमेस मोहि पर अनुकूला । करिहिं कथा मुद मंगल मूला ॥
सुमिरि सिवा सिव पाइ पसाऊ । बरनउँ रामचरित चित चाऊ ॥

ते उमापती शिवजी माझ्यावर प्रसन्न होऊन (श्रीरामचंद्रांच्या) कथेला आनंददायी आणि मंगलकारक (आनंद उत्पन्न करणारी) बनवतील. अशा प्रकारे पार्वती आणि शिव दोघांचे स्मरण करून आणि त्यांचा प्रसाद मिळवून मी अत्यंत आवडीने श्रीरामचरित्राचे वर्णन करतो. ॥ ४ ॥

भनिति मोरि सिव कृपाँ बिभाती । ससि समाज मिलि मनहुँ सुराती ॥
जे एहि कथहि सनेह समेता । कहिहहिं सुनिहहिं समुझि सचेता ॥
होइहहिं राम चरन अनुरागी । कलि मल रहित सुमंगल भागी ॥

जशी रात्र तारांगणासह चंद्राबरोबर शोभते तशी माझी कविता श्रीशिवाच्या कृपेने सुशोभित होईल. जे ही कथा प्रेमासहित सावधानीने समजून-उमजून वर्णन करतील आणि श्रवण करतील ते कलियुगाच्या पापापासून रहित आणि सुंदर कल्याणगामी होऊन श्रीरामचंद्रांच्या चरणांचे प्रेमी बनतील. ॥ ५-६ ॥

दो०— सपनेहुँ साचेहुँ मोहि पर जौं हर गौरि पसाउ ।
तौ फुर होउ जो कहेउँ सब भाषा भनिति प्रभाउ ॥ १५ ॥

जर शिव आणि पार्वती माझ्यावर स्वप्नात का होईना खरोखर प्रसन्न राहतील, तर या काव्याचा जो प्रभाव मी सांगितला आहे तो सर्व सत्य होईल. ॥ १५ ॥

बंदउँ अवध पुरी अति पावनि । सरजू सरि कलि कलुष नसावनि ॥
प्रनवउँ पुर नर नारि बहोरी । ममता जिन्ह पर प्रभुहि न थोरी ॥

अति पवित्र श्रीअयोध्यापुरी आणि कलियुगाच्या पापांचा नाश करणाऱ्या श्रीसरयूनदीची मी वंदना करतो. तसेच अयोध्यापुरीच्या त्या नर-नारींना मी वंदना करतो ज्यांच्यावर प्रभू श्रीरामचंद्रांची फार ममता आहे. ॥ १ ॥

सिय निंदक अघ ओघ नसाए । लोक बिसोक बनाइ बसाए ॥
बंदउँ कौसल्या दिसि प्राची । कीरति जासु सकल जग माची ॥

श्रीरामचंद्रांनी (आपल्या धामात राहणारे) सीतेची निंदा करणाऱ्यांच्या (परीट आणि समर्थक नर-नारींच्या) पाप समूहांचा नाश करून त्यांना शोकरहित बनवून स्वत:च्या लोकात (निजधामात) वसविले. मी कौसल्यारूपी पूर्वदिशेची वंदना करतो, जिची कीर्ती संपूर्ण जगतात पसरली आहे. ॥ २ ॥

प्रगटेउ जहँ रघुपति ससि चारू। बिस्व सुखद खल कमल तुसारू॥
दसरथ राउ सहित सब रानी। सुकृत सुमंगल मूरति मानी॥
करउँ प्रनाम करम मन बानी। करहु कृपा सुत सेवक जानी॥
जिन्हहि बिरचि बड़ भयउ बिधाता। महिमा अवधि राम पितु माता॥

जेथून (कौसल्यारूपी पूर्व दिशेतून) विश्वाला सुख देणारे आणि दुष्टरूपी कमळासाठी थंडीप्रमाणे (न उमलू देणारे) श्रीरामचंद्ररूपी सुंदर चन्द्रमा प्रगट झाले. सर्व राण्यासहित राजा दशरथांना पुण्य आणि सुंदर कल्याणाची मूर्ती मानून मी मन, वचन आणि कर्माने प्रणाम करतो. ॥ ३-४ ॥

सो०— **बंदउँ अवध भुआल सत्य प्रेम जेहि राम पद।**
बिछुरत दीनदयाल प्रिय तनु तृन इव परिहरेउ॥ १६॥

अयोध्येचे राजे दशरथांना मी वंदन करतो, ज्यांचे श्रीरामाच्या चरणांमध्ये वास्तविक प्रेम होते, ज्यांनी दीन दयाळू प्रभूचा वियोग होताच स्वत:च्या प्रिय शरीराचा कस्पटाप्रमाणे त्याग केला. ॥ १६ ॥

प्रनवउँ परिजन सहित बिदेहू। जाहि राम पद गूढ़ सनेहू॥
जोग भोग महँ राखेउ गोई। राम बिलोकत प्रगटेउ सोई॥

राजे जनकांना मी परिवारासह प्रणाम करतो, ज्यांचे श्रीरामाच्या चरणांवर गूढ प्रेम होते, ज्याला त्यांनी योग आणि भोगात लपवून ठेवले, परंतु श्रीरामाला पाहताच ते प्रगट झाले. ॥ १ ॥

प्रनवउँ प्रथम भरत के चरना। जासु नेम ब्रत जाइ न बरना॥
राम चरन पंकज मन जासू। लुबुध मधुप इव तजइ न पासू॥

(बंधूमध्ये) सर्वप्रथम मी भरतजींच्या चरणांवर वंदन करतो, ज्यांचे नियम आणि व्रत अवर्णनीय आहेत, ज्यांचे मन श्रीरामजीच्या चरणकमलाभोवती भ्रमरासारखे लुब्ध राहते आणि चरणकमलांचे सान्निध्य कधीच सोडत नाही. ॥ २ ॥

बंदउँ लछिमन पद जल जाता। सीतल सुभग भगत सुख दाता॥
रघुपति कीरति बिमल पताका। दंड समान भयउ जस जाका॥

लक्ष्मणजींच्या चरणकमलांना मी वंदन करतो, ज्यांचे यश शीतल, सुंदर आणि भक्तांना सुख देणाऱ्या श्रीरामचंद्रांच्या कीर्तीरूपी पताकेसाठी (पताकेला उंच करून फडकविणाऱ्या) दंडासारखे झाले. ॥३ ॥

सेष सहस्त्रसीस जग कारन। जो अवतरेउ भूमि भय टारन॥
सदा सो सानुकूल रह मो पर। कृपासिंधु सौमित्रि गुनाकर॥

हजार मस्तक असणारे आणि जगताचे कारण असणारे जे (हजार मस्तकावर जगताला धारण करणारे) शेष आहेत, ज्यांनी पृथ्वीचे भय नाहीसे करण्यासाठी अवतार धारण केला, ते गुणांची खाण असणारे कृपासिंधू सुमित्रानंदन लक्ष्मणजींनी माझ्यावर सदा प्रसन्न रहावे. ॥ ४ ॥

रिपुसूदन पद कमल नमामी। सूर सुसील भरत अनुगामी॥
महाबीर बिनवउँ हनुमाना। राम जासु जस आप बखाना॥

महावीर, सुशील आणि भरतानुगामी अशा शत्रुघ्नजींच्या चरणकमलांना मी वंदन करतो. तसेच ज्यांच्या यशाचे वर्णन स्वत: श्रीरामचंद्रांनी (स्वत:च्या मुखाने) केले आहे अशा हनुमानजींना मी विनंती करतो. ॥ ५ ॥

सो०— प्रनवउँ पवनकुमार खल बन पावक ग्यान घन।
जासु हृदय आगार बसहिं राम सर चाप धर॥ १७॥

पवनकुमार श्रीहनुमंतांना मी प्रणाम करतो, जे दुष्टरूपी वन भस्म करण्यासाठी अग्निरूप आहेत, जे ज्ञानघन आहेत आणि ज्यांच्या हृदयरूपी भवनात धनुष्य-बाण धारण करून श्रीरामचंद्र निवास करतात. ॥ १७ ॥

कपिपति रीछ निसाचर राजा। अंगदादि जे कीस समाजा॥
बंदउँ सब के चरन सुहाए। अधम सरीर राम जिन्ह पाए॥

वानरांचे राजे सुग्रीव, अस्वलांचे राजे जांबवान, राक्षसांचे राजे बिभीषण आणि अंगद इत्यादी जेवढा वानरांचा समाज आहे, सर्वांच्या सुंदर चरणांची मी वंदना करतो, ज्यांनी अधम (पशू आणि राक्षस इत्यादी) शरीरातसुद्धा श्रीरामचंद्रांना प्राप्त केले. ॥ १ ॥

रघुपति चरन उपासक जेते। खग मृग सुर नर असुर समेते॥
बंदउँ पद सरोज सब केरे। जे बिनु काम राम के चेरे॥

श्रीरामाचे निष्काम सेवक असणारे पशू, पक्षी, देवता, मनुष्य, असुरांसहित जेवढे म्हणून श्रीरामांच्या चरणांचे उपासक आहेत, त्या सर्वांच्या चरणांची मी वंदना करतो. ॥ २ ॥

सुक सनकादि भगत मुनि नारद। जे मुनिबर बिग्यान बिसारद॥
प्रनवउँ सबहि धरनि धरि सीसा। करहु कृपा जन जानि मुनीसा॥

शुकदेवजी, सनकादी, नारदमुनी इत्यादी जेवढे म्हणून भक्त आणि परमज्ञानी श्रेष्ठ मुनी आहेत, मी पृथ्वीवर मस्तक टेकवून त्या सर्वांना प्रणाम करतो. हे मुनिश्वरांनो! तुम्ही सर्वांनी मला आपला दास समजून माझ्यावर कृपा करावी. ॥ ३ ॥

जनकसुता जग जननि जानकी। अतिसय प्रिय करुनानिधान की॥
ताके जुग पद कमल मनावउँ। जासु कृपाँ निरमल मति पावउँ॥

जनकनंदिनी जगत्माता आणि करुणानिधान श्रीरामचंद्रांची प्रियतमा श्री जानकीजींच्या दोन्ही चरणकमलांना मी प्रणाम करतो, ज्यांच्या कृपेने मला निर्मळ बुद्धी प्राप्त होईल. ॥ ४ ॥

पुनि मन बचन कर्म रघुनायक। चरन कमल बंदउँ सब लायक॥
राजिवनयन धरें धनु सायक। भगत बिपति भंजन सुखदायक॥

आता मी कमलनयन, धनुष्य-बाणधारी, भक्तांच्या विपत्तीचा नाश करणारे आणि त्यांना सुख देणाऱ्या भगवान् श्रीरामांच्या सर्वसमर्थ चरणकमलांना मी मन, वचन आणि कर्मानि वंदन करतो. ॥ ५ ॥

दो०— **गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न।**
बंदउँ सीता राम पद जिन्हहि परम प्रिय खिन्न॥ १८॥

ज्याप्रमाणे शब्द आणि त्याचा अर्थ तसेच पाणी आणि पाण्याचा तरंग दिसण्यापुरते वेगवेगळे आहेत परंतु वास्तविक रूपात अभिन्न आहेत आणि ज्यांना दीन-दुःखी फारच प्रिय आहेत अशा श्रीसीतारामचंद्रजींच्या चरणांना मी वंदन करतो. ॥ १८ ॥

बंदउँ नाम राम रघुबर को। हेतु कृसानु भानु हिमकर को॥
बिधि हरि हरमय बेद प्रान सो। अगुन अनूपम गुन निधान सो॥

जे कृशानू (अग्नी), भानू (सूर्य) आणि हिमकर (चंद्रमा) यांचेसाठी 'र', 'आ' आणि 'म' हे रूपाने बीज आहे, अशा रघुनाथांच्या 'राम' नामाची मी वंदना करतो. ते 'राम' नाम ब्रह्मा, विष्णु आणि शिवरूप आहे. ते वेदांचे प्राण आहे. तसेच निर्गुण उपमारहित आणि गुणांचे भांडार आहे. ॥ १ ॥

महामंत्र जोइ जपत महेसू। कासीं मुकुति हेतु उपदेसू॥
महिमा जासु जान गनराऊ। प्रथम पूजिअत नाम प्रभाऊ॥

जे 'राम' नाम महामंत्र आहे, ज्याचा जप महेश्वर शिवजी करतात आणि त्यांच्याद्वारा ज्याचा उपदेश काशीमध्ये मुक्तीचे कारण आहे, तसेच ज्याचे माहात्म्य गणेशजी जाणतात, ते या 'राम' नामाच्या प्रभावानेच सर्व-प्रथम पूजिले जातात. ॥ २ ॥

जान आदिकबि नाम प्रतापू। भयउ सुद्ध करि उलटा जापू॥
सहस नाम सम सुनि सिव बानी। जपि जेईं पिय संग भवानी॥

आदिकवी श्रीवाल्मिकजी रामनामाच्या प्रतापाला जाणतात, जे नाम उलटे ('मरा', 'मरा') जपून पवित्र झाले. एक राम नाम हजार नामासारखे आहे असे शिवजींचे वचन ऐकून पार्वतीजी सदा आपल्या पतीबरोबर राम नामाचा जप करत राहते. ॥ ३ ॥

हरषे हेतु हेरि हर ही को। किय भूषन तिय भूषन ती को॥
नाम प्रभाउ जान सिव नीको। कालकूट फलु दीन्ह अमी को॥

नामाविषयी पार्वतीजींच्या अंतःकरणात असलेल्या प्रीतीला पाहून शंकर हर्षित झाले आणि स्त्रीयात भूषणरूपी (पतिव्रतांमध्ये शिरोमणी) पार्वतीला त्यांनी आपले भूषण बनविले. (अर्थात् तिला आपली अर्धांगिनी बनविले.) नामाच्या प्रभावाला श्रीशिवजी उत्तम प्रकारे जाणतात, ज्याच्या प्रभावामुळे काळकूट विषाने सुद्धा त्यांना अमृताचे फल दिले. ॥ ४ ॥

दो— बरषा रितु रघुपति भगति तुलसी सालि सुदास।
राम नाम बर बरन जुग सावन भादव मास॥ १९॥

श्रीरघुनाथजींची भक्ती वर्षा-ऋतु आहे. तुलसीदासजी म्हणतात की, उत्तम सेवकगण भातशेती आहे आणि 'राम' नामाची दोन सुंदर अक्षरे श्रावण-भाद्रपदाचे महिने आहेत. ॥ १९ ॥

आखर मधुर मनोहर दोऊ। बरन बिलोचन जन जिय जोऊ॥
सुमिरत सुलभ सुखद सब काहू। लोक लाहु परलोक निबाहू॥

दोन्ही अक्षरे मधुर आणि मनोहर आहेत, जे वर्णमालारूपी शरीराचे नेत्र आहेत, भक्तांचे जीवन आहे. तसेच स्मरण करण्यात सर्वांसाठी सुलभ आणि सुखदायी आहेत, शिवाय जे या लोकात लाभ देतात आणि परलोकात सांभाळतात. (अर्थात् भगवंताच्या दिव्य धामात दिव्य देहाने सदा भगवत्सेवेत नियुक्त ठेवतात) ॥ १ ॥

कहत सुनत सुमिरत सुठि नीके। राम लखन सम प्रिय तुलसी के॥
बरनत बरन प्रीति बिलगाती। ब्रह्म जीव सम सहज सँघाती॥

हे उच्चारणासाठी श्रवणासाठी आणि स्मरणासाठी फारच उत्तम (सुंदर आणि मधुर) आहेत. तुलसीदासजींना तर हे श्रीराम-लक्ष्मणासारखेच प्रिय आहेत. यांचे ('र' आणि 'म' चे) वेगवेगळे वर्णन करण्याने त्यांच्या प्रेमात भेद केल्यासारखे होते. (अर्थात् बीजमंत्राच्या दृष्टीने यांचे उच्चारण अर्थ आणि फल यात भिन्नता दिसते) परंतु हे जीव आणि ब्रह्मासारखे स्वाभाविकच सदा एकरूप आणि एकरस आहेत. ॥ २ ॥

नर नारायन सरिस सुभ्राता। जग पालक बिसेषि जन त्राता॥
भगति सुतिय कल करन बिभूषन। जग हित हेतु बिमल बिधु पूषन॥

ही दोन्ही अक्षरे नर-नारायणासारखे सुंदर बंधू आहेत, जगताचे पालन आणि विशेषरूपाने भक्तांचे रक्षण करणारी आहेत. ही भक्तिरूपिणी सुंदर स्त्रीच्या कानांचे सुंदर अलंकार (कर्णफूल) आहेत आणि जगताच्या हितासाठी निर्मळ चंद्र-सूर्य आहेत. ॥ ३ ॥

स्वाद तोष सम सुगति सुधा के। कमठ सेष सम धर बसुधा के॥
जन मन मंजु कंज मधुकर से। जीह जसोमति हरि हलधर से॥

ही अक्षरे सुंदर गतिरूपी (मोक्ष) अमृताच्या स्वादासारखी आणि तृप्ती समान आहेत. कासव आणि शेषाप्रमाणे पृथ्वीला धारण करणारी आहेत. भक्तांच्या मनरूपी सुंदर कमळात विहार करणाऱ्या भ्रमरासारखी आहेत आणि जीभरूपी यशोदेसाठी श्रीकृष्ण आणि बलरामासारखी (आनंद. देणारी) आहेत. ॥ ४ ॥

दो— एकु छत्रु एकु मुकुटमनि सब बरननि पर जोउ।
तुलसी रघुबर नाम के बरन बिराजत दोउ॥ २०॥

तुलसीदास महाराज म्हणतात— श्रीरामचंद्रांच्या नामातील दोन्ही अक्षरे फारच शोभायमान आहेत,

त्यापैकी एक अक्षर छत्ररूपाने (रफार रूपाने) आणि दुसरे (मकार) मुकुटमणी रूपाने (अनुस्वार) सर्व अक्षरांच्या वर आहेत. ॥ २० ॥

समुझत सरिस नाम अरु नामी। प्रीति परसपर प्रभु अनुगामी॥
नाम रूप दुइ ईस उपाधी। अकथ अनादि सुसामुझि साधी॥

खरे तर, नाम आणि नामी दोन्ही एकसारखे आहेत, परंतु दोघात परस्पर स्वामी आणि सेवकाप्रमाणे प्रीती आहे. (अर्थात् नाम आणि नामीत पूर्ण एकता असूनही जसे स्वामीच्या मागे सेवक चालतो, तसे नामाच्या मागे नामी चालतात. प्रभू श्रीराम स्वत:च्या 'राम' नामाचेच अनुगमन करतात, नाम घेताच तेथे प्रगट होतात.) नाम आणि रूप दोन्ही ईश्वराच्या उपाधी आहेत. ही (भगवंताचे नाम आणि रूप) दोन्ही अनिर्वचनीय आहेत, अनादी आहेत आणि तीव्र (शुद्ध भक्तियुक्त) बुद्धीनेच यांचे (दिव्य-अविनाशी) स्वरूप जाणले जाते. ॥ १ ॥

को बड़ छोट कहत अपराधू। सुनि गुन भेदु समुझिहहिं साधू॥
देखिअहिं रूप नाम आधीना। रूप ग्यान नहिं नाम बिहीना॥

यात (नाम आणि रूप) कोण मोठा आहे, कोण लहान आहे, असे म्हणणे तर अपराध आहे. यांच्या गुणांचे तारतम्य (कमी-जास्त) ऐकून साधू पुरुष स्वत:च समजून घेतील. रूप नामाच्या अधीन दिसते. नामाशिवाय रूपाचे ज्ञान होऊ शकत नाही. ॥ २ ॥

रूप बिसेष नाम बिनु जानें। करतल गत न परहिं पहिचानें॥
सुमिरिअ नाम रूप बिनु देखें। आवत हृदयँ सनेह बिसेषें॥

एखादे विशेष रूप तळहातावर ठेवलेले असले तरी त्याचे नाव समजल्याशिवाय ते ओळखता येत नाही आणि रूप पाहिले नसले तरी नामाचे स्मरण केले गेले तर विशेष प्रेमासहित ते रूप हृदयात प्रगट होते. ॥ ३ ॥

नाम रूप गति अकथ कहानी। समुझत सुखद न परति बखानी॥
अगुन सगुन बिच नाम सुसाखी। उभय प्रबोधक चतुर दुभाषी॥

नाम आणि रूपाच्या गतीची कहाणी (वैशिष्ट्याची कथा) अकथनीय आहे. ती समजण्यासाठी सुखदायक आहे, परंतु अवर्णनीय आहे. निर्गुण आणि सगुणाच्या मध्यात नाम सुंदर साक्षी आहे आणि दोघांचे यथार्थ ज्ञान करविणारा चतुर दुभाषिक आहे. ॥ ४ ॥

दो०— **राम नाम मनिदीप धरु जीह देहरीं द्वार।**
तुलसी भीतर बाहेरहुँ जौं चाहसि उजिआर॥ २१॥

तुलसीदासजी म्हणतात— जर तुला आत आणि बाहेर प्रकाश पाहिजे असेल तर तू मुखरूपी द्वाराच्या उंबरठ्यावर रामनामरूपी मणि-दीपक ठेव. ॥ २१ ॥

नाम जीहँ जपि जागहिं जोगी। बिरति बिरंचि प्रपंच बियोगी॥
ब्रह्मसुखहि अनुभवहिं अनूपा। अकथ अनामय नाम न रूपा॥

ब्रह्मदेवाने रचलेल्या या प्रपंचातून (दृश्य जगतातून) उपरत झालेले तीव्र वैराग्यवान मुक्त योगी पुरुष या नामाचा मौखिक जप करत (तत्त्वज्ञानरूपी प्रकाशात) जागतात आणि नाम तसेच रूपरहित अनुपम, अनिर्वचनीय, अनामय ब्रह्मसुखाचा अनुभव घेतात. ॥ १ ॥

जाना चहहिं गूढ़ गति जेऊ। नाम जीहँ जपि जानहिं तेऊ॥
साधक नाम जपहिं लय लाएँ। होहिं सिद्ध अनिमादिक पाएँ॥

जे परमात्म्याच्या गूढ रहस्याला (यथार्थ माहात्म्याला) जाणू इच्छितात, ते (जिज्ञासू) सुद्धा मौखिक जप करून त्याला जाणून घेतात. (लौकिकसिद्धीचे इच्छुक-अर्थार्थी) साधक तर जीव ओतून नामजप करतात आणि अणिमादी (आठही) सिद्धींना प्राप्त करून सिद्ध होतात. ॥ २ ॥

जपहिं नामु जन आरत भारी। मिटहिं कुसंकट होहिं सुखारी॥
राम भगत जग चारि प्रकारा। सुकृती चारिउ अनघ उदारा॥

आर्त (संकटग्रस्त) भक्त जेव्हा नामजप करतात तेव्हा त्यांची मोठ-मोठी भयंकर संकटे नाहीशी होतात आणि ते सुखी होतात. जगतात चार प्रकारचे रामभक्त आहेत. (१) अर्थार्थी—धनादीच्या इच्छेने भजणारे, (२) आर्त—संकटाच्या निवृत्तीसाठी भजणारे, (३) जिज्ञासू—भगवंताला जाणून घेण्याच्या इच्छेने भजणारे, (४) ज्ञानी—भगवंताला तत्त्वाने जाणून स्वाभाविकच प्रेमाने भजणारे) आणि चारीही पुण्यात्मा, पापरहित आणि उदार आहेत. ॥ ३ ॥

चहू चतुर कहुँ नाम अधारा। ग्यानी प्रभुहि बिसेषि पिआरा॥
चहुँ जुग चहुँ श्रुति नाम प्रभाऊ। कलि बिसेषि नहिं आन उपाऊ॥

चारीही चतुर भक्तांना नामाचाच आधार आहे. यात ज्ञानी भक्त प्रभूला विशेष प्रिय आहे. तसे पाहिले तर चारी युगांमध्ये आणि चारीही वेदांमध्ये नामाचा प्रभाव आहेच. परंतु कलियुगामध्ये विशेषत्वाने आहे. या कलियुगात तर (नामाशिवाय) दुसरा कोणताच उपाय नाही. ॥ ४ ॥

दो०—सकल कामना हीन जे राम भगति रस लीन।
नाम सुप्रेम पियूष ह्रद तिन्हहुँ किए मन मीन॥ २२॥

जे सर्वप्रकारे (भोग आणि मोक्षाचेही) कामनारहित आहेत आणि रामभक्तीच्या रसात लीन झाले आहेत, त्यांनीही आपल्या मनाला नामाच्या सुंदर प्रेमरूपी अमृताच्या सरोवरातील मासोळी बनविले आहे. (अर्थात् ते नामरूपी सुधारसाचे) निरंतर आस्वादन करत राहतात, क्षणभरसुद्धा त्यापासून वेगळे होऊ इच्छित नाहीत.) ॥ २२ ॥

अगुन सगुन दुइ ब्रह्म सरूपा। अकथ अगाध अनादि अनूपा॥
मोरें मत बड़ नामु दुहू तें। किए जेहिं जुग निज बस निज बूतें॥

निर्गुण आणि सगुण—ब्रह्माची दोन स्वरूपे आहेत. ही दोन्हीही रूपे अकथनीय, अथाह, अनादी आणि अनुपम आहेत. माझ्या मताने नाम या दोघांपेक्षाही श्रेष्ठ आहे. त्याने आपल्या स्वत:च्या बलाने दोघांना आपल्या वश केले आहे. ॥ १ ॥

प्रौढ़ि सुजन जनि जानहिं जन की। कहउँ प्रतीति प्रीति रुचि मन की॥
एकु दारुगत देखिअ एकू। पावक सम जुग ब्रह्म बिबेकू॥
उभय अगम जुग सुगम नाम तें। कहेउँ नामु बड़ ब्रह्म राम तें॥
ब्यापकु एकु ब्रह्म अबिनासी। सत चेतन घन आनँद रासी॥

सज्जनगणांनी या गोष्टीला या दासाची धृष्टता अथवा केवळ काव्योक्ती समजू नये. मी आपल्या मनाचा विश्वास, प्रेम आणि रूचीची गोष्ट सांगतो. (निर्गुण आणि सगुण) दोन्ही प्रकाराने ब्रह्माचे होणारे ज्ञान अग्निसारखे आहे. निर्गुण त्या अप्रगट अग्निसारखे आहे जो लाकडात असतो परंतु दिसत नाही आणि सगुण त्या प्रगट अग्निसारखे आहे जो प्रत्यक्ष दिसतो. (तत्त्वत: दोन्ही एकच आहेत, केवळ प्रगट-अप्रगटच्या भेदाने भिन्न वाटतात. त्याचप्रमाणे निर्गुण आणि सगुण तत्त्वत: एकच आहेत. असे असले तरी) दोन्हीही जाणून घेण्यात कठीण आहेत, परंतु नामाने दोन्हीही सुगम होतात. म्हणूनच मी नामाला (निर्गुण) ब्रह्मापेक्षा आणि (सगुण) रामापेक्षा श्रेष्ठ म्हटले आहे. ब्रह्म व्यापक आहे, एक आहे, अविनाशी आहे, सत्ता, चैतन्य आणि आनंदाची घनराशी आहे. ॥ २-३ ॥

अस प्रभु हृदयँ अछत अबिकारी। सकल जीव जग दीन दुखारी॥
नाम निरूपन नाम जतन तें। सोउ प्रगटत जिमि मोल रतन तें॥

असे विकाररहित प्रभू हृदयात निवास करत असून सुद्धा जगताचे सर्व जीव दीन आणि दु:खी आहेत. नामाचे निरूपण करून (नामाचे यथार्थ स्वरूप,माहात्म्य, रहस्य आणि प्रभाव हे समजून घेऊन) नामाला जतन केल्याने (श्रद्धापूर्वक नामजपरूपी साधन केल्यास) तेच ब्रह्म, जसे रत्न जाणल्याने त्याचे मूल्य प्रगट होते, तसे प्रगट होते. ॥ ४ ॥

दो०— **निरगुन तें एहि भाँति बड़ नाम प्रभाउ अपार।**
कहउँ नामु बड़ राम तें निज बिचार अनुसार॥ २३॥

अशाप्रकारे निर्गुणापेक्षा नामाचा प्रभाव अत्यंत श्रेष्ठ आहे. आता मी स्वत:च्या विचारानुसार म्हणतो की, नाम (सगुण) रामापेक्षाही श्रेष्ठ आहे. ॥ २३ ॥

राम भगत हित नर तनु धारी। सहि संकट किए साधु सुखारी॥
नामु सप्रेम जपत अनयासा। भगत होहिं मुद मंगल बासा॥

श्रीरामचंद्रजींनी भक्तांच्या हितासाठी मानव शरीर धारण करून स्वत: कष्ट सहन करून साधूंना सुखी केले, परंतु भक्तगण प्रेमाने नामाचा जप करत सहजच आनंदाचे आणि कल्याणाचे निवासस्थान बनतात. ॥१ ॥

राम एक तापस तिय तारी। नाम कोटि खल कुमति सुधारी॥
रिषि हित राम सुकेतुसुता की। सहित सेन सुत कीन्हि बिबाकी॥
सहित दोष दुख दास दुरासा। दलइ नामु जिमि रबि निसि नासा॥
भंजेउ राम आपु भव चापू। भव भय भंजन नाम प्रतापू॥

श्रीरामचद्रांनी एका तपस्वीच्या पत्नीलाच (अहल्या) तारले, परंतु नामाने कोट्यवधी दुष्टांच्या बिघडलेल्या बुद्धीला सुधारले. श्रीरामचंद्रजींनी विश्वामित्र ऋषींच्या हितासाठी एका सुकेतू यक्षाची कन्या ताडका हिला सेना आणि पुत्रासह (सुबाहू) समाप्त केले. परंतु नाम आपल्या भक्तांचे दोष, दुःख आणि दुराशांचा अशा प्रकारे नाश करून टाकते जसे सूर्य रात्रीचा नाश करतो. श्रीरामजींनी तर स्वतः शंकरांचे धनुष्य तोडले, परंतु नामाचा प्रतापच संसाराच्या सर्व भयांचा नाश करणारा आहे. ॥ २-३ ॥

दंडक बनु प्रभु कीन्ह सुहावन। जन मन अमित नाम किए पावन॥
निसिचर निकर दले रघुनंदन। नामु सकल कलि कलुष निकंदन॥

प्रभू श्रीरामजींनी (भयानक) दंडकवनाला सुखकर बनविले, परंतु नामाने असंख्य माणसांची मने पवित्र केली. श्रीरामजींनी राक्षसांच्या समूहाला ठार केले परंतु नाम तर कलियुगाच्या सर्व पापांचे मूळ उखडणारे आहे. ॥ ४ ॥

दो०— सबरी गीध सुसेवकनि सुगति दीन्हि रघुनाथ।
नाम उधारे अमित खल बेद बिदित गुन गाथ॥ २४॥

श्रीरामजींनी तर शबरी, जटायू इत्यादी उत्तम सेवकांनाच मुक्ती दिली, परंतु नामाने अगणित दुष्टांचा उद्धार केला. नामाच्या गुणांच्या कथा सर्व वेदांमध्ये प्रसिद्ध आहेत. ॥ २४ ॥

राम सुकंठ बिभीषन दोऊ। राखे सरन जान सबु कोऊ॥
नाम गरीब अनेक नेवाजे। लोक बेद बर बिरिद बिराजे॥

श्रीरामजींनी सुग्रीव आणि बिभीषण दोघांचीच शरणागती स्वीकारली हे सर्वजण जाणतात, परंतु नामाने अनेक गरीबांवर कृपा केली आहे. नामाचे हे सुंदर माहात्म्य लोक आणि वेदांमध्ये विशेषरूपाने प्रकाशित आहे. ॥ १ ॥

राम भालु कपि कटकु बटोरा। सेतु हेतु श्रमु कीन्ह न थोरा॥
नामु लेत भवसिंधु सुखाहीं। करहु बिचारु सुजन मन माहीं॥

श्रीरामजींनी तर अस्वल आणि वानरांची सेना जमवली आणि समुद्रावर पूल बांधण्यासाठी फार परिश्रम केले, परंतु नाम घेताच संसार समुद्र आटतो. सज्जनगणांनीच मनात विचार करावा (की दोघात कोण श्रेष्ठ आहे.) ॥ २ ॥

राम सकुल रन रावनु मारा। सीय सहित निज पुर पगु धारा॥
राजा रामु अवध रजधानी। गावत गुन सुर मुनि बर बानी॥
सेवक सुमिरत नामु सप्रीती। बिनु श्रम प्रबल मोह दलु जीती॥
फिरत सनेहँ मगन सुख अपनें। नाम प्रसाद सोच नहिं सपनें॥

श्रीरामजींनी रावणाला युद्धात कुटुंबासहित ठार केले, तेव्हा सीतेसह त्यांनी आपल्या नगरात

(अयोध्या) प्रवेश केला. राम राजा झाले, अयोध्या त्यांची राजधानी झाली. देवता आणि मुनी सुंदर वाणीने त्यांचे गुण गातात. परंतु सेवक (भक्त) प्रेमपूर्वक नामाच्या केवळ स्मरणाने परिश्रमाविना मोहाच्या प्रबल सेनेला जिंकून प्रेममग्न होऊन स्वसुखात रममाण होतात. नामाच्या प्रसादाने त्यांना स्वप्नातसुद्धा कोणतीही चिंता सतावित नाही. ॥ ३-४ ॥

दो०— **ब्रह्म राम तें नामु बड़ बर दायक बर दानि।**
रामचरित सत कोटि महँ लिय महेस जियँ जानि॥ २५॥

अशाप्रकारे नाम (निर्गुण) ब्रह्म आणि (सगुण) राम दोघापेक्षा श्रेष्ठ आहे. नाम वरदान देणाऱ्यांना सुद्धा वर देणारे आहे. शंकरांनी हे जाणूनच शंभर कोटी चरित्रांमधून या 'राम' नामाला (साररूपाने वेचून) आपल्या हृदयात ग्रहण केले आहे. ॥ २५ ॥

मासपारायण, पहिला विश्राम

नाम प्रसाद संभु अबिनासी। साजु अमंगल मंगल रासी॥
सुक सनकादि सिद्ध मुनि जोगी। नाम प्रसाद ब्रह्मसुख भोगी॥

नामाच्याच प्रसादाने शंकरजी अविनाशी आणि अमंगल वेष धारण करणारे असूनही मंगलाची राशी आहेत. शुकदेवजी आणि सनकादी सिद्ध, मुनी, योगीजन नामाच्याच प्रसादाने ब्रह्मानन्द अनुभवतात. ॥ १ ॥

नारद जानेउ नाम प्रतापू। जग प्रिय हरि हरि हर प्रिय आपू॥
नामु जपत प्रभु कीन्ह प्रसादू। भगत सिरोमनि भे प्रहलादू॥

नारदांनी नामाचा प्रताप जाणला आहे. हरि संपूर्ण संसाराला आवडणारे आहेत. (हरिला हर आवडतात.) आणि नारदजी हरि आणि हर दोघांना प्रिय आहेत. प्रल्हादाने नाम जपले म्हणून प्रभूंनी त्यांच्यावर कृपा केली त्यामुळे ते भक्त शिरोमणी बनले. ॥ २ ॥

ध्रुवँ सगलानि जपेउ हरि नाऊँ। पायउ अचल अनूपम ठाऊँ॥
सुमिरि पवनसुत पावन नामू। अपने बस करि राखे रामू॥

ध्रुवाने दुःखी होऊन (सावत्र आईच्या वचनांनी दुःखी होऊन सकाम भावनेने) हरिनाम जपले आणि त्याच्या प्रतापाने अचल, अनुपम स्थान (ध्रुवलोक) प्राप्त केले. हनुमंतांनी पवित्र नामस्मरण करून श्रीरामांना आपले करून ठेवले आहे. ॥ ३ ॥

अपतु अजामिलु गजु गनिकाऊ। भए मुकुत हरि नाम प्रभाऊ॥
कहौं कहाँ लगि नाम बड़ाई। रामु न सकहिं नाम गुन गाई॥

नीच अजामिळ, गज आणि गणिका (वेश्या) सुद्धा श्रीहरि नामाच्या प्रभावाने मुक्त झाले. मी नामाची श्रेष्ठता किती वर्णन करू. श्रीरामसुद्धा नामाचे गुण सांगू शकत नाहीत. ॥ ४ ॥

दो०— **नामु राम को कलपतरु कलि कल्यान निवासु।**
जो सुमिरत भयो भाँग तें तुलसी तुलसीदासु॥ २६॥

पूतु बिदेस न सोचु तुम्हारें। जानति हहु बस नाहु हमारें॥
नीद बहुत प्रिय सेज तुराई। लखहु न भूप कपट चतुराई॥

तुमचा पुत्र परदेशात आहे, तुम्हाला कसलीही चिंता नाही. तुम्हाला असे वाटते की, स्वामी माझ्या वश आहेत. तुम्हाला तर आरामशीर पलंगावर पडून राहणे व झोप घेणे हेच फार आवडते. राजाच्या कपटयुक्त चतुराईकडे तुमचे लक्ष नाही. ॥ ३ ॥

सुनि प्रिय बचन मलिन मनु जानी। झुकी रानि अब रहु अरगानी॥
पुनि अस कबहुँ कहसि घरफोरी। तब धरि जीभ कढ़ावउँ तोरी॥

मंथरेचे प्रिय वचन ऐकून परंतु तिला मलिन मनाची समजून राणी रागाने म्हणाली—बस, आता पुरे कर, घरफोडी कुठली! जर तू पुन्हा असे बोलशील तर तुझी जीभ उखडून टाकीन. ॥ ४ ॥

दो०— **काने खोरे कूबरे कुटिल कुचाली जानि।**
तिय बिसेषि पुनि चेरि कहि भरतमातु मुसुकानि॥ १४॥

तिरळे, लंगडे आणि कुबडे यांना कुटिल आणि कुचाली समजावे. त्यातही स्त्री आणि खास करून दासी! एवढे म्हणून भरतजीची माता कैकेयी उपहासाने हसली. ॥ १४ ॥

प्रियबादिनि सिख दीन्हिउँ तोही। सपनेहुँ तो पर कोपु न मोही॥
सुदिनु सुमंगल दायकु सोई। तोर कहा फुर जेहि दिन होई॥

(आणि नंतर म्हणाली—) हे प्रिय वचन बोलणारी मंथरा! मी तुला शिकविण्यासाठी एवढे बोलले. तुझ्यावर मला स्वप्नातही क्रोध येत नाही. ज्यादिवशी तुझे म्हणणे सत्य होईल तोच सुंदर, मंगलदायक शुभ दिवस ठरेल. (अर्थात् श्रीरामचंद्रास राज्याभिषेक होईल.) ॥ १ ॥

जेठ स्वामि सेवक लघु भाई। यह दिनकर कुल रीति सुहाई॥
राम तिलकु जौं साँचेहुँ काली। देउँ मागु मन भावत आली॥

मोठा भाऊ स्वामी आणि धाकटा भाऊ सेवक असतो. ही सूर्यवंशाची सुंदर रीत आहे. जर खरोखर उद्याच श्रीरामचंद्रास राज्याभिषेक असेल तर हे सखे! तुझ्या मनाला जी वस्तू आवडेल ती मागून घे, मी ती देईन. ॥ २ ॥

कौसल्या सम सब महतारी। रामहि सहज सुभायँ पिआरी॥
मो पर करहिं सनेहु बिसेषी। मैं करि प्रीति परीछा देखी॥

रामाला सर्व माता स्वाभाविकच कौसल्येसारख्या प्रिय वाटतात. माझ्यावर तर तो विशेष प्रेम करतो. मी त्याच्या प्रीतीची परीक्षा घेऊन पाहिले आहे. ॥ ३ ॥

जौं बिधि जनमु देइ करि छोहू। होहुँ राम सिय पूत पुतोहू॥
प्रान तें अधिक रामु प्रिय मोरें। तिन्ह कें तिलक छोभु कस तोरें॥

भायँ कुभायँ अनख आलसहूँ। नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥
सुमिरि सो नाम राम गुन गाथा। करउँ नाइ रघुनाथहि माथा॥

सद्भावाने (प्रेमाने), कुभावाने (वैराने), क्रोधाने अथवा आळसाने कोणत्याही पद्धतीने नाम जपले तरी दाही दिशात कल्याण होते. त्याच (परम कल्याणकारी) रामनामाचे स्मरण करून आणि श्रीरघुनाथजींच्या चरणावर नतमस्तक होऊन मी त्यांच्या गुणांचे वर्णन करतो. ॥ १ ॥

मोरि सुधारिहि सो सब भाँती। जासु कृपा नहिं कृपाँ अघाती॥
राम सुस्वामि कुसेवकु मोसो। निज दिसि देखि दयानिधि पोसो॥

ते (श्रीरामचंद्रजी) माझ्या चुका सर्व प्रकाराने सुधारून घेतील, त्यांची कृपा, कृपा करण्यास कधीही थकत नाही. श्रीरामासारखे उत्तम स्वामी आणि माझ्यासारखा अधम सेवक! असे असले तरी त्या दयानिधीने स्वत:च्या ब्रीदाकडे पाहून माझे पालन केले आहे. ॥ २ ॥

लोकहुँ बेद सुसाहिब रीती। बिनय सुनत पहिचानत प्रीती॥
गनी गरीब ग्राम नर नागर। पंडित मूढ़ मलीन उजागर॥

लोक आणि वेदांमध्ये सुद्धा उत्तम स्वामीची हीच रीत प्रसिद्ध आहे की, ते विनयी सेवकाचे प्रेम ओळखतात. श्रीमंत-दरिद्री, ग्रामिण-शहरी, पंडित-मूर्ख, बदनाम-यशस्वी, ॥ ३ ॥

सुकबि कुकबि निज मति अनुहारी। नृपहि सराहत सब नर नारी॥
साधु सुजान सुसील नृपाला। ईस अंस भव परम कृपाला॥

सुकवी-कुकवी, सर्व नर-नारी आप आपल्या बुद्धीनुसार स्तुती करतात आणि साधू, बुद्धिमान, सुशील, ईश्वराच्या अंशाने उत्पन्न झालेले कृपाळू राजे— ॥ ४ ॥

सुनि सनमानहिं सबहि सुबानी। भनिति भगति नति गति पहिचानी॥
यह प्राकृत महिपाल सुभाऊ। जान सिरोमनि कोसलराऊ॥

सर्वांचे ऐकून आणि त्यांची भाषा, विनय आणि भाव ओळखून सुंदर (गोड) भाषणाने सर्वांचा यथायोग्य सन्मान करतात. हा स्वभाव तर संसारी राजांचा आहे. कोसलनाथ श्रीरामचंद्र तर चतुर शिरोमणी आहेत. ॥ ५ ॥

रीझत राम सनेह निसोतें। को जग मंद मलिनमति मोतें॥

श्रीरामचंद्रजी तर विशुद्ध प्रेमाने प्रसन्न होतात, परंतु जगतात माझ्यापेक्षा वरचढ मूर्ख आणि मलिन बुद्धीचा दुसरा कोण असेल? ॥ ६ ॥

दो०— **सठ सेवक की प्रीति रुचि रखिहहिं राम कृपालु।**
उपल किए जलजान जेहिं सचिव सुमति कपि भालु॥ २८ (क)॥

तरीही कृपाळू श्रीरामचंद्रजी माझ्यासारख्या दुष्ट सेवकाविषयी प्रीती आणि आवड अवश्य ठेवतील, कारण त्यांनी दगडांना जहाज आणि वानर-अस्वलांना बुद्धिमान मंत्री बनविले. ॥ २८ ॥ क

हौंहु कहावत सबु कहत राम सहत उपहास।
साहिब सीतानाथ सो सेवक तुलसीदास॥ २८ (ख)॥

सर्वलोक मला श्रीरामाचा सेवक म्हणतात आणि मीही लज्जा संकोच सोडून स्वत:ला सेवक म्हणवितो. (म्हणणाऱ्यांचा विरोध करत नाही.) कृपाळू श्रीरामचंद्रजी अशा प्रकारच्या निंदेला सहन करतात की, श्रीसीतानाथजीसारख्या स्वामीचा तुलसीदासासारखा सेवक आहे. ॥ २८ ॥ ख

अति बड़ि मोरि ढिठाई खोरी। सुनि अघ नरकहुँ नाक सकोरी॥
समुझि सहम मोहि अपडर अपनें। सो सुधि राम कीन्हि नहिं सपनें॥

ही माझी फार मोठी धृष्टता आणि दोष आहे. माझी पापे ऐकून नरकाने देखील नाक मुरडले आहे. (अर्थात् नरकात सुद्धा माझ्यासाठी जागा नाही.) अशा विचाराने मला स्वत:च्याच कल्पित भयाने भीती वाटत आहे. परंतु भगवान् श्रीरामजींनी तर स्वप्नात सुद्धा इकडे (माझ्या या धृष्टतेकडे आणि दोषाकडे) लक्ष दिले नाही. ॥ १ ॥

सुनि अवलोकि सुचित चख चाही। भगति मोरि मति स्वामि सराही॥
कहत नसाइ होइ हियँ नीकी। रीझत राम जानि जन जी की॥

उलट माझ्या प्रभू श्रीरामजींनी तर ही गोष्ट ऐकून, पाहून आणि आपल्या सुचित्तरूपी चक्षूने निरीक्षण करून माझ्या भक्ती आणि बुद्धीचे (उलट) कौतुकच केले आहे. कारण बोलण्यात जरी बिघडले असले (अर्थात् भलेही मी स्वत:ला भगवंताचा सेवक म्हणत-म्हणवित असलो) तरी अंत:करणात प्रामाणिकता असली पाहिजे ना! (अंत:करणात तर मी स्वत:ला त्यांचा सेवक होण्या-योग्य न मानता पापी आणि दीनच मानतो—हा चांगुलपणा आहे.) श्रीरामचंद्रजी सुद्धा दासाच्या अंत:करणाची ही उत्तम स्थिती जाणून प्रसन्न होतात. ॥ २ ॥

रहति न प्रभु चित चूक किए की। करत सुरति सय बार हिए की॥
जेहिं अघ बधेउ ब्याध जिमि बाली। फिरि सुकंठ सोइ कीन्हि कुचाली॥

प्रभूंच्या चित्तात आपल्या भक्तांच्या चूक-भूलीचे स्मरणही राहत नाही (ते त्या चुका विसरून जातात) आणि त्यांच्या अंत:करणाच्या चांगल्या स्थितीला शंभर-शंभर वेळा स्मरण करतात. ज्या पापामुळे त्यांनी वालीला व्याधाप्रमाणे ठार केले होते, तीच कृती पुढे सुग्रीवाने केली. ॥ ३ ॥

सोइ करतूति बिभीषन केरी। सपनेहुँ सो न राम हियँ हेरी॥
ते भरतहि भेंटत सनमाने। राजसभाँ रघुबीर बखाने॥

तशीच क्रिया विभीषणाची होती, परंतु श्रीरामचंद्रजींनी स्वप्नातसुद्धा त्याचा विचार केला नाही. उलट भरतजीला भेटले तेव्हा श्रीरामचंद्रांनी बिभीषणाचा सन्मान केला आणि राजसभेत त्याचे गुण वर्णन केले. ॥ ४ ॥

दो०— **प्रभु तरु तर कपि डार पर ते किए आपु समान।**
तुलसी कहूँ न राम से साहिब सीलनिधान॥ २९ (क)॥

प्रभू श्रीरामचंद्रजी तर झाडाच्या खाली आणि वानरे झाडांवर (अर्थात् कुठे मर्यादा पुरुषोत्तम सच्चिदानन्दघन परमात्मा श्रीरामचंद्रजी आणि कुठे झाडांच्या फांद्यावर उड्या मारणारी वानरे.) परंतु अशा वानरांना सुद्धा त्यांनी आपल्यासारखे बनविले. तुलसीदासजी म्हणतात की, श्रीरामचंद्रजीसारखे शीलनिधान स्वामी कुठेही सापडणार नाहीत. ॥ २९ ॥ क

राम निकाईं रावरी है सबही को नीक।
जौं यह साँची है सदा तौ नीको तुलसीक॥ २९ (ख)॥

हे रामजी! तुमच्या अशा दयाळू स्वभावाने सर्वांचे बरे आहे. (अर्थात् तुमचा कल्याणमय स्वभाव सर्वांचे कल्याण करणारा आहे.) जर हे खरे आहे तर तुलसीदासाचे सुद्धा निश्चितच सदा कल्याण होईल. ॥ २९ ॥ ख

एहि बिधि निज गुन दोष कहि सबहि बहुरि सिरु नाइ।
बरनउँ रघुबर बिसद जसु सुनि कलि कलुष नसाइ॥ २९ (ग)॥

अशा प्रकारे माझ्या गुण-दोषांचे वर्णन करून आणि सर्वांना पुन्हा प्रणाम करून मी श्रीरामचंद्रजींचे निर्मळ यश वर्णन करतो, ज्याच्या श्रवणाने कलियुगातील पापे नाहीशी होतात. ॥ २९ ग ॥

जागबलिक जो कथा सुहाई। भरद्वाज मुनिबरहि सुनाई॥
कहिहउँ सोइ संबाद बखानी। सुनहुँ सकल सज्जन सुखु मानी॥

याज्ञवल्क्य मुनींनी जी मधुर कथा मुनिश्रेष्ठ भरद्वाज मुनींना ऐकविली होती, त्याच संवादाचे मी वर्णन करतो. सर्व सज्जनांनी सुखानुभव करत ती ऐकावी. ॥ १ ॥

संभु कीन्ह यह चरित सुहावा। बहुरि कृपा करि उमहि सुनावा॥
सोइ सिव कागभुसुंडिहि दीन्हा। राम भगत अधिकारी चीन्हा॥

शिवजींनी प्रथम या मधुर चरित्राला रचले, नंतर कृपा करून ते पार्वतीजीस सांगितले. शिवजींनी काकभुशुंडीजींची रामभक्ती आणि योग्य अधिकार ओळखून तेच चरित्र त्यांना प्रदान केले. ॥ २ ॥

तेहि सन जागबलिक पुनि पावा। तिन्ह पुनि भरद्वाज प्रति गावा॥
ते श्रोता बकता समसीला। सवँदरसी जानहिं हरिलीला॥

त्या काकभुशुंडींकडून ते चरित्र पुढे याज्ञवल्क्यांनी प्राप्त केले आणि त्यांनी ते भरद्वाजजींना संगीतात ऐकविले. ते दोन्ही वक्ते आणि श्रोते (याज्ञवल्क्य आणि भरद्वाज) समान शीलवान, समदर्शी आणि श्रीहरिच्या लीला जाणणारे आहेत. ॥ ३ ॥

जानहिं तीनि काल निज ग्याना। करतल गत आमलक समाना॥
औरउ जे हरिभगत सुजाना। कहहिं सुनहिं समुझहिं बिधि नाना॥

ते आपल्या ज्ञानाने तिन्ही कालांच्या गोष्टी करतळावर ठेवलेल्या आवळया प्रमाणे (प्रत्यक्ष) जाणतात. याशिवाय जे सुजाण (भगवंताच्या लीलांचे रहस्य जाणणारे) हरिभक्त आहेत, ते या चरित्राचे कथन अनेक प्रकारांनी सांगतात, ऐकतात आणि समजून घेतात. ॥ ४ ॥

दो०— **मैं पुनि निज गुर सन सुनी कथा सो सूकरखेत।**
समुझी नहिं तसि बालपन तब अति रहेउँ अचेत॥ ३० (क)॥

नंतर मी तीच कथा वाराह-क्षेत्रामध्ये आपल्या गुरूजींकडून ऐकली. परंतु त्यावेळी मी बालपणामुळे फार बेसमज होतो, म्हणून ती कथा मला चांगल्या रीतीने समजली नाही. ॥ ३० ॥ क

श्रोता बकता ग्याननिधि कथा राम कै गूढ़।
किमि समुझौं मैं जीव जड़ कलि मल ग्रसित बिमूढ़॥३० (ख)॥

श्रीरामचंद्रजींच्या गूढ कथेचे वक्ते (वर्णन करणारे) आणि श्रोते (श्रवण करणारे) दोन्हीही ज्ञानाचे भांडार (पूर्ण ज्ञानी) असतात. कलियुगाच्या पापांनी ग्रसित महामूर्ख असा मी जडजीव ती कशी समजू शकणार?॥ ३० ॥ ख

तदपि कही गुर बारहिं बारा। समुझि परी कछु मति अनुसारा॥
भाषाबद्ध करबि मैं सोई। मोरें मन प्रबोध जेहिं होई॥

तरीही गुरूजींनी जेव्हा ती कथा वारंवार सांगितली तेव्हा बुद्धीनुसार थोडी थोडी समजली. तीच आता माझ्याद्वारा पद्यात रचली जाईल, त्यामुळे माझ्या मनाला संतोष होईल. ॥ १ ॥

जस कछु बुधि बिबेक बल मेरें। तस कहिहउँ हियँ हरि के प्रेरें॥
निज संदेह मोह भ्रम हरनी। करउँ कथा भव सरिता तरनी॥

माझ्यात जी काही बुद्धी आणि विवेकाचे बळ आहे त्यानुसार मी भगवत् प्रेरणेने सांगतो. मी स्वत:चा संदेह,अज्ञान आणि भ्रम ह्याचा नाश करणारी कथा रचतो, ती संसाररूपी नदी पार होण्यासाठी नाव आहे. ॥ २ ॥

बुध बिश्राम सकल जन रंजनि। रामकथा कलि कलुष बिभंजनि॥
रामकथा कलि पंनग भरनी। पुनि बिबेक पावक कहुँ अरनी॥

रामकथा पंडितांना विश्राम देणारी, सर्व माणसांना प्रसन्न करणारी आणि कलियुगाच्या पापांचा नाश करणारी आहे. रामकथा कलियुगरूपी सर्पासाठी मोर आहे आणि विवेकरूपी अग्नि प्रकट करण्यासाठी अरणी (मंथन करण्याचे लाकूड) आहे, (अर्थात् ही कथा श्रवण करण्याने ज्ञान प्राप्त होते. ॥ ३ ॥

रामकथा कलि कामद गाई। सुजन सजीवनि मूरि सुहाई॥
सोइ बसुधातल सुधा तरंगिनि। भय भंजनि भ्रम भेक भुअंगिनि॥

रामकथा कलियुगातील सर्व मनोरथांना पूर्ण करणारी कामधेनू गाय आहे आणि सज्जनांसाठी सुंदर संजीवनी मुळी आहे. पृथ्वीवर हीच अमृताची नदी आहे. जन्म-मरणरूपी भयाचा नाश करणारी आणि भ्रमरूपी बेडकांना खाण्यासाठी सर्पिणी आहे. ॥ ४ ॥

असुर सेन सम नरक निकंदिनि। साधु बिबुध कुल हित गिरिनंदिनि॥
संत समाज पयोधि रमा सी। बिस्व भार भर अचल छमा सी॥

ही रामकथा असुरांच्या सेनेप्रमाणे असणाऱ्या नरकांचा नाश करणारी आणि साधुरूप देवतांच्या कुलाचे हित करणारी पार्वती (दुर्गा) आहे. ही संत समाजरूपी क्षीर समुद्रासाठी लक्ष्मीसारखी आहे आणि संपूर्ण विश्वाचा भार उचलण्यात अचल पृथ्वीसारखी आहे. ॥ ५ ॥

जम गन मुहँ मसि जग जमुना सी। जीवन मुकुति हेतु जनु कासी॥
रामहि प्रिय पावनि तुलसी सी। तुलसिदास हित हियँ हुलसी सी॥

यमदूतांच्या तोंडाला काळिमा फासण्यासाठी ही कथा जगतात यमुनेसारखी आहे आणि जीवांना मुक्ती देण्यासाठी जणुकाय काशीच आहे. ही कथा श्रीरामचंद्रजींना पवित्र तुळशीसारखी प्रिय आहे आणि तुलसीदासासाठी हुलसीसारखी (तुलसीदासांची माता) अंत:करणपूर्वक हित करणारी आहे. ॥ ६ ॥

सिवप्रिय मेकल सैल सुता सी। सकल सिद्धि सुख संपति रासी॥
सदगुन सुरगन अंब अदिति सी। रघुबर भगति प्रेम परमिति सी॥

ही रामकथा शिवजींना नर्मदेसारखी प्रिय आहे, ही सर्व सिद्धींची तसेच सुख-संपत्तीची राशी आहे. सद्गुणरूपी देवतांची उत्पत्ती आणि पालन-पोषण करण्यासाठी माता अदितीसारखी आहे. श्रीरामचंद्रजींच्या भक्ती आणि प्रेमाची परम सीमाच आहे. ॥ ७ ॥

दो०— **रामकथा मंदाकिनी चित्रकूट चित चारु।**
तुलसी सुभग सनेह बन सिय रघुबीर बिहारु॥ ३१॥

तुलसीदासजी म्हणतात की, रामकथा जणुकाय मंदाकिनी नदी आहे, सुंदर (निर्मळ) चित्त चित्रकूट आहे आणि सुंदर स्नेह हेच वन आहे ज्या ठिकाणी श्रीसीतारामजी विहार करतात. ॥ ३१ ॥

रामचरित चिंतामनि चारू। संत सुमति तिय सुभग सिंगारू॥
जग मंगल गुनग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के॥

श्रीरामचंद्रजींचे चरित्र जणु काही सुंदर चिंतामणी आहे आणि संताच्या बुद्धिरूपी स्त्रीचा सुंदर शृंगार आहे. श्रीरामचद्रजींचा गुणसमूह जगताचे कल्याण करणारा आणि मुक्ती, धन, धर्म आणि परमधाम देणारा आहे. ॥ १ ॥

सदगुर ग्यान बिराग जोग के। बिबुध बैद भव भीम रोग के॥
जननि जनक सिय राम प्रेम के। बीज सकल ब्रत धरम नेम के॥

हा गुणसमूह, ज्ञान, वैराग्य आणि योगासाठी सदगुरू आहे, तसेच संसाररूपी भयंकर रोगाचा नाश करण्यासाठी देवतांच्या वैद्यासारखा (अश्विनीकुमार) आहे. तो श्रीरामचंद्रजींचे प्रेम उत्पन्न करण्यासाठी माता-पिता आहे आणि संपूर्ण व्रत, धर्म आणि नियमांचे बीज आहे. ॥ २ ॥

समन पाप संताप सोक के । प्रिय पालक परलोक लोक के ॥
सचिव सुभट भूपति बिचार के । कुंभज लोभ उदधि अपार के ॥

हा पाप, संताप आणि शोकाचा नाश करणारा तसेच या लोकाचे आणि परलोकाचे प्रिय पालन करणारा आहे. विचाररूपी (ज्ञान) राजाचा शूरवीर मंत्री आणि लोभरूपी अपार समुद्राचे शोषण करण्यासाठी अगस्त्य मुनी आहे. ॥ ३ ॥

काम कोह कलिमल करिगन के । केहरि सावक जन मन बन के ॥
अतिथि पूज्य प्रियतम पुरारि के । कामद घन दारिद दवारि के ॥

भक्तांच्या मनरूपी वनात राहणाऱ्या काम, क्रोध आणि कलियुगाच्या पापरूपी हत्तींना मारण्यासाठी सिंहाचा बच्चा आहे. शिवजींचा पूज्य आणि प्रियतम अतिथी आहे आणि दरिद्रतारूपी दावानल (अग्नि) विझविण्यासाठी कामना पूर्ण करणारा मेघ आहे. ॥ ४ ॥

मंत्र महामनि बिषय ब्याल के । मेटत कठिन कुअंक भाल के ॥
हरन मोह तम दिनकर कर से । सेवक सालि पाल जलधर से ॥

विषयरूपी सर्पाचे विष उतरविण्यासाठी हा मंत्र आणि महामणी आहे. कपाळावरील कठीण दुष्ट विधिलिखितास हा नाहीसा करणारा आहे. अज्ञानरूपी अंध:कार हरण करण्यासाठी हा सूर्यकिरणासारखा आणि सेवकरूपी भातशेती पालन करण्यात मेघासारखा आहे. ॥ ५ ॥

अभिमत दानि देवतरु बर से । सेवत सुलभ सुखद हरि हर से ॥
सुकबि सरद नभ मन उडगन से । रामभगत जन जीवन धन से ॥

हा मनोवांच्छित वस्तू देण्यात श्रेष्ठ कल्पवृक्षासारखा आहे आणि सेवा करण्यात हरि-हरासारखा सुलभ आणि सुख देणारा आहे. सुकविरूपी शरद्ऋतूच्या मनरूपी आकाशाला सुशोभित करण्यासाठी तारागणांसारखा आणि श्रीरामभक्तांचे तर जीवन धनच आहे. ॥ ६ ॥

सकल सुकृत फल भूरि भोग से । जग हित निरुपधि साधु लोग से ॥
सेवक मन मानस मराल से । पावन गंग तरंग माल से ॥

हे संपूर्ण पुण्यांच्या महान फलासारखे आहे. जगताचे छलरहित (यथार्थ) हित करण्यात साधु-संतासारखे आहे. सेवकांच्या मनरूपी मानस सरोवरासाठी हंसासारखे आणि पवित्र करण्यात गंगेच्या तरंगासारखे आहे. ॥ ७ ॥

दो०— **कुपथ कुतरक कुचालि कलि कपट दंभ पाषंड ।**
दहन राम गुन ग्राम जिमि इंधन अनल प्रचंड ॥ ३२ (क) ॥

जसा प्रचंड अग्नि इंधनाला जाळतो तसे श्रीरामचंद्रजींचा गुण समूह कुमार्ग, कुतर्क, कुचाल आणि कलियुगाचे कपट, दंभ आणि पाखंड यांना जाळणारा आहे. ॥ ३२ ॥ क

रामचरित राकेस कर सरिस सुखद सब काहु ।
सज्जन कुमुद चकोर चित हित बिसेषि बड़ लाहु ॥ ३२ (ख) ॥

रामचरित्र पौर्णिमेच्या चंद्रकिरणासारखे सर्वांना सुख देणारे आहे. परंतु सज्जनरूपी कुमुदिनी आणि चकोराच्या चित्तासाठी तर विशेष हितकारी आणि महान लाभदायक आहे. ॥ ३२ ॥ ख

कीन्हि प्रस्न जेहि भाँति भवानी। जेहि बिधि संकर कहा बखानी॥
सो सब हेतु कहब मैं गाई। कथा प्रबंध बिचित्र बनाई॥

पार्वतीजीने शिवजींना जसा प्रश्न केला आणि शिवजींनी त्याचे उत्तर जसे विस्ताराने दिले ते सर्व चरित्र मी कथेची विशेष रचना करून सांगतो. ॥ १ ॥

जेहिं यह कथा सुनी नहिं होई। जनि आचरजु करै सुनि सोई॥
कथा अलौकिक सुनहिं जे ग्यानी। नहिं आचरजु करहिं अस जानी॥
रामकथा कै मिति जग नाहीं। असि प्रतीति तिन्ह के मन माहीं॥
नाना भाँति राम अवतारा। रामायन सत कोटि अपारा॥

ज्याने ही कथा पूर्वी ऐकली नसेल त्याने ह्या कथाश्रवणाने आश्चर्य करू नये. जे ज्ञानी या विलक्षण कथेला ऐकतात त्यांना आश्चर्य वाटत नाही. कारण जगात रामकथा असीम आहे, (रामकथा अनंत आहे.) असा त्यांच्या मनात विश्वास असतो. श्रीरामचंद्रजींचे नाना प्रकारचे अवतार झाले आहेत आणि शंभर कोटी एवढेच नव्हे तर रामायण हे अपार आहे. ॥ २-३ ॥

कलपभेद हरिचरित सुहाए। भाँति अनेक मुनीसन्ह गाए॥
करिअ न संसय अस उर आनी। सुनिअ कथा सादर रति मानी॥

कल्पभेदानुसार श्रीहरिची चरित्रे मुनीश्वरांनी अनेक प्रकारांनी गायली आहेत. म्हणून तुम्ही आपल्या अंत:करणात संदेह न करता आदराने प्रेमयुक्त होऊन कथा ऐका. ॥ ४ ॥

दो०— **राम अनंत अनंत गुन अमित कथा बिस्तार।**
सुनि आचरजु न मानिहहिं जिन्ह कें बिमल बिचार॥ ३३ ॥

श्रीरामचंद्रजी अनंत आहेत, त्यांचे गुणही अनंत आहेत आणि त्यांच्या कथांचा विस्तार सुद्धा असीम आहे. म्हणून ज्यांचे विचार शुद्ध आहेत, ते ही कथा श्रवण करून आश्चर्य मानणार नाहीत. ॥ ३३ ॥

एहि बिधि सब संसय करि दूरी। सिर धरि गुर पद पंकज धूरी॥
पुनि सबही बिनवउँ कर जोरी। करत कथा जेहिं लाग न खोरी॥

अशा प्रकारे सर्व संदेहांना दूर करून श्री गुरूजींच्या चरण कमलांच्या रजाला मस्तकी धारण करून मी पुन्हा हात जोडून सर्वांना विनंती करतो, त्यामुळे कथेच्या रचनेत कोणत्याही दोषाचा स्पर्श होऊ नये. ॥ १ ॥

सादर सिवहि नाइ अब माथा। बरनउँ बिसद राम गुन गाथा॥
संबत सोरह सै एकतीसा। करउँ कथा हरि पद धरि सीसा॥

आता मी आदरपूर्वक शिवजींच्या चरणावर नतमस्तक होऊन श्रीरामचंद्रजींच्या गुणांची निर्मळ कथा सांगतो. श्रीहरिच्या चरणावर, मस्तक ठेवून संवत १६३१ मध्ये या कथेचा आरंभ करत आहे. ॥२॥

नौमी भौम बार मधुमासा। अवधपुरीं यह चरित प्रकासा॥
जेहि दिन राम जनम श्रुति गावहिं। तीरथ सकल तहाँ चलि आवहिं॥

चैत्रमासाच्या नवमी तिथीस मंगळवारी श्रीअयोध्येत हे चरित्र प्रकाशित झाले. वेद म्हणतात— ज्या दिवशी श्रीरामजींचा जन्म होतो त्या दिवशी सारे तीर्थ श्रीअयोध्येत येतात. ॥ ३ ॥

असुर नाग खग नर मुनि देवा। आइ करहिं रघुनायक सेवा॥
जन्म महोत्सव रचहिं सुजाना। करहिं राम कल कीरति गाना॥

असुर, नाग, पक्षी, मनुष्य, मुनी आणि देवता सर्व अयोध्येत येऊन श्रीरघुनाथजींची सेवा करतात. बुद्धिमान लोक श्रीरामजन्माचा महोत्सव साजरा करतात आणि श्रीरामचंद्रजींच्या सुंदर कीर्तीचे गायन करतात. ॥ ४ ॥

दो०— **मज्जहिं सज्जन बृंद बहु पावन सरजू नीर।**
जपहिं राम धरि ध्यान उर सुंदर स्याम सरीर॥ ३४॥

त्या दिवशी सज्जनांचे पुष्कळसे समुदाय श्रीशरयूनदीच्या पवित्र जलात स्नान करतात आणि हृदयात सुंदर शाम शरीर असलेल्या श्रीरामचंद्रजींचे ध्यान करून त्यांच्या नामाचा जप करतात. ॥ ३४ ॥

दरस परस मज्जन अरु पाना। हरइ पाप कह बेद पुराना॥
नदी पुनीत अमित महिमा अति। कहि न सकइ सारदा बिमल मति॥

श्री शरयूनदीचे दर्शन, स्पर्श, स्नान आणि जलपान पापांचे हरण करते असे वेद-पुराणात वर्णन आहे. ही नदी फारच पवित्र आहे. हिचे माहात्म्य अनंत आहे. विमल बुद्धी असणारी सरस्वती सुद्धा हिचे माहात्म्य सांगू शकत नाही. ॥ १ ॥

राम धामदा पुरी सुहावनि। लोक समस्त बिदित अति पावनि॥
चारि खानि जग जीव अपारा। अवध तजें तनु नहिं संसारा॥

ही शोभायमान अयोध्यापुरी श्रीरामचंद्रजींचे परमधाम देणारी आहे आणि अत्यंत पवित्र आहे. ही सर्व लोकात प्रसिद्ध आहे. जगतात (अंडज, स्वेदज, उद्भिज आणि जरायुज) चार प्रकारचे अनंत जीव आहेत. त्यापैकी कोणीही अयोध्येत शरीर सोडले तर, ते पुन्हा संसारात जन्माला येत नाहीत. (जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटून भगवंताच्या परमधामात निवास करतात.) ॥ २ ॥

सब बिधि पुरी मनोहर जानी। सकल सिद्धिप्रद मंगल खानी॥
बिमल कथा कर कीन्ह अरंभा। सुनत नसाहिं काम मद दंभा॥

या अयोध्यापुरीला सर्व प्रकारांनी मनोहर, सर्व सिद्धिदायिनी आणि कल्याणाची खाण समजून मी या निर्मळ कथेचा आरंभ करत आहे. तिच्या श्रवणाने काम, मद आणि दंभ नष्ट होतात. ॥३॥

रामचरितमानस एहि नामा। सुनत श्रवन पाइअ बिश्रामा॥
मन करि बिषय अनल बन जरई। होइ सुखी जौं एहिं सर परई॥

या ग्रंथाचे नाव रामचरितमानस आहे, ज्याच्या केवळ श्रवणानेच शांती मिळते. मनरूपी हत्ती जो विषयरूपी दावानलात जळत आहे, तो जर या रामचरितमानस सरोवरात पडला तर सुखी होईल. ॥४॥

रामचरितमानस मुनि भावन। बिरचेउ संभु सुहावन पावन॥
त्रिबिध दोष दुख दारिद दावन। कलि कुचालि कुलि कलुष नसावन॥

हे रामचरितमानस मुनींना फार प्रिय आहे. या अत्यंत सुंदर आणि पवित्र अशा मानसाची शिवजींनी रचना केली आहे. हे मानस तिन्ही प्रकारचे दोष, दुःख आणि दरिद्रता यांचा तसेच कलियुगाच्या सर्व दुष्ट चालींचा आणि सर्व पापांचा नाश करणारे आहे. ॥५॥

रचि महेस निज मानस राखा। पाइ सुसमउ सिवा सन भाषा॥
तातें रामचरितमानस बर। धरेउ नाम हियँ हेरि हरषि हर॥

श्रीमहादेवजींनी आपल्या मनात रामचिरतमानसाची रचना करून ठेवली होती आणि शुभ अवसर पाहून, त्यांनी पार्वतीजीला सांगितली. म्हणून शिवजींनी याला आपल्या हृदयामध्ये अनुभवून आणि प्रसन्न होऊन याचे रामचरितमानस असे सुंदर नाव ठेवले. ॥६॥

कहउँ कथा सोइ सुखद सुहाई। सादर सुनहु सुजन मन लाई॥

मी त्या सुखदायी, सुंदर रामकथेचे वर्णन करतो. सज्जनहो! तुम्ही आदराने मन लावून ही कथा ऐका. ॥७॥

दो०— **जस मानस जेहि बिधि भयउ जग प्रचार जेहि हेतु।**
अब सोइ कहउँ प्रसंग सब सुमिरि उमा बृषकेतु॥ ३५॥

हे रामचरित मानस जसे आहे, जसे बनले आणि ज्या हेतूने जगतात याचा प्रचार झाला, आता ती सर्व कथा मी उमामहेश्वराचे स्मरण करून सांगतो. ॥३५॥

संभु प्रसाद सुमति हियँ हुलसी। रामचरितमानस कबि तुलसी॥
करइ मनोहर मति अनुहारी। सुजन सुचित सुनि लेहु सुधारी॥

भगवान् शंकरजींच्या कृपेने तुलसीदासाच्या हृदयात बुद्धीचा शुद्ध विकास झाला आणि तो रामचरितमानसाचा कवी झाला. तो आपल्या बुद्धीनुसार ह्या कवितेला मनोहर बनवित आहे. असे असले तरी हे सज्जन हो! तुम्ही शुद्ध चित्ताने ऐकून याला सुधारून घ्या. ॥१॥

सुमति भूमि थल हृदय अगाधू। बेद पुरान उदधि घन साधू॥
बरषहिं राम सुजस बर बारी। मधुर मनोहर मंगलकारी॥

सुंदर (सात्त्विक) बुद्धी भूमी आहे. हृदय हे त्यामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. वेद-पुराण समुद्र आहेत आणि साधू संत मेघ आहेत. ते (साधुरूपी मेघ) श्रीरामजींच्या सुयशरूपी सुंदर, मधुर, मनोहर आणि मंगलकारी जलाचा वर्षाव करतात. ॥ २ ॥

लीला सगुन जो कहहिं बखानी। सोइ स्वच्छता करइ मल हानी॥
प्रेम भगति जो बरनि न जाई। सोइ मधुरता सुसीतलताई॥

सगुण लीलेचे जे विस्ताराने वर्णन करतात, तीच रामसुयशरूपी जलाची निर्मळता आहे जी मलाचा नाश करते आणि ज्या प्रेमा भक्तीचे वर्णन केले जाऊ शकत नाही तीच या जलाची मधुरता आणि सुंदर शीतलता आहे. ॥ ३ ॥

सो जल सुकृत सालि हित होई। राम भगत जन जीवन सोई॥
मेधा महि गत सो जल पावन। सकिलि श्रवन मग चलेउ सुहावन॥
भरेउ सुमानस सुथल थिराना। सुखद सीत रुचि चारु चिराना॥

ते (राम-सुयशरूपी) जल सत्कर्मरूपी भाताच्या शेतीसाठी हितकर आहे आणि श्रीरामचंद्रजींच्या भक्तांचे तर जीवनच आहे. ते पवित्र जल बुद्धिरूपी पृथ्वीवर पडले आणि एकत्र होऊन पवित्र कानरूपी मार्गाने आत गेले आणि मानसरूपी श्रेष्ठ स्थानात भरून तिथेच स्थिर झाले. ते तिथेच बराच काळ स्थिर राहून सुंदर, रुचकर, शीतल आणि सुखदायी झाले. ॥ ४-५ ॥

दो०— सुठि सुंदर संबाद बर बिरचे बुद्धि बिचारि।
तेइ एहि पावन सुभग सर घाट मनोहर चारि॥ ३६ ॥

या कथेत बुद्धीने विचार करून जे चार अत्यंत सुंदर आणि उत्तम संवाद (भुशुंडी-गरुड, शिव-पार्वती, याज्ञवल्क्य-भरद्वाज आणि तुलसीदास व संत) रचले आहेत. तेच या पवित्र आणि सुंदर सरोवराचे चार मनोहर घाट आहेत. ॥ ३६ ॥

सप्त प्रबंध सुभग सोपाना। ग्यान नयन निरखत मन माना॥
रघुपति महिमा अगुन अबाधा। बरनब सोइ बर बारि अगाधा॥

सात कांड ह्याच मानस-सरोवराच्या सात पायऱ्या आहेत, ज्यांना ज्ञानरूपी नेत्राने पाहताच मन प्रसन्न होते. श्रीरामचंद्रजींच्या निर्गुण (प्राकृतिक गुणाहून अतीत) आणि निर्बाध (एकरस) माहात्म्याचे जे वर्णन केले जाईल तेच या सुंदर जलाची अथाह खोली आहे. ॥ १ ॥

राम सीय जस सलिल सुधासम। उपमा बीचि बिलास मनोरम॥
पुरइनि सघन चारु चौपाई। जुगुति मंजु मनि सीप सुहाई॥

श्रीरामचंद्रजी आणि सीताजींचे यश अमृतासारखे जल आहे. यात ज्या उपमा दिल्या आहेत तोच तरंगाचा मनोहर विलास आहे. सुंदर चौपायाच ह्यात दाट पसरलेली कमळे आहेत आणि कवितेच्या युक्त्या सुंदर मणी (मोती) उत्पन्न करणारे चमकदार शिंपले आहेत. ॥ २ ॥

छंद सोरठा सुंदर दोहा। सोइ बहुरंग कमल कुल सोहा॥
अरथ अनूप सुभाव सुभासा। सोइ पराग मकरंद सुबासा॥

जे सुंदर छन्द, सोरठे आणि दोहे आहेत, तेच यात अनेक रंगांचे कमळाचे समूह शोभत आहेत. अनुपम अर्थ, उच्च भाव आणि सुंदर भाषा ह्या पराग (पुष्परज), मकरंद (पुष्परस) आणि सुगंध आहेत. ॥ ३ ॥

सुकृत पुंज मंजुल अलि माला। ग्यान बिराग बिचार मराला॥
धुनि अवरेब कबित गुन जाती। मीन मनोहर ते बहुभाँती॥

सत्कर्मांचे (पुण्यांचे) पुंज भ्रमरांच्या सुंदर पंक्ती आहेत, ज्ञान, वैराग्य आणि विवेक हंस आहेत, कवितेचा ध्वनी वक्रोक्ती, गुण आणि जाती हे अनेक प्रकारचे मनोहर मासे आहेत. ॥ ४ ॥

अरथ धरम कामादिक चारी। कहब ग्यान बिग्यान बिचारी॥
नव रस जप तप जोग बिरागा। ते सब जलचर चारु तड़ागा॥

अर्थ, धर्म, काम, मोक्ष— हे चारही ज्ञान-विज्ञानाचा विचार सांगणे, काव्याचे नऊ रस, जप, तप, योग आणि वैराग्याचे प्रसंग— हे सर्व या सरोवराचे सुंदर जलचर जीव आहेत. ॥ ५ ॥

सुकृती साधु नाम गुन गाना। ते बिचित्र जलबिहग समाना॥
संतसभा चहुँ दिसि अवँराई। श्रद्धा रितु बसंत सम गाई॥

सुकृती (पुण्यात्मा) जन, साधू आणि श्रीरामनामाच्या गुणांचे गायन हेच विलक्षण जलपक्ष्यासारखे आहेत. संतांची सभा या सरोवराच्या चारी बाजूस असलेली आमराई (आंब्याचाबगीचा) आहे आणि श्रद्धा वसंतऋतूसारखी आहे. ॥ ६ ॥

भगति निरूपन बिबिध बिधाना। छमा दया दम लता बिताना॥
सम जम नियम फूल फल ग्याना। हरि पद रति रस बेद बखाना॥

अनेक प्रकाराने भक्तीचे निरूपण आणि क्षमा, दया तसेच दम (इंद्रिय निग्रह) वेलींचे मंडप आहेत. मनाचा निग्रह यम (अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह), नियम (शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्रणिधान) ही त्यांची फुले आहेत, ज्ञान फल आहे आणि श्रीहरिच्या चरणांमध्ये प्रेम हा या ज्ञानरूपी फलाचा रस आहे असे वेदाने म्हटले आहे. ॥ ७ ॥

औरउ कथा अनेक प्रसंगा। तेइ सुक पिक बहुबरन बिहंगा॥

यात (रामचरितमानसात) याशिवायही ज्या अनेक प्रसंगाच्या कथा आहेत त्या कथा ह्या त्यातील पोपट, कोकीळ इत्यादी अनेक रंगाचे पक्षी आहेत. ॥ ८ ॥

दो०— **पुलक बाटिका बाग बन सुख सुबिहंग बिहारु।**
माली सुमन सनेह जल सींचत लोचन चारु॥ ३७॥

कथा श्रवणाचे वेळी जे रोमांच उठतात त्याच पुष्पवाटिका, बागा आणि वन आहेत आणि जे सुख

होते तोच सुंदर पक्ष्यांचा विहार आहे. निर्मळ मन हेच माळी आहे जो सुंदर नेत्राद्वारा प्रेमरूपी जलाने त्यांचे सिंचन करतो. ॥ ३७ ॥

जे गावहिं यह चरित सँभारे। तेइ एहि ताल चतुर रखवारे॥
सदा सुनहिं सादर नर नारी। तेइ सुरबर मानस अधिकारी॥

जे लोक या चरित्रास सावधानीने गातात तेच या सरोवराचे चतुर राखणदार आहेत आणि जे स्त्री-पुरुष सदा ही कथा आदरपूर्वक श्रवण करतात, तेच या सुंदर मानसाचे अधिकारी उत्तम देवता आहेत. ॥ १ ॥

अति खल जे बिषई बग कागा। एहि सर निकट न जाहिं अभागा॥
संबुक भेक सेवार समाना। इहाँ न बिषय कथा रस नाना॥

जे अती दुष्ट आणि विषयी आहेत ते अभागी बगळे आणि कावळे आहेत. ते या सरोवरानजिक जात नाहीत. कारण येथे (या मानस सरोवरामध्ये) शंख, बेडूक आणि शेवाळ ह्यासारख्या विषयरसाच्या अनेक कथा नाहीत. ॥ २ ॥

तेहि कारन आवत हियँ हारे। कामी काक बलाक बिचारे॥
आवत एहिं सर अति कठिनाई। राम कृपा बिनु आइ न जाई॥

याच कारणामुळे बिचारे कावळेरूपी आणि बगळेरूपी विषयी लोक येथे येण्यात स्वत:ची मनापासून हार समजतात. कारण या सरोवरापर्यंत येण्यात फार अडचणी आहेत. श्रीरामचंद्रजींच्या कृपेशिवाय ते येथे येऊ शकत नाहीत. ॥ ३ ॥

कठिन कुसंग कुपंथ कराला। तिन्ह के बचन बाघ हरि ब्याला॥
गृह कारज नाना जंजाला। ते अति दुर्गम सैल बिसाला॥

घोर कुसंगच भयानक वाईट रस्ता आहे. अशा कुसंगींची वचनेच वाघ, सिंह आणि साप आहेत. घरातील कामकाज आणि गृहस्थाश्रमातील अनेक प्रकारची जंजाळे हेच अत्यंत दुर्गम मोठ-मोठे पर्वत आहेत. ॥ ४ ॥

बन बहु बिषम मोह मद माना। नदीं कुतर्क भयंकर नाना॥

मोह, मद आणि मान हीच पुष्कळ घनदाट अरण्ये आहेत तसेच नाना प्रकारचे कुतर्क ह्याच भयानक नद्या आहेत. ॥ ५ ॥

दो०— **जे श्रद्धा संबल रहित नहिं संतन्ह कर साथ।**
तिन्ह कहुँ मानस अगम अति जिन्हहि न प्रिय रघुनाथ॥ ३८ ॥

ज्यांच्याजवळ श्रद्धारूपी प्रवासखर्च नाही, संतांची साथ ज्यांना नाही आणि ज्यांना श्रीरघुनाथजी प्रिय नाहीत, त्यांच्यासाठी हे मानस अत्यंत कठीण आहे (अर्थात् श्रद्धा, सत्संग आणि भगवत्प्रेमाविना कोणीही मला प्राप्त करू शकत नाही.) ॥ ३८ ॥

जौं करि कष्ट जाइ पुनि कोई। जातहिं नीद जुड़ाई होई॥
जड़ता जाड़ बिषम उर लागा। गएहुँ न मज्जन पाव अभागा॥

जरी एखादा माणूस कष्ट सहन करून तेथपर्यंत पोहचला, तरी तेथे जाताच त्याला निद्रारूपी नशा चढू लागते, हृदयात मूर्खतारूपी कडाक्याची थंडी वाजू लागते, ज्यामुळे तेथे जाऊन सुद्धा तो अभागी स्नान करू शकत नाही. ॥ १ ॥

करि न जाइ सर मज्जन पाना। फिरि आवइ समेत अभिमाना॥
जौं बहोरि कोउ पूछन आवा। सर निंदा करि ताहि बुझावा॥

तो त्या सरोवरात स्नान आणि जलपान तर करतच नाही. उलट अभिमानाने परततो. जर त्याला कोणी तेथील स्थिती विचारली तर तो (स्वत:च्या अभाग्याची गोष्ट न सांगता) त्या सरोवराची निंदा करून त्याला समजावतो. ॥ २ ॥

सकल बिघ्न ब्यापहिं नहिं तेही। राम सुकृपाँ बिलोकहिं जेही॥
सोइ सादर सर मज्जनु करई। महा घोर त्रयताप न जरई॥

जेव्हा श्रीरामचंद्रजी सुंदर कृपादृष्टीने पाहतात तेव्हा ही सर्व विघ्ने त्याला बाधत नाहीत आणि तोच आदराने या सरोवरात स्नान करतो व तो महान भयानक त्रितापाने (आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक तापांनी) जळत नाही. ॥ ३ ॥

ते नर यह सर तजहिं न काऊ। जिन्ह कें राम चरन भल भाऊ॥
जो नहाइ चह एहिं सर भाई। सो सतसंग करउ मन लाई॥

ज्यांना श्रीरामचंद्रजींचे चरण विशेष प्रिय आहेत ते या सरोवराचा कधीही त्याग करत नाहीत. सज्जनहो! जो या सरोवरात स्नान करू इच्छितो त्याने मन लावून सत्संग केला पाहिजे. ॥ ४ ॥

अस मानस मानस चख चाही। भइ कबि बुद्धि बिमल अवगाही॥
भयउ हृदयँ आनंद उछाहू। उमगेउ प्रेम प्रमोद प्रबाहू॥

अशा मानस-सरोवरास हृदयरूपी नेत्राने पाहून आणि त्यात डुबकी मारून कविची बुद्धी निर्मळ झाली आणि त्याचे हृदय आनंद आणि उत्साहाने भरून गेले व त्यातून प्रेम व आनंदाचा प्रवाह ओसंडून वाहू लागला. ॥ ५ ॥

चली सुभग कबिता सरिता सो। राम बिमल जस जल भरिता सो॥
सरजू नाम सुमंगल मूला। लोक बेद मत मंजुल कूला॥

त्यापासून ती मधुर कवितारूपी नदी वाहू लागली, ज्यात श्रीरामचंद्रजींचे निर्मळ यशरूपी जल भरलेले आहे. हिचे (कवितारूपिणी नदीचे) नाव शरयू आहे जी संपूर्ण सुंदर मंगलाची मूळ आहे. लोकमत आणि वेदमत हिचे दोन तट आहेत. ॥ ६ ॥

नदी पुनीत सुमानस नंदिनि। कलिमल तृन तरु मूल निकंदिनि॥

ह्या सुंदर मानस सरोवराची कन्या शरयू नदी अती पवित्र आहे आणि कलियुगाच्या पापरूपी (लहान-मोठ्या) रोपट्यांना आणि वृक्षांना मुळासकट उपटणारी आहे. ॥ ७ ॥

दो०— **श्रोता त्रिबिध समाज पुर ग्राम नगर दुहुँ कूल।**
संतसभा अनुपम अवध सकल सुमंगल मूल॥ ३९ ॥

तिन्ही प्रकारच्या श्रोत्यांचा समाज हाच या नदीच्या दोन्ही तटावर वसलेले पूर, गाव आणि नगर आहेत आणि संतांची सभा हीच सर्वांग सुंदर मंगलांची मूळ अनुपम अयोध्या आहे. ॥ ३९ ॥

रामभगति सुरसरितहि जाई। मिली सुकीरति सरजु सुहाई॥
सानुज राम समर जसु पावन। मिलेउ महानदु सोन सुहावन॥

सुंदर कीर्तिरूपी मधुर शरयू रामभक्तिरूपी गंगेत मिळाली. धाकटे बंधू लक्ष्मणासह श्रीरामचंद्रजींच्या युद्धाचा पवित्र यशरूपी सुंदर महानद सोन त्यात मिसळला. ॥ १ ॥

जुग बिच भगति देवधुनि धारा। सोहति सहित सुबिरति बिचारा॥
त्रिबिध ताप त्रासक तिमुहानी। राम सरूप सिंधु समुहानी॥

दोन्हींच्या मध्यभागी भक्तिरूपी गंगेची धार ज्ञान आणि वैराग्यासह शोभत आहे. अशी त्रिविध तापांना भयभीत करणारी ही त्रिवेणी संगम झालेली नदी श्रीरामस्वरूपरूपी समुद्राकडे जात आहे. ॥ २ ॥

मानस मूल मिली सुरसरिही। सुनत सुजन मन पावन करिही॥
बिच बिच कथा बिचित्र बिभागा। जनु सरि तीर तीर बन बागा॥

कीर्तिरूपी शरयूचे मूळ मानस (श्रीरामचरित्र) आहे आणि रामभक्तिरूपी गंगेत मिळाली. म्हणून ही श्रवण करणाऱ्या सज्जनांच्या मनाला पवित्र करील. हिच्या मध्यात ज्या भिन्न-भिन्न प्रकारच्या विचित्र कथा आहेत त्याच जणू नदी तटाच्या आसपासची वने आणि बागा आहेत. ॥ ३ ॥

उमा महेस बिबाह बराती। ते जलचर अगनित बहुभाँती॥
रघुबर जनम अनंद बधाई। भवँर तरंग मनोहरताई॥

भगवान् शिवजी आणि पार्वतीजीच्या विवाहातील वऱ्हाडी हे या नदीतील अनेक प्रकारचे असंख्य जलचर जीव आहेत. श्रीरघुनाथजींच्या जन्मप्रसंगातील आनंदोत्सव हे या नदीतील भोवरे आणि तरंगाची मनोहरता आहे. ॥ ४ ॥

दो०— **बालचरित चहु बंधु के बनज बिपुल बहुरंग।**
नृप रानी परिजन सुकृत मधुकर बारि बिहंग॥ ४० ॥

चारही भावंडाचे जे बालचरित्र आहे तीच यात फुललेली पुष्कळशी रंगी-बेरंगी कमळे आहेत. महाराज श्री दशरथ तसेच त्यांच्या राण्या आणि कुटुंबियांचे सत्कर्म (पुण्य) हेच भ्रमर आणि जलपक्षी आहेत. ॥ ४० ॥

सीय स्वयंबर कथा सुहाई। सरित सुहावनि सो छबि छाई॥
नदी नाव पटु प्रस्न अनेका। केवट कुसल उतर सबिबेका॥

श्रीसीताजींच्या स्वयंवराची जी मधुर कथा आहे तीच या नदीत अत्यंत शोभायमान होत आहे. अनेक सुंदर विचारपूर्ण प्रश्न ह्याच नदीतील नावा आहेत आणि विवकेयुक्त उत्तरे हे त्यांचे सुंदर केवट आहेत. ॥ १ ॥

सुनि अनुकथन परस्पर होई। पथिक समाज सोह सरि सोई॥
घोर धार भृगुनाथ रिसानी। घाट सुबद्ध राम बर बानी॥

ह्या कथा श्रवणानंतर आपसात जी चर्चा होते तो या नदीच्या कडेने चालणाऱ्या यात्रिकांचा समाज शोभत आहे. परशुरामाचा क्रोध या नदीतील भयानक धार आहे आणि श्रीरामचंद्रजींचे श्रेष्ठ वचन हेच मनोहर बांधीव घाट आहेत. ॥ २ ॥

सानुज राम बिबाह उछाहू। सो सुभ उमग सुखद सब काहू॥
कहत सुनत हरषहिं पुलकाहीं। ते सुकृती मन मुदित नहाहीं॥

भावंडासहित श्रीरामचंद्रजींच्या विवाहाचा उत्साह हाच या कथा नदीचा कल्याणकारी पूर आहे, जो सर्वांना सुख देणारा आहे. याच्या श्रवणाने आणि वर्णनाने जे हर्षित आणि पुलकित होतात तेच पुण्यात्मा पुरुष प्रसन्न मनाने या नदीत स्नान करतात. ॥ ३ ॥

राम तिलक हित मंगल साजा। परब जोग जनु जुरे समाजा॥
काई कुमति केकई केरी। परी जासु फल बिपति घनेरी॥

श्रीरामचंद्रजींच्या राजतिलकासाठी जो मंगल साज सजविला गेला. तोच जणुकाही पर्वसमयी या नदीवर जमलेले यात्रिकांचे समूह आहेत. कैकयीची कुबुद्धी हीच या नदीत शेवाळे आहे ज्याच्या फलस्वरूपात फार मोठी आपत्ती कोसळली. ॥ ४ ॥

दो०— **समन अमित उतपात सब भरत चरित जपजाग।**
कलि अघ खल अवगुन कथन ते जलमल बग काग॥ ४१ ॥

संपूर्ण अगणित उत्पातांना शांत करणारे भरतजींचे चरित्र हा नदीतटावर केला जाणारा जपयज्ञ आहे. कलियुगातील पापी आणि दुष्ट यांच्या अवगुणांचे जे वर्णन आहे, तेच या नदीच्या पाण्यातील चिखल आणि बगळे-कावळे आहेत. ॥ ४१ ॥

कीरति सरित छहूँ रितु रूरी। समय सुहावनि पावनि भूरी॥
हिम हिमसैलसुता सिव ब्याहू। सिसिर सुखद प्रभु जनम उछाहू॥

ही कीर्तिरूपिणी नदी साही ऋतूत मधुर आहे. सर्व समयी ही परम सुंदर आणि अत्यंत पवित्र आहे. यात शिव-पार्वतीचा विवाह हेमंतऋतू आहे. श्रीरामचंद्रजींचा जन्मोत्सव सुखदायी शिशिर-ऋतू आहे. ॥ १ ॥

बरनब राम बिबाह समाजू। सो मुद मंगलमय रितुराजू॥
ग्रीषम दुसह राम बनगवनू। पंथकथा खर आतप पवनू॥

श्रीरामचद्रजींच्या विवाह-समाजाचे वर्णन हाच आनंददायी मंगलमय ऋतुराज वसंत आहे. श्रीरामजींचे वनगमन हा दु:सह ग्रीष्मऋतू आहे आणि वनमार्गाची कथा हेच कडक ऊन आणि गरम हवा आहेत. ॥ २ ॥

बरषा घोर निसाचर रारी। सुरकुल सालि सुमंगलकारी॥
राम राज सुख बिनय बड़ाई। बिसद सुखद सोइ सरद सुहाई॥

राक्षसांबरोबर झालेले घोर युद्ध हाच वर्षाऋतू आहे, जो देवकुलरूपी भातशेतीसाठी सुंदर कल्याण करणारा आहे. श्रीरामचंद्रजींच्या राज्य कालातील सुख, विनम्रता आणि मोठेपणा हाच निर्मळ सुख देणारा आल्हाददायी शरद्ऋतू आहे. ॥ ३ ॥

सती सिरोमनि सिय गुन गाथा। सोइ गुन अमल अनूपम पाथा॥
भरत सुभाउ सुसीतलताई। सदा एकरस बरनि न जाई॥

सती-शिरोमणी श्रीसीताजींच्या गुणांची जी कथा आहे तीच या जलाचा निर्मळ आणि अनुपम गुण आहे. भरतजींच्या स्वभाव या नदीची सुंदर शीतलता आहे, जी सदा एकसारखी राहते आणि ज्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही. ॥ ४ ॥

दो:— **अवलोकनि बोलनि मिलनि प्रीति परसपर हास।**
भायप भलि चहु बंधु की जल माधुरी सुबास॥ ४२॥

चारही भांवडाचे परस्पर पाहणे, बोलणे, भेटणे, एकमेकांवर प्रेम करणे, हसणे आणि सुंदर बंधुत्व या जलाची मधुरता आणि सुगंध आहे. ॥ ४२ ॥

आरति बिनय दीनता मोरी। लघुता ललित सुबारि न थोरी॥
अदभुत सलिल सुनत गुनकारी। आस पिआस मनोमल हारी॥

माझा आर्तभाव, विनय आणि दीनता या सुंदर आणि निर्मळ जलाचा अत्यंत हलकेपणा आहे. हे जल फारच विलक्षण आहे, ज्याच्या महिमा श्रवणानेच लाभ होतो व आशारूपी तृष्णा आणि मनाची मलिनता दूर होते. ॥ १ ॥

राम सुप्रेमहि पोषत पानी। हरत सकल कलि कलुष गलानी॥
भव श्रम सोषक तोषक तोषा। समन दुरित दुख दारिद दोषा॥

हे जल श्रीरामचंद्रजींच्या सुंदर प्रेमाला पुष्ट करते. कलियुगाच्या संपूर्ण पापांना आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या ग्लानीला हरण करते. (संसाराच्या जन्म-मृत्युरूपी) श्रमाला नाहीसे करते. संतोषालाही संतुष्ट करते आणि पाप,ताप, दरिद्रता तसेच दोष यांना नष्ट करून टाकते. ॥ २ ॥

काम कोह मद मोह नसावन। बिमल बिबेक बिराग बढ़ावन॥
सादर मज्जन पान किए तें। मिटहिं पाप परिताप हिए तें॥

हे जल काम, क्रोध, मद आणि मोह यांचा नाश करणारे आणि निर्मळ ज्ञान व वैराग्य हे

वाढविणारे आहे. यात आदराने स्नान करण्याने आणि हे जल पिण्याने अंत:करणातील सर्व पाप-ताप समाप्त होतात. ॥ ३ ॥

जिन्ह एहिं बारि न मानस धोए। ते कायर कलिकाल बिगोए।
तृषित निरखि रबि कर भव बारी। फिरिहहिं मृग जिमि जीव दुखारी।।

ज्यांनी या (राम-सुयशरूपी) जलाने आपल्या अंत:करणाला स्वच्छ केले नाही ते भित्रेलोक कलिकालाकडून फसवले गेले असे समजावे. जसे तहानेले हरिण वास्तविक जल समजून पाणी पिण्यासाठी मृगजळामागे धावतो आणि जल न मिळाल्याने दु:खी होतो. तसेच हे (कलियुगाकडून फसवले गेलेले) जीवसुद्धा (विषयाच्या मागे भटकून) दु:खी होतील. ॥ ४ ॥

दो०— **मति अनुहारि सुबारि गुन गन गनि मन अन्हवाइ।**
सुमिरि भवानी संकरहि कह कबि कथा सुहाइ।। ४३ (क)।।

(कवि तुलसीदास) स्वत:च्या बुद्धीनुसार या मधुर जलाच्या गुणांचा विचार करून, त्यात आपल्या मनाला स्नान घालून आणि भवानी शंकरजींचे स्मरण करून सुंदर कथा सांगतो. ॥ ४३ ॥ क

अब रघुपति पद पंकरुह हियँ धरि पाइ प्रसाद।
कहउँ जुगल मुनिबर्य कर मिलन सुभग संबाद।। ४३ (ख)।।

मी आता श्रीरघुनाथांच्या चरणकमलांना हृदयात धारण करून आणि त्यांचा प्रसाद प्राप्त करून दोन्ही श्रेष्ठ मुनींच्या मिलनाचा सुंदर संवाद वर्णन करतो. ॥ ४३ ॥ ख

भरद्वाज मुनि बसहिं प्रयागा। तिन्हहि राम पद अति अनुरागा।।
तापस सम दम दया निधाना। परमारथ पथ परम सुजाना।।

भरद्वाज मुनी प्रयागात वास्तव्य करतात. त्यांचे श्रीरामजींच्या चरणी अत्यंत प्रेम आहे. ते तपस्वी, निग्रहीचित्त,जितेंद्रिय, दयेचे निधान आणि परमार्थ मार्गात फारच कुशल आहेत. ॥ १ ॥

माघ मकरगत रबि जब होई। तीरथपतिहिं आव सब कोई।।
देव दनुज किंनर नर श्रेनीं। सादर मज्जहिं सकल त्रिबेनीं।।

माघ महिन्यात जेव्हा सूर्य मकर राशीत जातो तेव्हा सर्व लोक तीर्थराज प्रयागला स्नानासाठी येतात. देवता, दैत्य, किन्नर आणि अनेक माणसे सर्व आदरपूर्वक त्रिवेणीत स्नान करतात. ॥२ ॥

पूजहिं माधव पद जलजाता। परसि अखय बटु हरषहिं गाता।।
भरद्वाज आश्रम अति पावन। परम रम्य मुनिबर मन भावन।।

श्रीवेणीमाधवजींच्या चरणकमलांची ते पूजा करतात आणि अक्षय वटाला स्पर्श करताच ते आनंदाने पुलकित होतात. भरद्वाजांचा आश्रम फारच पवित्र, परम रमणीय आणि श्रेष्ठ मुनींच्या मनाला आवडणारा आहे. ॥ ३ ॥

तहाँ होइ मुनि रिषय समाजा। जाहिं जे मज्जन तीरथ राजा॥
मज्जहिं प्रात समेत उछाहा। कहहिं परसपर हरि गुन गाहा॥

तीर्थराज प्रयागात ऋषि-मुनींचा समाज तेथे (भरद्वाजांच्या आश्रमात) स्नान करण्यासाठी एकत्र जमतो. प्रातःकाळी सर्वजण उत्साहाने स्नान करतात आणि मग भगवत्गुणवर्णनाच्या कथा एकमेकांना सांगतात. ॥ ४ ॥

दो०— ब्रह्म निरूपन धरम बिधि बरनहिं तत्त्व बिभाग।
कहहिं भगति भगवंत कै संजुत ग्यान बिराग॥ ४४॥

ब्रह्माचे निरूपण, धर्माचे विधान आणि तत्त्वांच्या विभागांचे वर्णन करतात. तसेच ज्ञान-वैराग्ययुक्त भगवत्भक्तीचे कथन करतात. ॥ ४४ ॥

एहि प्रकार भरि माघ नहाहीं। पुनि सब निज निज आश्रम जाहीं॥
प्रति संबत अति होइ अनंदा। मकर मज्जि गवनहिं मुनिबृंदा॥

अशाप्रकारे संपूर्ण माघमहिनाभर स्नान करतात आणि मग सर्वजण आपापल्या आश्रमाला जातात. प्रत्येक वर्षी तेथे याच पद्धतीने आनंदोत्सव होतो. मकरात स्नान करून मुनीगण निघून जातात. ॥ १ ॥

एक बार भरि मकर नहाए। सब मुनीस आश्रमन्ह सिधाए॥
जागबलिक मुनि परम बिबेकी। भरद्वाज राखे पद टेकी॥

एकदा संपूर्ण माघमहिनाभर स्नान करून सर्व मुनिश्वर आपापल्या आश्रमाकडे निघून गेले. परम ज्ञानी याज्ञवल्क्यमुनींचे चरण पकडून विनंती करून भरद्वाजांनी त्यांना ठेवून घेतले. ॥ २ ॥

सादर चरन सरोज पखारे। अति पुनीत आसन बैठारे॥
करि पूजा मुनि सुजसु बखानी। बोले अति पुनीत मृदु बानी॥

त्यांची आदराने त्यांनी पाद्यपूजा केली आणि उत्तम,पवित्र आसनावर त्यांना बसविले. पूजा करून याज्ञवल्क्यमुनींच्या सुयशाचे वर्णन केले आणि मग अत्यंत पवित्र आणि कोमल वाणीने म्हणाले— ॥ ३ ॥

नाथ एक संसउ बड़ मोरें। करगत बेदतत्त्व सबु तोरें॥
कहत सो मोहि लागत भय लाजा। जौं न कहउँ बड़ होइ अकाजा॥

हे नाथ! माझ्या मनात एक फार मोठा संदेह आहे. वेदांची सर्व तत्त्व आपल्या मुठीत आहेत (अर्थात् वेदांचे तत्त्व जाणणारे असल्याकरणाने आपणच माझा संदेह निवारण करू शकता.) परंतु तो संदेह आपल्यापुढे सांगताना मला भय आणि लाज वाटत आहे. (भय यासाठी वाटत आहे की, तुम्ही असे कधी समजू नये की, हा तर माझी परीक्षा घेत आहे आणि लाज यासाठी वाटत आहे की, एवढे आयुष्य गेले तरी अजून ज्ञान झाले नाही.) आणि प्रश्न न विचारावा तर फार मोठी हानी होत आहे. (कारण अज्ञानीच राहील.) ॥ ४ ॥

दो०— **संत कहहिं असि नीति प्रभु श्रुति पुरान मुनि गाव।**
होइ न बिमल बिबेक उर गुर सन किएँ दुराव॥ ४५॥

हे प्रभू! संत लोक अशी नीती सांगतात आणि वेद,पुराण तसेच मुनिजन सुद्धा हेच सांगतात की, गुरूजींपासून आपली स्थिती लपवल्याने हृदयात पवित्र ज्ञान होत नाही.॥ ४५॥

अस बिचारि प्रगटउँ निज मोहू। हरहु नाथ करि जन पर छोहू॥
राम नाम कर अमित प्रभावा। संत पुरान उपनिषद गावा॥

हाच विचार करून मी माझे अज्ञान प्रगट करत आहे. हे नाथ! या सेवकावर कृपा करावी आणि माझे अज्ञान नाहीसे करावे. संतांनी,पुराणांनी आणि उपनिषदांनी रामनामाच्या असीम प्रभावाचे वर्णन केले आहे.॥ १॥

संतत जपत संभु अबिनासी। सिव भगवान ग्यान गुन रासी॥
आकर चारि जीव जग अहहीं। कासीं मरत परम पद लहहीं॥

कल्याणस्वरूपी ज्ञान आणि गुण ह्यांची राशी असलेले अविनाशी भगवान् शिवजी निरंतर रामनामाचा जप करत राहतात. संसारात चार प्रकारचे जीव आहेत. काशीत शरीर सोडल्यास सर्वच परमपद प्राप्त करतात.॥ २॥

सोपि राम महिमा मुनिराया। सिव उपदेसु करत करि दाया॥
रामु कवन प्रभु पूछउँ तोही। कहिअ बुझाइ कृपानिधि मोही॥

हे मुनिराज! तीही रामाचीच (नामाचीच) महिमा आहे. कारण भगवान् शिवजी दया करून (काशीत मरणाऱ्या जीवाला) रामनामाचाच उपदेश करतात. (याचमुळे त्यांना परमपद प्राप्त होते.) हे प्रभू! मी आपणाला विचारतो की, ते राम कोण आहेत? हे कृपानिधान! मला समजावून सांगा.॥ ३॥

एक राम अवधेस कुमारा। तिन्ह कर चरित बिदित संसारा॥
नारि बिरहँ दुखु लहेउ अपारा। भयउ रोषु रन रावनु मारा॥

एक राम तर अवधनरेश दशरथांचे पुत्र आहेत, त्यांचे चरित्र सर्व जगत जाणते. त्यांनी पत्नीच्या विरहात अपार दुःख सहन केले आणि क्रोध आल्यावर युद्धात रावणाला ठार केले.॥ ४॥

दो०— **प्रभु सोइ राम कि अपर कोउ जाहि जपत त्रिपुरारि।**
सत्यधाम सर्बग्य तुम्ह कहहु बिबेकु बिचारि॥ ४६॥

हे प्रभो! तेच राम आहेत अथवा कोणी दुसरे आहेत, ज्यांचा शिवजी जप करतात? तुम्ही सत्याचे धाम आहात आणि सर्व काही जाणता. म्हणून हे तत्त्वज्ञान विचार करून सांगा.॥ ४६॥

जैसें मिटै मोर भ्रम भारी। कहहु सो कथा नाथ बिस्तारी॥
जागबलिक बोले मुसुकाई। तुम्हहि बिदित रघुपति प्रभुताई॥

हे नाथ! ज्या रीतीने माझा भ्रम निरास होईल अशा रीतीने आपण तीच कथा विस्तार-पूर्वक सांगावी. यावर याज्ञवल्क्य मधुर हास्य करून म्हणाले—तुम्ही श्रीरघुनाथजींच्या प्रभुतेला जाणताच. ॥ १ ॥

रामभगत तुम्ह मन क्रम बानी। चतुराई तुम्हारि मैं जानी॥
चाहहु सुनै राम गुन गूढ़ा। कीन्हिहु प्रस्न मनहुँ अति मूढ़ा॥

तुम्ही मन, वचन आणि कर्माने श्रीरामजीचे भक्त आहात. तुमच्या चातुर्याला मी जाणले आहे. तुम्ही श्रीरामचंद्रजींच्या रहस्यमय गुणांना जाणू इच्छिता. म्हणूनच तुम्ही असा प्रश्न केला की, जणू काही फार अज्ञानी आहात. ॥ २ ॥

तात सुनहु सादर मनु लाई। कहउँ राम कै कथा सुहाई॥
महामोहु महिषेसु बिसाला। रामकथा कालिका कराला॥

हे तात! तुम्ही आदराने मन लावून ऐका. मी श्रीरामजींची सुंदर कथा सांगतो. फार मोठे अज्ञान जणू काही विशाल महिषासुर आहे आणि श्रीरामजीची कथा (त्याला नष्ट करणारी) भयंकर कालीमाता आहे. ॥ ३ ॥

रामकथा ससि किरन समाना। संत चकोर करहिं जेहि पाना॥
ऐसेइ संसय कीन्ह भवानी। महादेव तब कहा बखानी॥

श्रीरामजींची कथा चंद्रकिरणांसारखी आहे, ज्याचे संतरूपी चकोर अखंड पान करतात. असाच संशय पार्वतीजीस आला होता. तेव्हा शंकरजींनी त्याचे विस्ताराने उत्तर दिले होते. ॥ ४ ॥

दो०— **कहउँ सो मति अनुहारि अब उमा संभु संबाद।**
भयउ समय जेहि हेतु जेहि सुनु मुनि मिटिहि बिषाद॥ ४७॥

आता मी आपल्या बुद्धीनुसार तोच उमा-महेश्वर संवाद सांगतो. तो ज्यावेळी आणि ज्या कारणाने झाला, हे मुनी! तो तुम्ही श्रवण करा. तुमचा विषाद समाप्त होईल. ॥ ४७ ॥

एक बार त्रेता जुग माहीं। संभु गए कुंभज रिषि पाहीं॥
संग सती जगजननि भवानी। पूजे रिषि अखिलेस्वर जानी॥

एकदा त्रेतायुगात भगवान् शंकरजी अगस्त्यऋषिंना भेटण्यास गेले. त्यांच्या सोबत जगज्जननी भवानी सतीजी सुद्धा होती. अगस्त्यऋषिंनी संपूर्ण जगताचे ईश्वर जाणून त्यांची पूजा केली. ॥ १ ॥

रामकथा मुनिबर्ज बखानी। सुनी महेस परम सुखु मानी॥
रिषि पूछी हरिभगति सुहाई। कही संभु अधिकारी पाई॥

श्रेष्ठ मुनी अगस्त्यजींनी शंकरजींना रामकथा विस्ताराने सांगितली. त्यावेळी परम सुख मानून शिवजींनी ती कथा श्रवण केली. त्यानंतर ऋषिंनी शंकरजींना हरिभक्तीविषयी सुंदर प्रश्न केला आणि शंकरजींनी योग्य अधिकारी समजून त्यांना भक्तीचे रहस्य निरूपण केले. ॥ २ ॥

कहत सुनत रघुपति गुन गाथा। कछु दिन तहाँ रहे गिरिनाथा॥
मुनि सन बिदा मागि त्रिपुरारी। चले भवन सँग दच्छकुमारी॥

श्रीरघुनाथजींच्या गुणांच्या कथा सांगत-ऐकत काही दिवस भगवान् शंकरजी तिथेच राहिले. मग मुनींचा निरोप घेऊन शिवजी दक्षकुमारी सतीजीबरोबर आपल्या स्थानाकडे (कैलासाकडे) निघाले. ॥ ३ ॥

तेहि अवसर भंजन महिभारा। हरि रघुबंस लीन्ह अवतारा॥
पिता बचन तजि राजु उदासी। दंडक बन बिचरत अबिनासी॥

त्याच काळात पृथ्वीचा भार हरण करण्यासाठी श्रीहरिंनी रघुवंशात अवतार घेतला होता. ते अविनाशी भगवान् त्यावेळी पित्याच्या आज्ञेने राज्याचा त्याग करून तपस्वी अशा साधू वेशात दंडकवनातून चालले होते. ॥ ४ ॥

दो०— **हृदयँ बिचारत जात हर केहि बिधि दरसनु होइ।**
गुप्त रूप अवतरेउ प्रभु गएँ जान सबु कोइ॥ ४८ (क)॥

भगवान् शिवजी मनात विचार करत जात होते की, आपणाला भगवंताचे दर्शन केव्हा होईल, कारण प्रभूने तर गुप्तरूपाने अवतार घेतला आहे आणि माझ्या जाण्याने सर्व लोक ते रहस्य जाणतील. ॥ ४८ ॥ क

सो०— **संकर उर अति छोभु सती न जानहिं मरमु सोइ।**
तुलसी दरसन लोभु मन डरु लोचन लालची॥ ४८ (ख)॥

शिवजींच्या मनात हा विचार येताच ते फार अस्वस्थ झाले, परंतु सतीजींना या गोष्टीची कल्पना नव्हती. तुलसीदासजी म्हणतात की, शिवजींच्या मनात रहस्य प्रगट होण्याचे भय होते परंतु दर्शनाच्या लालसेने त्यांचे नेत्र लाचावले होते. ॥ ४८ ॥ ख

रावन मरन मनुज कर जाचा। प्रभु बिधि बचनु कीन्ह चह साचा॥
जौं नहिं जाउँ रहइ पछितावा। करत बिचारु न बनत बनावा॥

रावणाने (ब्रह्मदेवापासून) आपला मृत्यू मनुष्याच्या हातून व्हावा असा वर मागितला होता. प्रभू ब्रह्मदेवाचे वचन सत्य करू इच्छित आहेत. मी जर आत्ता जवळ गेलो नाही तर मला नंतर फार पश्चात्ताप होईल. अशाप्रकारे शिवजी विचार करत आहेत, परंतु नेमकी युक्ती सुचत नव्हती. ॥ १ ॥

एहि बिधि भए सोचबस ईसा। तेही समय जाइ दससीसा॥
लीन्ह नीच मारीचहि संगा। भयउ तुरत सोइ कपट कुरंगा॥

अशाप्रकारे शिवजी चिंताग्रस्त होते. त्याच काळात नीच रावणाने मारीचाला बरोबर घेतले आणि तो (मारीच) तात्काळ कपटमृग बनला. ॥ २ ॥

करि छलु मूढ़ हरी बैदेही। प्रभु प्रभाउ तस बिदित न तेही॥
मृग बधि बंधु सहित हरि आए। आश्रमु देखि नयन जल छाए॥

रावणाने मूर्खपणाने छल करून सीताजींचे हरण केले. त्याला श्रीरामचंद्रजींच्या वास्तविक प्रभावाचे काहीच ज्ञान नव्हते. हरिणाला मारून बंधू लक्ष्मणासह श्रीरामचंद्रजी आश्रमात आले आणि आश्रमाला रिते पाहून (अर्थात् तेथे सीताजींना नसलेले पाहून) त्यांचे नेत्र पाणावले. ॥ ३ ॥

बिरह बिकल नर इव रघुराई। खोजत बिपिन फिरत दोउ भाई॥
कबहूँ जोग बियोग न जाकें। देखा प्रगट बिरह दुखु ताकें॥

श्री रघुनाथजी मानवासारखे विरहाने व्याकूळ आहेत आणि दोन्ही बंधू सीताजींचा शोध घेत वनात फिरत आहेत. ज्यांचा कधी कोणाशी संयोग-वियोग होतच नाही त्यांच्यात प्रत्यक्ष विरहाचे दु:ख दिसू लागले. ॥ ४ ॥

दो०— **अति बिचित्र रघुपति चरित जानहिं परम सुजान।**
जे मतिमंद बिमोह बस हृदयँ धरहिं कछु आन॥ ४९॥

श्रीरघुनाथजींचे चरित्र मोठे विलक्षण आहे. पूर्ण ज्ञानीच ते जाणू शकतात. मंदबुद्धी लोक तर अधिक मोहग्रस्त होऊन अंत:करणात वेगळ्याच प्रकाराने समजून बसतात. ॥ ४९ ॥

संभु समय तेहि रामहि देखा। उपजा हियँ अति हरषु बिसेषा॥
भरि लोचन छबिसिंधु निहारी। कुसमय जानि न कीन्हि चिन्हारी॥

श्रीशिवजींनी त्याच वेळी श्रीरामचंद्रजींना पाहिले आणि त्यांच्या हृदयात फार आनंद उमडला. त्या सौंदर्य सिंधू श्रीरामचंद्रजींना शंकरजीनी डोळे भरून पाहिले, परंतु ही वेळ योग्य नसल्यामुळे त्यांच्याशी संपर्क केला नाही. ॥ १ ॥

जय सच्चिदानंद जग पावन। अस कहि चलेउ मनोज नसावन॥
चले जात सिव सती समेता। पुनि पुनि पुलकत कृपानिकेता॥

''जगत पवित्र करणाऱ्या सच्चिदानंदांची जय हो'' असे म्हणून कामदेवाचा नाश करणारे शंकरजी पुढे निघाले. कृपानिधान शिवजी वारंवार आनंदाने पुलकित होऊन सतीजीबरोबर जात होते. ॥ २ ॥

सतीं सो दसा संभु कै देखी। उर उपजा संदेहु बिसेषी॥
संकरु जगतबंद्य जगदीसा। सुर नर मुनि सब नावत सीसा॥

सतीजींनी शिवजींची ती स्थिती पाहिली तेव्हा तिच्या मनात फार मोठा संशय उत्पन्न झाला. (ती मनातल्या मनातच म्हणू लागली की,) सारे जगत् भगवान् शंकरजींना वंदन करते, ते जगताचे ईश्वर आहेत. ऋषी, मुनी, मानव सर्व त्यांच्यापुढे नतमस्तक होतात. ॥ ३ ॥

तिन्ह नृपसुतहि कीन्ह परनामा। कहि सच्चिदानंद परधामा॥
भए मगन छबि तासु बिलोकी। अजहुँ प्रीति उर रहति न रोकी॥

त्यांनी एका राजपुत्राला सच्चिदानन्द परमधाम म्हणून प्रणाम केला आणि त्यांचे सौंदर्य पाहून ते इतके प्रेममग्न झाले की, त्यांच्या हृदयातील प्रेमप्रवाहाला ते आता थांबवू शकत नव्हते. ॥ ४ ॥

दो०— **ब्रह्म जो ब्यापक बिरज अज अकल अनीह अभेद।**
सो कि देह धरि होइ नर जाहि न जानत बेद॥ ५०॥

जे ब्रह्म सर्वव्यापक, मायारहित, अजन्मा, अगोचर, इच्छारहित आणि भेदरहित आहे आणि ज्याला वेदसुद्धा जाणू शकत नाहीत, त्या ब्रह्माने देह धारण केला तरी ते मनुष्य कसे होतील?॥ ५०॥

बिष्नु जो सुर हित नरतनु धारी। सोउ सर्बग्य जथा त्रिपुरारी॥
खोजइ सो कि अग्य इव नारी। ग्यानधाम श्रीपति असुरारी॥

देवतांच्या हितासाठी मानव शरीर धारण केलेले विष्णु भगवान् हेही शिवजीसारखे सर्वज्ञ आहेत. ते ज्ञानाचे भांडार, लक्ष्मीपती आणि असुरांचे शत्रु असे भगवान् विष्णु काय अज्ञान्यासारखे पत्नीचा शोध करत फिरतील?॥ १॥

संभुगिरा पुनि मृषा न होई। सिव सर्बग्य जान सबु कोई॥
अस संसय मन भयउ अपारा। होइ न हृदयँ प्रबोध प्रचारा॥

पण शंकरजींचे वचनही खोटे होऊ शकत नाही. भगवान् शंकरजी सर्वज्ञ आहेत हे सर्वांना ठाऊक आहे. सतीजींच्या मनात अशा प्रकारचा फार मोठा संदेह निर्माण झाला आणि कोणत्याही उपायाने तिच्या मनात निर्णयात्मक ज्ञानाचा प्रादुर्भाव होत नव्हता.॥ २॥

जद्यपि प्रगट न कहेउ भवानी। हर अंतरजामी सब जानी॥
सुनहि सती तव नारि सुभाऊ। संसय अस न धरिअ उर काऊ॥

जरी सतीजी उघड काहीच बोलली नाही परंतु अंतर्यामी शंकरजींनी सर्व जाणले. ते म्हणाले— हे सती! ऐक, तुझा स्त्री स्वभाव आहे. असा संशय कधीच मनामध्ये ठेवू नये.॥ ३॥

जासु कथा कुंभज रिषि गाई। भगति जासु मैं मुनिहि सुनाई॥
सोइ मम इष्टदेव रघुबीरा। सेवत जाहि सदा मुनि धीरा॥

अगस्त्य ऋषिंनी ज्या कथेचे वर्णन केले आणि ज्यांची भक्ती मी मुनींना वर्णन करून सांगितली, तेच माझे इष्टदेव श्रीरघुवीरजी आहेत, ज्यांची सेवा ज्ञानी, मुनी सदा सर्वदा करत असतात.॥ ४॥

छं०— **मुनि धीर जोगी सिद्ध संतत बिमल मन जेहि ध्यावहीं।**
कहि नेति निगम पुरान आगम जासु कीरति गावहीं॥
सोइ रामु ब्यापक ब्रह्म भुवन निकाय पति माया धनी।
अवतरेउ अपने भगत हित निजतंत्र नित रघुकुलमनी॥

ज्ञानी, मुनी, योगी आणि सिद्ध ज्यांचे शुद्ध चित्ताने ध्यान करतात. तसेच वेद, पुराण आणि शास्त्र

"नेति नेति" म्हणून ज्यांची कीर्ती गातात, त्याच सर्वव्यापक, समस्त ब्रह्मांडनायक, मायापती, नित्य, परमस्वतंत्र ब्रह्मरूपी भगवान् श्रीरामजींनी आपल्या भक्तांच्या हितासाठी (स्वत:च्या इच्छेने) रघुकुलमणी होऊन अवतार घेतला आहे.

दो०— **लाग न उर उपदेसु जदपि कहेउ सिवँ बार बहु।**
बोले बिहसि महेसु हरिमाया बलु जानि जियँ॥५१॥

जरी शंकरजींनी पुष्कळ वेळा समजावून सांगितले, तरीही सतीजींच्या अंत:करणात त्यांचा उपदेश स्थिर झाला नाही. तेव्हा महोदवजी मनात भगवंताच्या मायेचे बल जाणून स्मित हास्य करत म्हणाले— ॥५१॥

जौं तुम्हरें मन अति संदेहू। तौ किन जाइ परीछा लेहू॥
तब लगि बैठ अहउँ बटछाहीं। जब लगि तुम्ह ऐहहु मोहि पाहीं॥

जर तुझ्या मनात फार मोठा संशय असेल तर तू स्वत: जाऊन परीक्षा का घेत नाहीस? तू जोपर्यंत परत येणार नाहीस तोपर्यंत मी याच वडाच्या झाडाखाली थांबतो. ॥१॥

जैसें जाइ मोह भ्रम भारी। करेहु सो जतनु बिबेक बिचारी॥
चलीं सती सिव आयसु पाई। करहिं बिचारु करौं का भाई॥

जेणेकरून तुझा हा अज्ञानजनित मोठा भ्रम दूर होईल, असे विवेकाने नीट विचार करून तू तेच कर. शिवजींची आज्ञा घेऊन सती निघाली आणि मनात विचार करू लागली की, काय करावे? (कशी परीक्षा घ्यावी?) ॥२॥

इहाँ संभु अस मन अनुमाना। दच्छसुता कहुँ नहिं कल्याना॥
मोरेहु कहें न संसय जाहीं। बिधि बिपरीत भलाई नाहीं॥

इकडे शंकरजींनी मनात असे अनुमान केले की, दक्षकन्या सतीचे आता कल्याण होणार नाही. माझ्या समजाविण्याने सुद्धा जर तिचा संशय दूर होत नही तर (असेवाटते) आता विधाताच तिच्यासाठी विपरीत आहे. म्हणून सतीचे आता कुशल होणार नाही. ॥३॥

होइहि सोइ जो राम रचि राखा। को करि तर्क बढ़ावै साखा॥
अस कहि लगे जपन हरिनामा। गईं सती जहँ प्रभु सुखधामा॥

जे काही श्रीरामाने रचले आहे तेच होईल. तर्करूपी शाखा कशाला वाढवायची. (मनात) असा विचार करून शिवजी भगवान् श्रीहरिचे नाम जपू लागले आणि सती तेथे गेली जेथे सुखाचे धाम प्रभू श्रीरामचंद्र होते. ॥४॥

दो०— **पुनि पुनि हृदयँ बिचारु करि धरि सीता कर रूप।**
आगें होइ चलि पंथ तेहिं जेहिं आवत नरभूप॥५२॥

सतीने पुन्हा पुन्हा मनात विचार केला आणि सीताजीचे रूप धारण करून ज्या मार्गाने श्रीरामचंद्रजी येत होते त्या मार्गात समोरून आली. ॥५२॥

लछिमन दीख उमाकृत बेषा। चकित भए भ्रम हृदयँ बिसेषा।
कहि न सकत कछु अति गंभीरा। प्रभु प्रभाउ जानत मतिधीरा।

सतीजींच्या बनावटी वेषाला पाहून लक्ष्मणजी चकित झाले आणि त्यांच्या हृदयात फार मोठा भ्रम झाला. ते फार गंभीर झाले पण काही बोलू शकले नाहीत. धीरबुद्धी लक्ष्मणजी प्रभू रघुनाथांच्या प्रभावाला जाणत होते. ॥ १ ॥

सती कपटु जानेउ सुरस्वामी। सबदरसी सब अंतरजामी॥
सुमिरत जाहि मिटइ अग्याना। सोइ सरबग्य रामु भगवाना॥

सर्वकाही पाहणारे आणि सर्वज्ञ असे देवतांचे स्वामी श्रीरामचंद्रजींनी सतीचे कपट ओळखले. ज्यांच्या केवळ स्मरणाने अज्ञानाचा नाश होतो, तेच सर्वज्ञ भगवान् श्रीरामचंद्रजी आहेत. ॥ २ ॥

सती कीन्ह चह तहँहुँ दुराऊ। देखहु नारि सुभाव प्रभाऊ॥
निज माया बलु हृदयँ बखानी। बोले बिहसि रामु मृदु बानी॥

स्त्रीस्वभावाचा परिणाम तर पहा की, तेथे (त्या सर्वज्ञ भगवंतासमोर) सुद्धा सती स्वत:ला लपवू इच्छिते. आपल्या मायेच्या शक्तीची मनात स्तुती करत श्रीरामचंद्रजी हसून कोमल वाणीने म्हणाले— ॥ ३ ॥

जोरि पानि प्रभु कीन्ह प्रनामू। पिता समेत लीन्ह निज नामू॥
कहेउ बहोरि कहाँ बृषकेतू। बिपिन अकेलि फिरहु केहि हेतू॥

प्रथम प्रभूंनी हात जोडून सतीला नमस्कार केला आणि पित्यासहित आपले नाव सांगितले. नंतर म्हणाले की, वृषकेतू शिवजी कोठे आहेत.? तुम्ही एकट्याच ह्या वनात का फिरत आहात?॥ ४॥

दो०— **राम बचन मृदु गूढ़ सुनि उपजा अति संकोचु।**
सती सभीत महेस पहिं चलीं हृदयँ बड़ सोचु॥ ५३॥

श्रीरामचंद्रजींचे कोमल आणि रहस्यमय वचन ऐकून सतीजीला फार संकोच झाला. ती भीतभीत (गुपचुप) शंकरजीं जवळ आली. तिच्या मनात फार चिंता निर्माण झाली. ॥ ५३ ॥

मैं संकर कर कहा न माना। निज अग्यानु राम पर आना॥
जाइ उतरु अब देहउँ काहा। उर उपजा अति दारुन दाहा॥

की, मी शंकरजींचे म्हणणे ऐकले नाही आणि स्वत:च्या अज्ञानाचा आरोप श्रीरामचंद्रजींवर केला. आता मी जाऊन शंकरजींना काय उत्तर देऊ? (असा विचार करत) सतीच्या अंत:करणात अत्यंत भयानक उद्विग्नता निर्माण झाली. ॥ १ ॥

जाना राम सतीं दुखु पावा। निज प्रभाउ कछु प्रगटि जनावा॥
सतीं दीख कौतुकु मग जाता। आगें रामु सहित श्री भ्राता॥

श्रीरामचंद्रजींनी सतीजीला दु:ख झाल्याचे ओळखले तेव्हा त्यांनी आपला काही प्रभाव प्रगट करून तिला दाखवला. श्रीरामचंद्रजी, सीताजी आणि लक्ष्मणजीसह पुढे जात आहेत असे सतीजीने आश्चर्याने पाहिले. (ह्यावेळी सीताजीला बरोबर दाखविण्याचा हेतू असा की, सतीजीने श्रीरामजींच्या सच्चिदानन्दमयरूपाला पहावे. वियोग आणि दु:खाची कल्पना जी तिला झाली होती ती दूर व्हावी व तिने प्रकृतिस्थ व्हावे.) ॥ २ ॥

फिरि चितवा पाछें प्रभु देखा। सहित बंधु सिय सुंदर बेषा॥
जहँ चितवहिं तहँ प्रभु आसीना। सेवहिं सिद्ध मुनीस प्रबीना॥

(त्यावेळी सतीजीने) मागे वळून पाहिले तर तेथेही लक्ष्मणजी आणि सीताजीसहित श्रीरामचंद्रजी सुंदर वेषात तिला दिसले. ती जिकडे पाहते तिकडेही प्रभू श्रीरामचंद्रजी विराजमान आहेत आणि सुचतुर सिद्ध मुनीश्वर त्यांची सेवा करीत आहेत असे तिला दिसले. ॥ ३ ॥

देखे सिव बिधि बिष्नु अनेका। अमित प्रभाउ एक तें एका॥
बंदत चरन करत प्रभु सेवा। बिबिध बेष देखे सब देवा॥

सतीजीने अनेक महेश, ब्रह्मा आणि विष्णु पाहिले. ते एकापेक्षा एक वरचढ असीम प्रभाव असणारे होते. (त्यांनी पाहिले की,) सर्व देवता वेग-वेगळे वेष धारण करून श्रीराचंद्रजींची चरणवंदना आणि सेवा करत आहेत. ॥ ४ ॥

दो०— **सती बिधात्री इंदिरा देखीं अमित अनूप।**
जेहिं जेहिं बेष अजादि सुर तेहि तेहि तन अनुरूप॥ ५४॥

सतीने अनंत अनुपम सती, ब्रम्हाणी आणि लक्ष्मी पाहिल्या. ज्या ज्या रूपात ब्रह्मा इत्यादि देवता होत्या, त्यांच्याच अनुकूल रूपात ह्या सर्व शक्तीही होत्या. ॥ ५४ ॥

देखे जहँ तहँ रघुपति जेते। सक्तिन्ह सहित सकल सुर तेते॥
जीव चराचर जो संसारा। देखे सकल अनेक प्रकारा॥

सतीजीने जिकडे-तिकडे जेवढे श्रीरामचंद्रजी पाहिले तेवढ्याच सर्व देवतांनाही पाहिले. संसारामध्ये जेवढे चराचर जीव आहेत तेही अनेक प्रकारचे सर्व पाहिले. ॥ १ ॥

पूजहिं प्रभुहि देव बहु बेषा। राम रूप दूसर नहिं देखा॥
अवलोके रघुपति बहुतेरे। सीता सहित न बेष घनेरे॥

(तिने पाहिले की,) देवता अनेक प्रकारचे वेष धारण करून प्रभू श्रीरामचंद्रजींची पूजा करीत आहेत. परंतु श्रीरामचंद्रजींचे दुसरे रूप कोठेही पाहिले नाही. सीतेसह श्रीरघुनाथजी पुष्कळ पाहिले परंतु त्यांचे वेष अनेक नव्हते. ॥ २ ॥

सोइ रघुबर सोइ लछिमनु सीता। देखि सती अति भईं सभीता॥
हृदय कंप तन सुधि कछु नाहीं। नयन मूदि बैठीं मग माहीं॥

(सर्व ठिकाणी) तेच श्रीरघुनाथजी, तेच लक्ष्मणजी आणि तीच सीताजी असे पाहून सतीजी फारच

घाबरली. तिच्या हृदयात थरकाप उडाला आणि देहाची शुद्धी जाऊ लागली. ती एकदम डोळे झाकून रस्त्यातच खाली बसली. ॥ ३ ॥

बहुरि बिलोकेउ नयन उघारी। कछु न दीख तहँ दच्छकुमारी॥
पुनि पुनि नाइ राम पद सीसा। चलीं तहाँ जहँ रहे गिरीसा॥

परत थोड्या वेळाने तिने डोळे उघडून पाहिले, तर तेथे दक्षकुमारी सतीजीला काहीच दिसले नाही. तेव्हा ती वारंवार श्रीरामचंद्रजींच्या चरणावर वंदन करून शंकरजी जेथे होते तेथे गेली. ॥ ४ ॥

दो०— **गईं समीप महेस तब हँसि पूछी कुसलात।**
लीन्हि परीछा कवन बिधि कहहु सत्य सब बात॥ ५५॥

जेव्हा सतीजी शंकरजीजवळ आली तेव्हा शंकरजींनी हसून तिला कुशल प्रश्न विचारले की, तू श्रीरामचंद्रजींची कशाप्रकारे परीक्षा घेतलीस. सर्व वृत्तांत खरा खरा सांग. ॥ ५५ ॥

मासपारायण, दुसरा विश्राम

सतीं समुझि रघुबीर प्रभाऊ। भय बस सिव सन कीन्ह दुराऊ॥
कछु न परीछा लीन्हि गोसाईं। कीन्ह प्रनामु तुम्हारिहि नाईं॥

सतीजीने श्रीरघुनाथजींचा प्रभाव जाणून भीतीने झालेला वृत्तांत शंकरजीपासून लपविला आणि म्हणाली— हे स्वामी! मी कसलीही परीक्षा घेतली नाही. (तेथे जाऊन) आपल्या प्रमाणेच मी प्रणाम केला. ॥ १ ॥

जो तुम्ह कहा सो मृषा न होई। मोरें मन प्रतीति अति सोई॥
तब संकर देखेउ धरि ध्याना। सतीं जो कीन्ह चरित सबु जाना॥

तुम्ही जे म्हणाला ते खोटे होऊ शकत नाही. माझ्या मनाला हा पूर्ण विश्वास आहे. तेव्हा शंकरजींनी ध्यान करून पाहिले आणि सतीजीने जे चरित्र केले होते, ते सर्व जाणले. ॥ २ ॥

बहुरि राममायहि सिरु नावा। प्रेरि सतिहि जेहिं झूँठ कहावा॥
हरि इच्छा भावी बलवाना। हृदयँ बिचारत संभु सुजाना॥

मग शिवजींनी श्रीरामचंद्रजींच्या मायेला नमस्कार केला, जिने प्रेरणा करून सतीजीच्या मुखातून सुद्धा खोटे बोलायला लावले. ज्ञानी शंकरजींनी मनात असा विचार केला की, हरिचा इच्छारूपी भावी संकल्प प्रबल आहे. ॥ ३ ॥

सतीं कीन्ह सीता कर बेषा। सिव उर भयउ बिषाद बिसेषा॥
जौं अब करउँ सती सन प्रीती। मिटइ भगति पथु होइ अनीती॥

सतीजीने सीताजीचा वेष धारण केला, हे कळल्याने शिवजींच्या मनाला फार विषाद झाला. त्यांनी असा विचार केला की, जर मी आता सतीशी प्रीती केली तर भक्तिमार्ग लुप्त होईल आणि फार मोठा अन्याय होईल. ॥ ४ ॥

दो०— परम पुनीत न जाइ तजि किएँ प्रेम बड़ पापु।
प्रगटि न कहत महेसु कछु हृदयँ अधिक संतापु॥ ५६॥

सती परम पवित्र आहे म्हणून तिचा त्यागही करता येत नाही आणि प्रेम करण्याने पाप होईल. महादेवजी प्रगट काहीच बोलत नाहीत परंतु त्यांच्या अंत:करणात फार मोठा संताप आहे. ॥ ५६ ॥

तब संकर प्रभु पद सिरु नावा। सुमिरत रामु हृदयँ अस आवा॥
एहिं तन सतिहि भेट मोहि नाहीं। सिव संकल्पु कीन्ह मन माहीं॥

तेव्हा शिवजींनी प्रभू श्रीरामचंद्रजींच्या चरणकमलावर नमस्कार केला आणि त्यांचे स्मरण सुरू केले. तेव्हा त्यांच्या मनात असे आले की, सतीच्या या शरीराशी माझी (पती-पत्नीरूपाने) भेट होऊ शकत नाही, असा संकल्प शंकरजींनी आपल्या मनात केला. ॥ १ ॥

अस बिचारि संकरु मतिधीरा। चले भवन सुमिरत रघुबीरा॥
चलत गगन भै गिरा सुहाई। जय महेस भलि भगति दृढ़ाई॥

स्थिरबुद्धी शंकरजी असा विचार करून श्रीरघुनाथजींचे स्मरण करत आपल्या घराकडे (कैलासाकडे) निघाले. जात असताना सुंदर आकाशवाणी झाली की, हे महेश! तुमचा विजय असो. तुम्ही भक्तीची उत्तम दृढता केली. ॥ २ ॥

अस पन तुम्ह बिनु करइ को आना। रामभगत समरथ भगवाना॥
सुनि नभगिरा सती उर सोचा। पूछा सिवहि समेत सकोचा॥

तुम्हाला सोडून दुसरा कोण अशी प्रतिज्ञा करू शकतो? तुम्ही श्रीरामचंद्रजींचे भक्त आहात, समर्थ आहात आणि भगवान् आहात. या आकाशवाणीला ऐकून सतीच्या मनात चिंता निर्माण झाली आणि तिने संकोचाने शंकरजींना विचारले— ॥ ३ ॥

कीन्ह कवन पन कहहु कृपाला। सत्यधाम प्रभु दीनदयाला॥
जदपि सतीं पूछा बहु भाँती। तदपि न कहेउ त्रिपुर आराती॥

हे कृपाळू! तुम्ही कोणती प्रतिज्ञा केली? ती सांगा. हे प्रभो! तुम्ही सत्याचे धाम आणि दीन-दयाळू आहात. जरी सतीजीने अनेक प्रकारांनी विचारले परंतु त्रिपुरारी शिवजींनी काहीही म्हटले नाही. ॥ ४ ॥

दो०— सतीं हृदयँ अनुमान किय सबु जानेउ सर्बग्य।
कीन्ह कपटु मैं संभु सन नारि सहज जड़ अग्य॥ ५७ (क)॥

सतीने आपल्या मनात असे अनुमान केले की, सर्वज्ञ शंकरजींनी सर्व जाणले. मी शंकरजींशी कपट केले. स्त्री स्वभावानेच मूर्ख आणि बेसमज असते. ॥ ५७ ॥ क

सो०— जलु पय सरिस बिकाइ देखहु प्रीति कि रीति भलि।
बिलग होइ रसु जाइ कपट खटाई परत पुनि॥ ५७ (ख)॥

पहा! प्रीतीची सुंदर रीत अशी आहे की, पाणीसुद्धा (दुधाबरोबर मिसळून) दुधाच्या भावाने विकले जाते. परंतु जर त्यात कपटरूपी आंबट पदार्थ पडताच पाणी वेगळे होते. (दूध नासते) आणि स्वाद (प्रेम) नाहीसा होतो. ॥ ५७ ॥ ख

हृदयँ सोचु समुझत निज करनी। चिंता अमित जाइ नहिं बरनी॥
कृपासिंधु सिव परम अगाधा। प्रगट न कहेउ मोर अपराधा॥

स्वत:च्या दुष्कर्माच्या आठवणीने सतीच्या मनात इतका शोक आहे आणि एवढी अपार चिंता आहे की, ज्याचे वर्णन होऊ शकत नाही. (तिने समजून घेतले की,) शिवजी कृपेचे परम अथाह सागर आहेत. म्हणून त्यांनी माझा अपराध प्रगट सांगितला नाही. ॥ १ ॥

संकर रुख अवलोकि भवानी। प्रभु मोहि तजेउ हृदयँ अकुलानी॥
निज अघ समुझि न कछु कहि जाई। तपइ अवाँ इव उर अधिकाई॥

शंकरजींचा रोख पाहून सतीने समजून घेतले की, स्वामींनी माझा त्याग केला आणि ती अंत:करणात अत्यंत व्याकूळ झाली. स्वत:कडून पाप घडल्यामुळे ती काही म्हणू शकत नाही. परंतु अंत:करण (आतल्या आत) कुंभाराच्या आव्याप्रमाणे भयंकर जळू लागले. ॥ २ ॥

सतिहि ससोच जानि बृषकेतू। कहीं कथा सुंदर सुख हेतू॥
बरनत पंथ बिबिध इतिहासा। बिस्वनाथ पहुँचे कैलासा॥

वृषकेतू शिवजींनी सतीला चिंतायुक्त पाहून तिला सुख देण्यासाठी सुंदर कथा सांगितल्या. अशाप्रकारे मार्गक्रमण करत असताना विविध प्रकारचे इतिहास वर्णन करत शंकरजी कैलासाला पोहचले. ॥ ३ ॥

तहँ पुनि संभु समुझि पन आपन। बैठे बट तर करि कमलासन॥
संकर सहज सरूपु सम्हारा। लागि समाधि अखंड अपारा॥

तेथे गेल्यानंतर शंकरजींनी आपल्या प्रतिज्ञेचे स्मरण ठेवून वडाच्या झाडाखाली पद्मासन लावून ते आसनस्थ झाले आणि शिवजी स्वस्वरूपात रममाण झाले. त्यांची अखंड आणि अपार समाधी लागली. ॥ ४ ॥

दो०— **सती बसहिं कैलास तब अधिक सोचु मन माहिं।**
मरमु न कोऊ जान कछु जुग सम दिवस सिराहिं॥ ५८॥

त्यावेळी सती कैलासावर राहू लागली. तिच्या मनात फार मोठे दु:ख होते. हे रहस्य कोणालाही माहीत नव्हते. तिचा एक एक दिवस युगासारखा जात होता. ॥ ५८ ॥

नित नव सोचु सती उर भारा। कब जैहउँ दुख सागर पारा॥
मैं जो कीन्ह रघुपति अपमाना। पुनि पतिबचनु मृषा करि जाना॥

सतीच्या मनात नित्य नवा आणि भयंकर शोक होत होता की, मी या दुःख सागरातून कधी पार होईन? मी श्रीरघुनाथजींचा अपमान केला आणि पतीच्या वचनाला खोटे मानले. ॥ १ ॥

सो फलु मोहि बिधाताँ दीन्हा। जो कछु उचित रहा सोइ कीन्हा॥
अब बिधि अस बूझिअ नहिं तोही। संकर बिमुख जिआवसि मोही॥

त्याचेच फल मला विधाताने दिले. हे विधाता! तू जे केलेस ते उचितच केलेस. परंतु हे विधाता! आता तू मला शंकरजीपासून विन्मुख झाल्यावरही जिवंत ठेवत आहेस हे आता तुला उचित नाही. ॥ २ ॥

कहि न जाइ कछु हृदय गलानी। मन महुँ रामहि सुमिर सयानी॥
जौं प्रभु दीनदयालु कहावा। आरति हरन बेद जसु गावा॥

सतीजीच्या अंतःकरणातील ग्लानी सांगणे कठीण आहे. बुद्धिमती सतीजीने मनात श्रीरामचंद्रजींचे स्मरण केले आणि म्हटले—हे प्रभो! जर आपण दीन-दयाळू म्हणविले जाता आणि वेदांनी आपले हे यश गायले आहे की, आपण दुःख हरण करणारे आहात, ॥३ ॥

तौ मैं बिनय करउँ कर जोरी। छूटउ बेगि देह यह मोरी॥
जौं मोरें सिव चरन सनेहू। मन क्रम बचन सत्य ब्रतु एहू॥

तर मी हात जोडून विनंती करते की, मी या देहातून लवकर सुटावे. जर माझे शिवजींच्या चरणी प्रेम असेल आणि माझे हे (प्रेमाचे) व्रत मन, वचन आणि कर्माने (आचरणाने) सत्य असेल, ॥ ४ ॥

दो०— **तौ सबदरसी सुनिअ प्रभु करउ सो बेगि उपाइ।**
होइ मरनु जेहिं बिनहिं श्रम दुसह बिपत्ति बिहाइ॥ ५९॥

तर हे सर्वदर्शी प्रभो! ऐका आणि लवकर असा उपाय करा जेणे करून माझा मृत्यू होईल आणि विनापरिश्रम ही (पतीपरित्यागरूपी) असह्य विपत्ती दूर होईल. ॥ ५९ ॥

एहि बिधि दुखित प्रजेसकुमारी। अकथनीय दारुन दुखु भारी॥
बीतें संबत सहस सतासी। तजी समाधि संभु अबिनासी॥

दक्षसुता सती अशाप्रकारे फार दुःखी होती. तिला एवढे दारुण दुःख झाले होते की, ज्याचे वर्णन करता येत नाही. सत्त्याऐंशी हजार वर्ष संपल्यावर अविनाशी शिवजींनी समाधीतून उत्थान केले. ॥ १ ॥

राम नाम सिव सुमिरन लागे। जानेउ सतीं जगतपति जागे॥
जाइ संभु पद बंदनु कीन्हा। सनमुख संकर आसनु दीन्हा॥

शिवजी रामनामाचे स्मरण करू लागले, तेव्हा सतीने ओळखले की, आता जगताचे स्वामी (शिवजी) समाधीतून उठले आहेत. तिने शिवजींच्या चरणांवर प्रणाम केला. शिवजींनी सतीला बसण्यासाठी समोर आसन दिले. ॥ २ ॥

लगे कहन हरि कथा रसाला। दच्छ प्रजेस भए तेहि काला॥
देखा बिधि बिचारि सब लायक। दच्छहि कीन्ह प्रजापति नायक॥

भगवान् शंकरजी भगवान् हरिच्या रसमयी कथा सांगू लागले. त्याच काळात दक्ष हे प्रजापती झाले. ब्रह्मदेवांनी दक्षाला सर्वतोपरी योग्य समजून अनेक प्रजापतींचा नायक बनविले. ॥ ३ ॥

बड़ अधिकार दच्छ जब पावा। अति अभिमानु हृदयँ तब आवा॥
नहिं कोउ अस जनमा जग माहीं। प्रभुता पाइ जाहि मद नाहीं॥

जेव्हा दक्षाने एवढा मोठा अधिकार मिळविला तेव्हा त्याच्या मनात अभिमान निर्माण झाला. जगतात असा कोणीही जन्मला (झाला) नाही ज्याला प्रभूता प्राप्त झाल्यावर मद चढला नाही. ॥ ४ ॥

दो०— **दच्छ लिए मुनि बोलि सब करन लगे बड़ जाग।**
नेवते सादर सकल सुर जे पावत मख भाग॥ ६० ॥

दक्षाने सर्व मुनींना बोलावले आणि त्याने मोठा यज्ञ आरंभ केला. ज्या देवता यज्ञाचा भाग प्राप्त करतात दक्षाने त्या सर्वांना आदराने निमंत्रित केले. ॥ ६० ॥

किंनर नाग सिद्ध गंधर्बा। बधुन्ह समेत चले सुर सर्बा॥
बिष्नु बिरंचि महेसु बिहाई। चले सकल सुर जान बनाई॥

(दक्षाचे निमंत्रण आल्याने) किन्नर, नाग, सिद्ध, गंधर्व आणि सर्व देवता आपापल्या पत्नींसह निघाल्या. विष्णु, ब्रह्मदेव आणि शंकरजी यांच्या विरहित सर्व देवता आपापली विमाने सजवून निघाल्या. ॥ १ ॥

सतीं बिलोके ब्योम बिमाना। जात चले सुंदर बिधि नाना॥
सुर सुंदरी करहिं कल गाना। सुनत श्रवन छूटहिं मुनि ध्याना॥

सतीजीने पाहिले की, अनेक प्रकारची सुंदर विमाने आकाशातून जात आहेत आणि देवपत्नीं मधुर गायन करत आहेत जे ऐकून ऋषि-मुनींचे ध्यान भंग होत आहे. ॥ २ ॥

पूछेउ तब सिवँ कहेउ बखानी। पिता जग्य सुनि कछु हरषानी॥
जौं महेसु मोहि आयसु देहीं। कछु दिन जाइ रहौं मिस एहीं॥

सतीजीने (देवतांचे विमानातून जाण्याचे कारण) शंकरजींना विचारले तेव्हा त्यांनी सर्व वृत्तांत सांगितला. पित्याच्या घरी यज्ञ होत असल्याची बातमी ऐकून सती थोडी प्रसन्न झाली आणि विचार करू लागली की, जर शंकरजींनी मला आज्ञा दिली तर मीही या निमित्ताने काही दिवस पित्याच्या घरी जाऊन राहीन. ॥ ३ ॥

पति परित्याग हृदयँ दुखु भारी। कहइ न निज अपराध बिचारी॥
बोली सती मनोहर बानी। भय संकोच प्रेम रस सानी॥

कारण तिच्या मनात पतीने त्यागल्याचे फार मोठे दु:ख होते. परंतु स्वत:चा अपराध झाल्यामुळे ती काही म्हणत नव्हती. शेवटी ती भय, संकोच आणि प्रेमभरित अशा मनोहर वाणीने म्हणाली— ॥ ४ ॥

दो०— **पिता भवन उत्सव परम जौं प्रभु आयसु होइ।**
तौ मैं जाउँ कृपायतन सादर देखन सोइ॥ ६१॥

हे प्रभो! माझ्या वडिलाच्या घरी फार मोठा उत्सव आहे. जर तुमची आज्ञा असेल तर हे कृपाधाम! मी तो आवडीने पाहण्यासाठी जाऊ का? ॥ ६१ ॥

कहेहु नीक मोरेहुँ मन भावा। यह अनुचित नहिं नेवत पठावा॥
दच्छ सकल निज सुता बोलाईं। हमरें बयर तुम्हउ बिसराईं॥

शंकरजी म्हणाले— तू गोष्ट तर चांगली विचारलीस, ती माझ्या मनालाही पसंत पडली. परंतु त्यांनी तुला आमंत्रण पाठविले नाही हे अनुचित आहे. दक्षाने आपल्या सर्व मुलींना बोलावले परंतु माझ्याशी असलेल्या वैरामुळे त्याने तुलाही बोलवायचे टाळले. ॥१ ॥

ब्रह्मसभाँ हम सन दुखु माना। तेहि तें अजहुँ करहिं अपमाना॥
जौं बिनु बोलें जाहु भवानी। रहइ न सीलु सनेहु न कानी॥

एकदा ब्रह्मसभेत तुझे वडील माझ्याशी अप्रसन्न झाले होते. त्यामुळे ते आत्ताही माझा अपमान करत आहेत. हे भवानी! जर तू न बोलावता गेलीस तर तुझे शील-स्नेहही राहणार नाही आणि मान-मर्यादाही राहणार नाही. ॥ २ ॥

जदपि मित्र प्रभु पितु गुर गेहा। जाइअ बिनु बोलेहुँ न सँदेहा॥
तदपि बिरोध मान जहँ कोई। तहाँ गएँ कल्यानु न होई॥

हे निश्चित आहे की, मित्र, स्वामी, पिता आणि गुरूच्या घरी बोलावले नसले तरी जावयास पाहिजे. परंतु ज्याठिकाणी आपल्याशी कोणी वैर मानत असेल त्याच्या घरी जाण्याने कल्याण होत नाही. ॥ ३ ॥

भाँति अनेक संभु समुझावा। भावी बस न ग्यानु उर आवा॥
कह प्रभु जाहु जो बिनहिं बोलाएँ। नहिं भलि बात हमारे भाएँ॥

शिवजींनी पुष्कळ प्रकाराने समजावले परंतु अवश्यंभावीमुळे (होणारे कधी टळत नाही या न्यायाने) सतीच्या मनाला बोध झाला नाही. शेवटी शंकरजी म्हणाले की, जर बोलावले नसताना जाशील तर माझ्या मताप्रमाणे चांगली गोष्ट होणार नाही. ॥ ४ ॥

दो०— **कहि देखा हर जतन बहु रहइ न दच्छकुमारि।**
दिए मुख्य गन संग तब बिदा कीन्ह त्रिपुरारि॥ ६२॥

शिवजींनी पुष्कळ प्रकाराने सांगून पाहिले परंतु जेव्हा सती कोणत्याही प्रयत्नाने थांबली नाही तेव्हा त्रिपुरारी महादेवजींनी आपल्या मुख्य गणांना सोबत देऊन सतीला पाठविले. ॥ ६२ ॥

पिता भवन जब गईं भवानी। दच्छ त्रास काहुँ न सनमानी॥
सादर भलेहिं मिली एक माता। भगिनीं मिलीं बहुत मुसुकाता॥

भवानी जेव्हा आपल्या वडिलांच्या घरी पोहोचली तेव्हा दक्षाच्या भीतीने कोणीच तिचे स्वागत केले नाही, फक्त माता थोडी आदराने भेटली. बहिणी फक्त हसत भेटल्या. ॥ १ ॥

दच्छ न कछु पूछी कुसलाता। सतिहि बिलोकि जरे सब गाता॥
सतीं जाइ देखेउ तब जागा। कतहुँ न दीख संभु कर भागा॥

दक्षाने तर तिचे कुशलसुद्धा विचारले नाही उलट सतीला पाहून त्याच्या सर्व अंगाची आग झाली. तेव्हा सतीने यज्ञाकडे जाऊन पाहिले तर तेथे कोठेही शंकरजींचा भाग तिला दिसला नाही. ॥ २ ॥

तब चित चढ़ेउ जो संकर कहेऊ। प्रभु अपमानु समुझि उर दहेऊ॥
पाछिल दुखु न हृदयँ अस ब्यापा। जस यह भयउ महा परितापा॥

तेव्हा शिवजींने जे म्हटले होते ते तिला पटले. स्वामींचा अपमान झालेला पाहून सतीचे हृदय जळू लागले. पूर्वी (पती-परित्यागामुळे) झालेल्या दुःखाने तिचे हृदय जितके त्रस्त झाले नाही त्यापेक्षा महान दुःख यावेळी पती-अपमानामुळे झाले. ॥ ३ ॥

जद्यपि जग दारुन दुख नाना। सब तें कठिन जाति अवमाना॥
समुझि सो सतिहि भयउ अति क्रोधा। बहु बिधि जननीं कीन्ह प्रबोधा॥

जरी जगतामध्ये अनेक प्रकारची दारुण दुःख आहेत तरीपण जाती-अपमान सर्वात जास्त कठीण (दुःख) आहे. असे वाटून सतीला फार क्रोध आला. मातेने तिला अनेक प्रकाराने समजावले. ॥ ४ ॥

दो०— **सिव अपमानु न जाइ सहि हृदयँ न होइ प्रबोध।**
सकल सभहि हठि हटकि तब बोलीं बचन सक्रोध॥ ६३॥

परंतु तिला शिवजींचा झालेला अपमान सहन झाला नाही. म्हणून मातेच्या उपदेशाचा तिच्यावर काहीही परिणाम झाला नाही. मग सती सर्व सभेला उद्देशून क्रोधाच्या आवेशात म्हणाली— ॥ ६३ ॥

सुनहु सभासद सकल मुनिंदा। कही सुनी जिन्ह संकर निंदा॥
सो फलु तुरत लहब सब काहूँ। भली भाँति पछिताब पिताहूँ॥

हे सभासदांनो आणि सर्व मुनीश्वरांनो! ऐका, ज्यांनी ज्यांनी याठिकाणी शिवजींची निंदा केली आणि ऐकली आहे त्या सर्वांना त्याचे फळ तात्काळ मिळेल आणि माझ्या पित्याला-दक्षाला सुद्धा भयंकर पश्चात्ताप करावा लागेल. ॥ १ ॥

संत संभु श्रीपति अपबादा। सुनिअ जहाँ तहँ असि मरजादा॥
काटिअ तासु जीभ जो बसाई। श्रवन मूदि न त चलिअ पराई॥

ज्या ठिकाणी संत, शिवजी आणि लक्ष्मीपती विष्णु भगवंताची निंदा ऐकविली जाते त्याठिकाणी अशी मर्यादा आहे की, जर आपली शक्ती असेल तर त्याची (निंदा करणाऱ्याची) जीभ कापावी अथवा कान बंद करून तेथून निघून जावे. ॥ २ ॥

जगदातमा महेसु पुरारी। जगत जनक सब के हितकारी॥
पिता मंदमति निंदत तेही। दच्छ सुक्र संभव यह देही॥

त्रिपुर दैत्याला मारणारे भगवान् महेश्वर जगताचे आत्मा आहेत. ते जगत्पिता सर्वांचे हित करणारे आहेत. माझे मंदबुद्धी पिता त्यांची निंदा करतात आणि माझे हे शरीर दक्षाच्याच वीर्याने उत्पन्न झालेले आहे. ॥ ३ ॥

तजिहउँ तुरत देह तेहि हेतू। उर धरि चंद्रमौलि बृषकेतू॥
अस कहि जोग अगिनि तनु जारा। भयउ सकल मख हाहाकारा॥

म्हणून चंद्रमाला भाळी धारण करणारे वृषकेतू शिवजींना हृदयात धारण करून मी या शरीराचा तुरंत त्याग करते. असे म्हणून सतीजीने योगाग्नीने आपले शरीर भस्म करून टाकले. साऱ्या यज्ञशाळेत हाहा:कार माजला. ॥ ४ ॥

दो०— **सती मरनु सुनि संभु गन लगे करन मख खीस।**
जग्य बिधंस बिलोकि भृगु रच्छा कीन्हि मुनीस॥ ६४॥

सतीजी समाप्त झालेली पाहून शंकरजींचे गण यज्ञ विध्वंस करू लागले. यज्ञ विध्वंस होत असलेला पाहून मुनीश्वर भृगूंनी त्याचे रक्षण केले. ॥ ६४ ॥

समाचार सब संकर पाए। बीरभद्रु करि कोप पठाए॥
जग्य बिधंस जाइ तिन्ह कीन्हा। सकल सुरन्ह बिधिवत फलु दीन्हा॥

हा सर्व समाचार शंकरजींना जेव्हा कळला तेव्हा त्यांनी वीरभद्राला पाठवले. त्याने तेथे जाऊन यज्ञ विध्वंस करून टाकला आणि सर्व देवतांना यथोचित फल (दंड) दिले. ॥ १ ॥

भै जगबिदित दच्छ गति सोई। जसि कछु संभु बिमुख कै होई॥
यह इतिहास सकल जग जानी। ताते मैं संछेप बखानी॥

दक्षाची जगत प्रसिद्ध तीच गती झाली जी शिवद्रोहीची होत असते. हा इतिहास सारा संसार जाणतो. म्हणून मी संक्षेपाने वर्णन केले. ॥ २ ॥

सतीं मरत हरि सन बरु मागा। जनम जनम सिव पद अनुरागा॥
तेहि कारन हिमगिरि गृह जाई। जनमीं पारबती तनु पाई॥

सतीने शरीर सोडतेवेळी भगवान् हरिला असा वर मागितला की, माझा जन्मोजन्मी श्रीशिवजींच्या चरणी अनुराग रहावा. याच कारणामुळे तिने हिमालयाच्या घरी पार्वतीरूपाने जन्म घेतला. ॥३॥

जब तें उमा सैल गृह जाईं। सकल सिद्धि संपति तहँ छाईं॥
जहँ तहँ मुनिन्ह सुआश्रम कीन्हे। उचित बास हिम भूधर दीन्हे॥

जेव्हापासून उमा हिमालयाच्या घरी जन्माला आली तेव्हापासून त्या ठिकाणी सर्व सिद्धी आणि संपत्ती आल्या. मुनींनी जिथे-तिथे सुंदर आश्रम बनविले आणि हिमालयाने त्यांना उचित स्थाने दिली. ॥ ४॥

दो०— **सदा सुमन फल सहित सब द्रुम नव नाना जाति।**
प्रगटीं सुंदर सैल पर मनि आकर बहु भाँति॥ ६५॥

त्या सुंदर पर्वतावरील पुष्कळ प्रकारचे सर्व नवनवे वृक्ष सदा फळा-फुलांनी युक्त झाले आणि त्या ठिकाणी अनेक प्रकारच्या रत्नांच्या खाणी प्रगट झाल्या. ॥ ६५॥

सरिता सब पुनीत जलु बहहीं। खग मृग मधुप सुखी सब रहहीं॥
सहज बयरु सब जीवन्ह त्यागा। गिरि पर सकल करहिं अनुरागा॥

सर्व नद्यामधून पवित्र जल वाहू लागले आणि पशु-पक्षी, भ्रमर सर्व सुखाने राहू लागले. सर्व जीवांनी आपले स्वाभाविक वैर सोडून दिले आणि सर्वजण हिमालयावर प्रेम करू लागले. ॥११॥

सोह सैल गिरिजा गृह आएँ। जिमि जनु रामभगति के पाएँ॥
नित नूतन मंगल गृह तासू। ब्रह्मादिक गावहिं जसु जासू॥

पार्वतीजींच्या आगमनाने पर्वत असा शोभू लागला जसा रामभक्तीच्या प्राप्तीने भक्त शोभायमान होतो. त्याचे (पर्वतराजाचे) घरी नित्य नव-नवीन मंगलोत्सव होऊ लागले. ज्याचे ब्रह्मदेवादी यश गाऊ लागले. ॥ २॥

नारद समाचार सब पाए। कौतुकहीं गिरि गेह सिधाए॥
सैलराज बड़ आदर कीन्हा। पद पखारि बर आसनु दीन्हा॥

जेव्हा नारदांनी हा समाचार ऐकला तेव्हा ते कौतुक म्हणून हिमालयाच्या घरी आले. पर्वतराजाने त्यांचा मोठा सत्कार केला आणि त्यांची पाद्यपूजा करून त्यांना उत्तम आसनावर बसविले. ॥ ३॥

नारि सहित मुनि पद सिरु नावा। चरन सलिल सबु भवनु सिंचावा॥
निज सौभाग्य बहुत गिरि बरना। सुता बोलि मेली मुनि चरना॥

मग आपल्या पत्नीसह त्यांनी मुनींच्या चरणांवर नमस्कार केला आणि त्यांचे चरणोदक साऱ्या घरात शिंपडून हिमालयाने स्वत:ला फार भाग्यवान समजले आणि कन्येला बोलावून मुनींच्या चरणांवर शरणागत केले. ॥ ४॥

दो०— त्रिकालग्य सर्बग्य तुम्ह गति सर्बत्र तुम्हारि।
कहहु सुता के दोष गुन मुनिबर हृदयँ बिचारि॥ ६६॥

(आणि म्हटले-) हे मुनिवर आपण त्रिकालज्ञ आणि सर्वज्ञ आहात. आपली सर्व ठिकाणी पोहोच आहे. म्हणून आपल्या मनात विचार करून या कन्येचे दोष-गुण सांगा॥६६॥

कह मुनि बिहसि गूढ़ मृदु बानी। सुता तुम्हारि सकल गुन खानी॥
सुंदर सहज सुसील सयानी। नाम उमा अंबिका भवानी॥

नारदमुनींनी हसून रहस्ययुक्त कोमल वाणीने म्हटले—तुझी कन्या सर्व गुणांची खाण आहे. ही स्वाभाविकच सुंदर, सुशील आणि समजदार आहे. उमा, अंबिका आणि भवानी हिची नावे आहेत. ॥ १ ॥

सब लच्छन संपन्न कुमारी। होइहि संतत पियहि पिआरी॥
सदा अचल एहि कर अहिवाता। एहि तें जसु पैहहिं पितु माता॥

ही कन्या सर्व सुलक्षणांनी संपन्न आहे. ही आपल्या पतीला सदा प्रिय राहील. हिचे सौभाग्य सदा अचल राहील. हिच्यामुळे हिच्या माता-पित्याची कीर्ती होईल. ॥ २ ॥

होइहि पूज्य सकल जग माहीं। एहि सेवत कछु दुर्लभ नाहीं॥
एहि कर नामु सुमिरि संसारा। त्रिय चढ़िहहिं पतिब्रत असिधारा॥

ही सर्व जगात पूज्य होईल आणि हिची सेवा करणाऱ्यास काहीही दुर्लभ राहणार नाही. संसारातील स्त्रीया हिचे नामस्मरण करून पतिव्रतेचे कठोर व्रत पूर्ण करतील. ॥ ३ ॥

सैल सुलच्छन सुता तुम्हारी। सुनहु जे अब अवगुन दुइ चारी॥
अगुन अमान मातु पितु हीना। उदासीन सब संसय छीना॥

हे पर्वतराज! तुझी कन्या सुलक्षणी आहे. आता हिच्या भविष्यात दोनचार दोष आहेत. तेही ऐकून घ्या. गुणहीन, मानहीन, माता-पिताविहीन, उदासीन, संशयहीन (बेपरवाह). ॥ ४ ॥

दो०— जोगी जटिल अकाम मन नगन अमंगल बेष।
अस स्वामी एहि कहँ मिलिहि परी हस्त असि रेख॥ ६७॥

योगी, जटाधारी,निष्काम हृदय, नग्न आणि अमंगल वेषाचा असा पती हिला मिळेल. हिच्या हातावरील रेषाच अशा आहेत. ॥ ६७ ॥

सुनि मुनि गिरा सत्य जियँ जानी। दुख दंपतिहि उमा हरषानी॥
नारदहूँ यह भेदु न जाना। दसा एक समुझब बिलगाना॥

नारदमुनींची वाणी ऐकून आणि ती हृदयात सत्य जाणून पती-पत्नींना (हिमवान आणि मैना यांना) दुःख झाले आणि पार्वती प्रसन्न झाली. नारदजींनीसुद्धा हे रहस्य जाणले नाही. कारण सर्वांची बाह्य दशा एकसारखी असली तरी आतली समज वेग-वेगळी होती. ॥ १ ॥

सकल सखीं गिरिजा गिरि मैना। पुलक सरीर भरे जल नैना॥
होइ न मृषा देवरिषि भाषा। उमा सो बचनु हृदयँ धरि राखा॥

साऱ्या सख्या, पार्वती, पर्वतराज हिमवान आणि मैना सर्वांचे शरीर पुलकित झाले होते आणि सर्वांचे नेत्र पाणावले होते. देवर्षींचे वचन असत्य होऊ शकत नाही (हा विचार करून) पार्वतीने ती वचने हृदयात धारण केली. ॥ २ ॥

उपजेउ सिव पद कमल सनेहू। मिलन कठिन मन भा संदेहू॥
जानि कुअवसरु प्रीति दुराई। सखी उछँग बैठी पुनि जाई॥

तिला शिवजींच्या चरणकमली स्नेह उत्पन्न झाला. परंतु मनात हा संदेह आला की, त्यांची प्राप्ती कठीण आहे. ही वेळ योग्य नाही असे जाणून उमाने आपल्या प्रेमाला लपविले आणि ती सखीच्या मांडीवर जाऊन बसली. ॥ ३ ॥

झूठि न होइ देवरिषि बानी। सोचहिं दंपति सखीं सयानी॥
उर धरि धीर कहइ गिरिराऊ। कहहु नाथ का करिअ उपाऊ॥

देवर्षींची वाणी खोटी होणार नाही असा विचार करून हिमवान, मैना आणि सर्व चतुर सख्या चिंता करू लागल्या. त्यावेळी धैर्य धारण करून हिमालयाने विचारले—"हे नाथ! आता काय उपाय करावा ते सांगा." ॥ ४ ॥

दो०— **कह मुनीस हिमवंत सुनु जो बिधि लिखा लिलार।**
देव दनुज नर नाग मुनि कोउ न मेटनिहार॥ ६८॥

नारदजी म्हणाले—हे हिमालय ऐक! विधात्याने जे काही कपाळावर लिहिले आहे त्याला देव, दानव, मानव, नाग आणि मुनी कोणीही मिटवू शकत नाही. ॥ ६८ ॥

तदपि एक मैं कहउँ उपाई। होइ करै जौं दैउ सहाई॥
जस बरु मैं बरनेउँ तुम्ह पाहीं। मिलिहि उमहि तस संसय नाहीं॥

तरीही एक उपाय मी सांगतो. जर दैवाने साहाय्य केले तर तो सिद्ध होऊ शकतो. उमाला वर तर निःसंदेह असाच मिळेल जसा मी तुझ्यासमोर वर्णन केला आहे. ॥ १ ॥

जे जे बर के दोष बखाने। ते सब सिव पहिं मैं अनुमाने॥
जौं बिबाहु संकर सन होई। दोषउ गुन सम कह सबु कोई॥

परंतु मी वराचे जे-जे दोष वर्णन केले आहेत, माझ्या अनुमानाने ते सर्व शिवजीत आहेत. जर शिवजीबरोबर विवाह झाला तर दोषांनासुद्धा सर्व लोक गुणासमानच समजतील. ॥ २ ॥

जौं अहि सेज सयन हरि करहीं। बुध कछु तिन्ह कर दोषु न धरहीं॥
भानु कृसानु सर्ब रस खाहीं। तिन्ह कहँ मंद कहत कोउ नाहीं॥

जसे विष्णुभगवान् शेष शय्येवर निवास करतात तरीही पंडित लोक त्यांना कोणताही दोष लावत

नाहीत. सूर्य आणि अग्निदेव चांगले-वाईट सर्व रसांचे भक्षण करतात, परंतु त्यांना कोणी वाईट म्हणत नाही. ॥ ३ ॥

सुभ अरु असुभ सलिल सब बहई। सुरसरि कोउ अपुनीत न कहई॥
समरथ कहुँ नहिं दोषु गोसाईं। रबि पावक सुरसरि की नाईं॥

गंगेत शुभ आणि अशुभ दोन्हीही जल वाहते, परंतु त्याला कोणीही अपवित्र म्हणत नाही. सूर्य, अग्नी आणि गंगा ह्यासारख्या समर्थांना कोणताही दोष लागत नाही. ॥ ४ ॥

दो०— **जौं अस हिसिषा करहिं नर जड़ बिबेक अभिमान।**
परहिं कलप भरि नरक महुँ जीव कि ईस समान॥ ६९॥

जर मूर्ख माणसे ज्ञानाच्या अभिमानाने अशा प्रकारे दंभ करतील तर ते कल्पभरासाठी नरकात वास करतील. अरे बाबा! जीव कधी ईश्वरासमान (सर्वथा स्वतंत्र) होऊ शकेल काय?॥ ६९ ॥

सुरसरि जल कृत बारुनि जाना। कबहुँ न संत करहिं तेहि पाना॥
सुरसरि मिलें सो पावन जैसें। ईस अनीसहि अंतरु तैसें॥

गंगाजलात जरी मदिरा बनविली असली तरी संत लोक कधी तिचे पान करत नाहीत. परंतु तीच गंगाजलात मिसळली तर जशी पवित्र होते तसाच भेद जीव आणि ईश्वरात आहे. ॥ १ ॥

संभु सहज समरथ भगवाना। एहि बिबाहँ सब बिधि कल्याना॥
दुराराध्य पै अहहिं महेसू। आसुतोष पुनि किएँ कलेसू॥

शिवजी स्वाभाविकच समर्थ आहेत ते भगवान् आहेत. म्हणून या विवाहात सर्वप्रकारे कल्याण आहे. परंतु त्यांची आराधना फार कठीण आहे, तरीही कष्ट (तप) करण्याने ते फार लवकर संतुष्ट होतात. ॥ २ ॥

जौं तपु करै कुमारि तुम्हारी। भाविउ मेटि सकहिं त्रिपुरारी॥
जद्यपि बर अनेक जग माहीं। एहि कहँ सिव तजि दूसर नाहीं॥

जर तुझ्या कन्येने तप केले तर त्रिपुरारी महादेव प्रारब्धाला देखील बदलू शकतात. जरी संसारात वर अनेक आहेत परंतु हिच्यासाठी शंकरजींना सोडून दुसरा वर नाही. ॥ ३ ॥

बर दायक प्रनतारति भंजन। कृपासिंधु सेवक मन रंजन॥
इच्छित फल बिनु सिव अवराधें। लहिअ न कोटि जोग जप साधें॥

शिवजी वर देणारे, शरणागतांचे दुःख नाश करणारे, कृपासागर आणि सेवकाच्या मनाला प्रसन्न करणारे आहेत. शिवजींची आराधना न करता कोट्यवधी योग आणि जप केला तरी मनोवांच्छित फल मिळत नाही. ॥४॥

दो०— **अस कहि नारद सुमिरि हरि गिरिजहि दीन्हि असीस।**
होइहि यह कल्यान अब संसय तजहु गिरीस॥ ७०॥

असे म्हणून नारदजींनी भगवंताचे स्मरण करून पार्वतीला आशीर्वाद दिला. (आणि म्हणाले—) हे पर्वतराज! तू संदेहाचा त्याग कर. आता हिचे कल्याणच होईल. ॥ ७० ॥

कहि अस ब्रह्मभवन मुनि गयऊ। आगिल चरित सुनहु जस भयऊ॥
पतिहि एकांत पाइ कह मैना। नाथ न मैं समुझे मुनि बैना॥

असे म्हणून नारदमुनी ब्रह्मलोकात निघून गेले. त्यानंतर जे चरित्र घडले ते ऐका. पतीला एकांतात असताना मैनाने म्हटले—हे नाथ! मला मुनींच्या वचनांचा अर्थ समजला नाही. ॥ १ ॥

जौं घरु बरु कुलु होइ अनूपा। करिअ बिबाहु सुता अनुरूपा॥
न त कन्या बरु रहउ कुआरी। कंत उमा मम प्रानपिआरी॥

आपल्या कन्येच्या अनुकूल घर, वर आणि उत्तम कुल असेल तर विवाह करावा. नाहीतर आपली मुलगी कुमारीच राहिली तरी चालेल, (मी अयोग्य वरासोबत तिचा विवाह करू इच्छित नाही) कारण हे स्वामी! पार्वती मला प्राणासारखी प्रिय आहे. ॥ २ ॥

जौं न मिलिहि बरु गिरिजहि जोगू। गिरि जड़ सहज कहिहि सबु लोगू॥
सोइ बिचारि पति करेहु बिबाहू। जेहिं न बहोरि होइ उर दाहू॥

पार्वतीच्या योग्य जर वर मिळाला नाही तर सर्वलोक म्हणतील की, पर्वत स्वभावानेच जड (मूर्ख) असतात. हे स्वामी! ही गोष्ट विचारात घेऊनच विवाह करावा, ज्यामुळे नंतर पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येणार नाही. ॥ ३ ॥

अस कहि परी चरन धरि सीसा। बोले सहित सनेह गिरीसा॥
बरु पावक प्रगटै ससि माहीं। नारद बचनु अन्यथा नाहीं॥

अशा प्रकारे मैना पतीच्या चरणांवर मस्तक ठेवून शरणागत झाली. तेव्हा हिमालयाने प्रेमाने म्हटले—कदाचित एखादे वेळी चंद्रामध्ये अग्नी प्रगट होईल परंतु नारदजींचे वचन खोटे होऊ शकत नाही. ॥ ४ ॥

दो०— **प्रिया सोचु परिहरहु सबु सुमिरहु श्रीभगवान।**
पारबतिहि निरमयउ जेहिं सोइ करिहि कल्यान॥ ७१ ॥

हे प्रिये! सर्व चिंता सोडून भगवंताचे स्मरण कर. ज्यांनी पार्वतीला रचले आहे तेच तिचे कल्याण करतील. ॥७१ ॥

अब जौं तुम्हहि सुता पर नेहू। तौ अस जाइ सिखावनु देहू॥
करै सो तपु जेहिं मिलहिं महेसू। आन उपायँ न मिटिहि कलेसू॥

आता तुझे जर कन्येवर प्रेम आहे तर तिच्याकडे जाऊन तिला शिवजींची प्राप्ती होण्यासाठी तप करण्यास सांग. दुसऱ्या उपायाने हे क्लेश मिटणार नाहीत. ॥ १ ॥

नारद बचन सगर्भ सहेतू। सुंदर सब गुन निधि बृषकेतू॥
अस बिचारि तुम्ह तजहु असंका। सबहि भाँति संकरु अकलंका॥

नारदींचे वचन रहस्ययुक्त आणि सकारण आहेत आणि शिवजी समस्त सुंदर गुणांचे भांडार आहेत. हा विचार करून तू संदेहाचा त्याग कर. शिवजी सर्वच प्रकाराने निष्कलंक आहेत. ॥ २ ॥

सुनि पति बचन हरषि मन माहीं। गई तुरत उठि गिरिजा पाहीं॥
उमहि बिलोकि नयन भरे बारी। सहित सनेह गोद बैठारी॥

पतीचे वचन ऐकून मनामध्ये प्रसन्न होऊन मैना उठून लगेच पार्वतीजवळ गेली. पार्वतीला पाहून तिचे डोळे पाणावले. तिने तिला प्रेमाने मांडीवर बसविले. ॥ ३ ॥

बारहिं बार लेति उर लाई। गदगद कंठ न कछु कहि जाई॥
जगत मातु सर्बग्य भवानी। मातु सुखद बोलीं मृदु बानी॥

नंतर ती वारंवार तिला आलिंगन देऊ लागली. प्रेमाने मैनाचा गळा दाटून आला, तिला काहीच बोलता येईना. जगज्जननी भवानी तर सर्वज्ञ होतीच. (मातेच्या मनाची अवस्था पाहून) ती मातेला सुख वाटेल असे कोमल वाणीने म्हणाली— ॥ ४ ॥

दो०— **सुनहि मातु मैं दीख अस सपन सुनावउँ तोहि।**
सुंदर गौर सुबिप्रबर अस उपदेसेउ मोहि॥ ७२॥

हे माते ऐक! मी तुला सांगते, मी स्वप्नात असे पाहिले आहे की, मला एका सुंदर गौर वर्ण श्रेष्ठ ब्राह्मणाने असा उपदेश दिला आहे— ॥ ७२ ॥

करहि जाइ तपु सैलकुमारी। नारद कहा सो सत्य बिचारी॥
मातु पितहि पुनि यह मत भावा। तपु सुखप्रद दुख दोष नसावा॥

हे पार्वती! नारदजींनी जे सांगितले आहे ते तू सत्य समजून तप करण्यास जा. शिवाय तुझ्या माता-पित्यांनाही ही गोष्ट प्रिय वाटली आहे. तप सुख देणारे आणि दुःख दोषाचे नाश करणारे आहे. ॥ १ ॥

तपबल रचइ प्रपंचु बिधाता। तपबल बिष्नु सकल जग त्राता॥
तपबल संभु करहिं संघारा। तपबल सेषु धरइ महिभारा॥

तपोबलानेच ब्रह्मदेव संसाराची रचना करतात, तपोबलानेच विष्णु सर्व जगताचे पालन करतात, तपोबलानेच शंभू (रुद्ररूपाने जगताचा) संहार करतात आणि तपोबलानेच शेष पृथ्वीचा भार धारण करतात. ॥ २ ॥

तप अधार सब सृष्टि भवानी। करहि जाइ तपु अस जियँ जानी॥
सुनत बचन बिसमित महतारी। सपन सुनायउ गिरिहि हँकारी॥

हे भवानी! सर्व सृष्टी तपाच्याच आधारावर टिकली आहे. असे मनात जाणून तू तप कर. ही गोष्ट ऐकून मातेला फार आश्चर्य वाटले आणि तिने पतीला बोलावून ते स्वप्न सांगितले. ॥ ३ ॥

मातु पितहि बहुबिधि समुझाई। चलीं उमा तप हित हरषाई॥
प्रिय परिवार पिता अरु माता। भए बिकल मुख आव न बाता॥

माता-पित्यांना अनेक प्रकाराने समजावून अत्यंत आनंदाने पार्वती तप करण्यासाठी निघाली. प्रिय कटुंबी, माता-पिता सर्व व्याकूळ झाले. कोणाच्याही मुखातून शब्द निघत नाही. ॥ ४॥

दो०— **बेदसिरा मुनि आइ तब सबहि कहा समुझाइ।**
पारबती महिमा सुनत रहे प्रबोधहि पाइ॥ ७३॥

तेव्हा वेदशिरा मुनींनी तेथे येऊन सर्वांना समजाविले. पार्वतीचा महिमा ऐकून सर्वांना समाधान झाले. ॥ ७३॥

उर धरि उमा प्रानपति चरना। जाइ बिपिन लागीं तपु करना॥
अति सुकुमार न तनु तप जोगू। पति पद सुमिरि तजेउ सबु भोगू॥

प्राणपतीच्या (शिवजींच्या) चरणांना हृदयात धारण करून पार्वतीजी वनात जाऊन तप करू लागली. पार्वतीजींचे अत्यंत सुकुमार शरीर तपायोग्य नव्हते, तरीही पतीच्या चरणांचे स्मरण करून तिने सर्व भोगांचा त्याग केला. ॥ १॥

नित नव चरन उपज अनुरागा। बिसरी देह तपहिं मनु लागा॥
संबत सहस मूल फल खाए। सागु खाइ सत बरष गवाँए॥

स्वामींच्या चरणी नित्य नवे प्रेम उत्पन्न होऊ लागले आणि तपामध्ये असे मन लागले की, शरीराची शुद्धच राहिली नाही. एक हजार वर्षपर्यंत कंद, मुळे आणि फळे खाल्ली. पुढे शंभर वर्ष भाजीपाला खाऊन दिवस घालविले. ॥ २॥

कछु दिन भोजनु बारि बतासा। किए कठिन कछु दिन उपबासा॥
बेल पाती महि परइ सुखाई। तीनि सहस संबत सोइ खाई॥

काही दिवस जलपान आणि वायू भक्षण केले. त्यानंतर काही दिवस कठोर उपवास केला. पुढे तीन हजार वर्ष बेलाची वाळलेली पाने जी पृथ्वीवर पडत होती, ती खाल्ली. ॥ ३॥

पुनि परिहरे सुखानेउ परना। उमहि नामु तब भयउ अपरना॥
देखि उमहि तप खीन सरीरा। ब्रह्मगिरा भै गगन गभीरा॥

पुढे वाळलेली पानेही खाणे सोडून दिले. म्हणूनच पार्वतीचे नाव ''अपर्णा'' पडले. उमाचे शरीर तपाने क्षीण झालेले पाहून आकाशातून गंभीर ब्रह्मवाणी झाली— ॥ ४॥

दो०— **भयउ मनोरथ सुफल तव सुनु गिरिराजकुमारि।**
परिहरु दुसह कलेस सब अब मिलिहहिं त्रिपुरारि॥ ७४॥

हे पर्वतराज कन्या ऐक! तुझे मनोरथ सफल झाले. तू आता सर्व असह्य क्लेशांचा (कठीण तपाचा) त्याग कर. आता तुला शिवजी प्राप्त होतील. ॥ ७४॥

अस तपु काहुँ न कीन्ह भवानी। भए अनेक धीर मुनि ग्यानी॥
अब उर धरहु ब्रह्म बर बानी। सत्य सदा संतत सुचि जानी॥

हे भवानी! धैर्यवान, मुनी आणि ज्ञानी पुष्कळ झाले परंतु असे (कठोर) तप कोणीही केले नाही. आता तू या श्रेष्ठ ब्रह्मदेवाची वाणी सदा सत्य आणि निरंतर पवित्र जाणून स्वत:च्या हृदयात धारण कर. ॥ १ ॥

आवै पिता बोलावन जबहीं। हठ परिहरि घर जाएहु तबहीं॥
मिलहिं तुम्हहि जब सप्त रिषीसा। जानेहु तब प्रमान बागीसा॥

जेव्हा तुझे पिता तुला बोलावण्यास येतील तेव्हा हट्ट सोडून घरी जा आणि जेव्हा तुला सप्तर्षी भेटतील तेव्हा ही वाणी खरी समज. ॥ २ ॥

सुनत गिरा बिधि गगन बखानी। पुलक गात गिरिजा हरषानी॥
उमा चरित सुंदर मैं गावा। सुनहु संभु कर चरित सुहावा॥

(अशाप्रकारे) ब्रह्मदेवाची आकाशवाणी ऐकताच पार्वतीजी प्रसन्न झाली आणि (हर्षाने) तिचे शरीर पुलकित झाले. (याज्ञवल्क्य भरद्वाजांना म्हणाले) मी पार्वतीचे सुंदर चरित्र तुम्हाला ऐकविले. आता शिवजींचे मधुर चरित्र ऐका. ॥ ३ ॥

जब तें सतीं जाइ तनु त्यागा। तब तें सिव मन भयउ बिरागा॥
जपहिं सदा रघुनायक नामा। जहँ तहँ सुनहिं राम गुन ग्रामा॥

जेव्हापासून सतीने (पित्याच्या घरी जाऊन) शरीराचा त्याग केला तेव्हापासून शिवजींच्या मनात वैराग्य निर्माण झाले. ते सदा श्रीरघुनाथजींच्या नामाचा जप करू लागले आणि जिथे-तिथे श्रीरामचंद्रजींच्या गुणांच्या कथा श्रवण करू लागले. ॥ ४ ॥

दो०— **चिदानंद सुखधाम सिव बिगत मोह मद काम।**
बिचरहिं महि धरि हृदयँ हरि सकल लोक अभिराम॥ ७५ ॥

चिदानंद, सुखधाम, मोह, मद आणि कामनारहित शिवजी संपूर्ण लोकांना आनंद देणाऱ्या भगवान् श्रीहरिला (श्रीरामचंद्रजींना) हृदयात धारण करून (भगवंताच्या ध्यानात मस्त होऊन) पृथ्वीवर विचरण करू लागले. ॥ ७५ ॥

कतहुँ मुनिन्ह उपदेसहिं ग्याना। कतहुँ राम गुन करहिं बखाना॥
जदपि अकाम तदपि भगवाना। भगत बिरह दुख दुखित सुजाना॥

ते कुठे मुनींना ज्ञानाचा उपदेश करायचे तर कुठे श्रीरामचंद्रजींच्या गुणांचे वर्णन करायचे. जरी सुजाण शिवजी निष्काम आहेत तरीही ते आपल्या भक्ताच्या (सतीच्या) वियोग दु:खाने दु:खी आहेत. ॥ १ ॥

एहि बिधि गयउ कालु बहु बीती। नित नै होइ राम पद प्रीती॥
नेमु प्रेमु संकर कर देखा। अबिचल हृदयँ भगति कै रेखा॥

अशा प्रकारे फार काळ गेला. श्रीरामचंद्रजींच्या चरणी नित्य नवी प्रीती होत आहे. शंकरजींचे (कठोर) नियम, (अनन्य) प्रेम आणि त्यांच्या अंत:करणात असलेल्या भक्तीच्या अटळ निश्चयाला (जेव्हा) श्रीरामचंद्रजींनी पाहिले. ॥ २ ॥

प्रगटे रामु कृतग्य कृपाला। रूप सील निधि तेज बिसाला॥
बहु प्रकार संकरहि सराहा। तुम्ह बिनु अस ब्रतु को निरबाहा॥

तेव्हा कृतज्ञ (उपकार मानणारे), कृपाळू, रूप आणि शील यांचे भांडार महान तेज:पुंज भगवान् श्रीरामचंद्रजी प्रकट झाले. त्यांनी पुष्कळ प्रकाराने शिवजींची स्तुती केली आणि म्हटले की, तुमच्याशिवाय असे (कठीण) व्रत कोण पूर्ण करू शकतो? ॥ ३ ॥

बहुबिधि राम सिवहि समुझावा। पारबती कर जन्मु सुनावा॥
अति पुनीत गिरिजा कै करनी। बिस्तर सहित कृपानिधि बरनी॥

श्रीरामचंद्रजींनी अनेक प्रकारांनी शिवजींना समजावून सांगितले आणि पार्वतीची जन्म-कथा सांगितली. कृपानिधान श्रीरामचंद्रजींनी पार्वतीजीच्या अत्यंत पवित्र तपाचे विस्तारपूर्वक वर्णन केले. ॥ ४ ॥

दो०— **अब बिनती मम सुनहु सिव जौं मो पर निज नेहु।**
जाइ बिबाहहु सैलजहि यह मोहि मागें देहु॥ ७६॥

(नंतर त्यांनी शिवजींना म्हटले—) हे शिवजी! जर माझ्यावर तुमचा स्नेह असेल तर आता आपण माझी विनंती ऐका. आपण पार्वतीशी विवाह करावा ही माझी मागणी पूर्ण करा. ॥ ७६ ॥

कह सिव जदपि उचित अस नाहीं। नाथ बचन पुनि मेटि न जाहीं॥
सिर धरि आयसु करिअ तुम्हारा। परम धरमु यह नाथ हमारा॥

शिवजींनी म्हटले— जरी असे करणे उचित नाही परंतु स्वामींची आज्ञाही मोडता येत नाही. हे नाथ! आपली आज्ञा शिरोधार्य करून त्याचे पालन करणे हाच माझा परम धर्म आहे. ॥ १ ॥

मातु पिता गुर प्रभु कै बानी। बिनहिं बिचार करिअ सुभ जानी॥
तुम्ह सब भाँति परम हितकारी। अग्या सिर पर नाथ तुम्हारी॥

माता, पिता, गुरू आणि स्वामी यांची आज्ञा कोणताही विचार न करता शुभ समजून पाळावी (मानावी). शिवाय आपण तर सर्व प्रकाराने माझे हितकारी आहात. हे नाथ! आपली आज्ञा मला शिरोधार्य आहे. ॥ २ ॥

प्रभु तोषेउ सुनि संकर बचना। भक्ति बिबेक धर्म जुत रचना॥
कह प्रभु हर तुम्हार पन रहेऊ। अब उर राखेहु जो हम कहेऊ॥

शिवजींचे भक्ती, ज्ञान आणि धर्मयुक्त वचन ऐकून प्रभू श्रीरामचंद्रजी संतुष्ट झाले. प्रभू म्हणाले—हे शंकरजी! तुमची प्रतिज्ञा पूर्ण झाली. आता मी जे सांगितले ती गोष्ट हृदयात धारण करा. ॥ ३ ॥

अंतरधान भए अस भाषी। संकर सोइ मूरति उर राखी॥
तबहिं सप्तरिषि सिव पहिं आए। बोले प्रभु अति बचन सुहाए॥

अशाप्रकारे सांगून प्रभू श्रीरामचंद्रजी अंतर्धान झाले. शिवजींनी त्यांची ती मूर्ती आपल्या हृदयात धारण केली. त्याच काळात शिवजीकडे सप्तर्षी आले. शिवजी त्यांना अत्यंत मधुर शब्दात म्हणाले— ॥ ४ ॥

दो०— **पारबती पहिं जाइ तुम्ह प्रेम परिच्छा लेहु।**
गिरिहि प्रेरि पठएहु भवन दूरि करेहु संदेहु॥ ७७॥

आपण सर्वजण पार्वतीकडे जाऊन तिच्या प्रेमाची परीक्षा घ्या आणि हिमाचलास सांगून (त्यास पार्वतीला घरी परत घेऊन जाण्यासाठी पाठवावे) पार्वतीला घरी पाठवावे आणि पार्वतीचा संदेह नाहीसा करावा. ॥ ७७ ॥

रिषिन्ह गौरि देखी तहँ कैसी। मूरतिमंत तपस्या जैसी॥
बोले मुनि सुनु सैलकुमारी। करहु कवन कारन तपु भारी॥

ऋषींनी (तेथे जाऊन) पार्वतीला पाहिले तर जणू मूर्तिमान तपश्चर्याच! ऋषि म्हणाले—हे शैल-कुमारी ऐक! तू कशासाठी एवढे तप करीत आहेस? ॥ १ ॥

केहि अवराधहु का तुम्ह चहहू। हम सन सत्य मरमु किन कहहू॥
कहत बचन मनु अति सकुचाई। हँसिहहु सुनि हमारि जड़ताई॥

तू कोणाची आराधना करीत आहेस आणि तुला काय पाहिजे आहे? तू आम्हाला तुझ्या अंत:करणातला खरा भाव का सांगत नाहीस? (पार्वती म्हणाली—) माझा भाव तुम्हाला सांगण्यात मला संकोच होत आहे कारण तुम्ही माझा मूर्खपणा ऐकून हसाल. ॥ २ ॥

मनु हठ परा न सुनइ सिखावा। चहत बारि पर भीति उठावा॥
नारद कहा सत्य सोइ जाना। बिनु पंखन्ह हम चहहिं उड़ाना॥

मनाने हट्ट पकडला आहे, ते उपदेश ऐकत नाही आणि पाण्यावर भिंत बांधू इच्छिते. नारदजींनी जे मला सांगितले ते सत्य मानून मी पंखाशिवाय आकाशात विहार करू इच्छिते. ॥३ ॥

देखहु मुनि अबिबेकु हमारा। चाहिअ सदा सिवहि भरतारा॥

हे ऋषींनो! तुम्ही माझे अज्ञान तर पहा की, मी शिवजींनाच पती बनविण्याची सतत इच्छा करते. ॥ ४ ॥

दो०— **सुनत बचन बिहसे रिषय गिरिसंभव तव देह।**
नारद कर उपदेसु सुनि कहहु बसेउ किसु गेह॥ ७८॥

पार्वतीचे वचन ऐकताच ऋषिलोक हसले आणि म्हणाले—तुझे शरीर पर्वतापासूनच तर उत्पन्न झाले आहे! बरे सांग तर खरे, नारदाचा उपदेश ऐकून आजपर्यंत कुणाचा प्रपंच ठीक झाला? ॥ ७८ ॥

दच्छसुतन्ह उपदेसेन्हि जाई। तिन्ह फिरि भवनु न देखा आई॥
चित्रकेतु कर घरु उन घाला। कनककसिपु कर पुनि अस हाला॥

त्यांनी दक्षाच्या पुत्रांना उपदेश केला होता त्यामुळे त्या मुलांनी पुन्हा घराचे तोंडही पाहिले नाही. चित्रकेतूचे घर नारदानेच बरबाद केले. पुढे तीच स्थिती हिरण्यकश्यपूची झाली. ॥ १ ॥

नारद सिख जे सुनहिं नर नारी। अवसि होहिं तजि भवनु भिखारी॥
मन कपटी तन सज्जन चीन्हा। आपु सरिस सबही चह कीन्हा॥

जे स्त्री-पुरुष नारदांचा उपदेश ऐकतात ते घरादाराचा त्याग करून निश्चितच भिकारी होतात. त्यांचे मन तर कपटी आहे आणि शरीरावर मात्र सज्जनपणाची चिन्हे आहेत. ते सर्वांना आपल्यासारखे बनवू इच्छितात. ॥ २ ॥

तेहि कें बचन मानि बिस्वासा। तुम्ह चाहहु पति सहज उदासा॥
निर्गुन निलज कुबेष कपाली। अकुल अगेह दिगंबर ब्याली॥

त्यांच्या वचनांवर विश्वास ठेवून तू अशा पतीची इच्छा करतेस जो स्वाभाविकच उदासीन, गुणहीन,निर्लज्ज, वाईट वेष धारण करणारा, नरमुंडाची माळ घालणारा, कुलहीन, घरदार नसलेला, नग्न आणि शरीरावर सर्पांना धारण करणारा असा आहे. ॥ ३ ॥

कहहु कवन सुखु अस बरु पाएँ। भल भूलिहु ठग के बौराएँ॥
पंच कहें सिवँ सती बिबाही। पुनि अवडेरि मराएन्हि ताही॥

सांग बरे, अशा वराच्या प्राप्तीने तुला काय सुख मिळेल, तू त्या लबाडाच्या (नारदाच्या) बहकाविण्यात फसलीस. पूर्वी पंचांच्या सांगण्याने शिवजीने सतीशी विवाह केला होता परंतु पुढे तिचा त्याग करून तिला ठार करविले. ॥ ४ ॥

दो०— **अब सुख सोवत सोचु नहिं भीख मागि भव खाहिं।**
सहज एकाकिन्ह के भवन कबहुँ कि नारि खटाहिं॥ ७९ ॥

आता शिवजीला कसलीच चिंता राहिली नाही, भीक मागून खातात आणि सुखाने झोपतात. अशा स्वाभाविकच एकटे राहणाऱ्याच्या घरी कधी स्त्रीया टिकतील काय? ॥ ७९ ॥

अजहूँ मानहु कहा हमारा। हम तुम्ह कहुँ बरु नीक बिचारा॥
अति सुंदर सुचि सुखद सुसीला। गावहिं बेद जासु जस लीला॥

आता तरी आमचे म्हणणे ऐक, आम्ही तुझ्यासाठी उत्तम वर पाहिला आहे. तो फारच सुंदर, पवित्र, सुखदायक आणि सुशील आहे, ज्याचे यश आणि लीला वेद गातात. ॥ १ ॥

दूषन रहित सकल गुन रासी। श्रीपति पुर बैकुंठ निवासी॥
अस बरु तुम्हहि मिलाउब आनी। सुनत बिहसि कह बचन भवानी॥

तो दोषरहित, सर्व सद्गुणांची राशी, लक्ष्मीचा स्वामी आणि वैकुंठपुरीत राहणारा आहे. आम्ही अशा सुंदर वराशी तुझी भेट घालून देऊ. हे ऐकताच पार्वती हसून म्हणाली— ॥ २ ॥

सत्य कहेहु गिरिभव तनु एहा। हठ न छूट छूटै बरु देहा॥
कनकउ पुनि पषान तें होई। जारेहुँ सहजु न परिहर सोई॥

तुम्ही जे म्हणालात की, हे माझे शरीर पर्वतापासून उत्पन्न झाले आहे ते सत्यच आहे. म्हणून शरीर जरी सुटले तरी हट्ट सुटणार नाही. सोनेही दगडापासूनच उत्पन्न होते, ते सोने जाळले तरी आपल्या स्वभावाला (सुवर्णत्वाला) सोडत नाही. ॥ ३ ॥

नारद बचन न मैं परिहरऊँ। बसउ भवनु उजरउ नहिं डरऊँ॥
गुर कें बचन प्रतीति न जेही। सपनेहुँ सुगम न सुख सिधि तेही॥

म्हणून मी नारदजींच्या वचनांना सोडू शकत नाही. मग माझे घर वसो अथवा उजाडो ह्याची मला पर्वा नाही. ज्याचा गुरुवचनावर विश्वास नाही त्याला सुख आणि सिद्धी स्वप्नात सुद्धा सुगम होणार नाहीत. ॥ ४ ॥

दो०— **महादेव अवगुन भवन बिष्नु सकल गुन धाम।**
जेहि कर मनु रम जाहि सन तेहि तेही सन काम॥ ८०॥

समजा, महादेवजी अवगुणांचे भवन आहेत आणि विष्णु समस्त सद्गुणांचे धाम आहेत. परंतु ज्याचे मन ज्याच्यात रमले त्याचे त्याच्याशीच काम आहे. ॥ ८० ॥

जौं तुम्ह मिलतेहु प्रथम मुनीसा। सुनतिउँ सिख तुम्हारि धरि सीसा॥
अब मैं जन्मु संभु हित हारा। को गुन दूषन करै बिचारा॥

हे मुनीश्वरांनो! तुम्ही जर मला यापूर्वी भेटला असता तर मी तुमचा उपदेश शिरसावंद्य मानला असता. परंतु आता तर मी माझा जन्म शिवजींचरणी समर्पण करून बसले आहे. अशा परिस्थितीत गुण-दोषांचा विचार कोणी करावा? ॥ १ ॥

जौं तुम्हरे हठ हृदयँ बिसेषी। रहि न जाइ बिनु किएँ बरेषी॥
तौ कौतुकिअन्ह आलसु नाहीं। बर कन्या अनेक जग माहीं॥

जर आपल्या मनाचा फारच हट्ट असेल आणि विवाहाची गोष्ट (सोयरीकी) केल्याविना आपणाला राहवत नसेल तर संसारात वर आणि वधू पुष्कळ आहेत. चेष्टा करणाऱ्याला आळस तर नसतोच. (कोणा दुसऱ्याला गाठा.) ॥ २ ॥

जन्म कोटि लगि रगर हमारी। बरउँ संभु न त रहउँ कुआरी॥
तजउँ न नारद कर उपदेसू। आपु कहहिं सत बार महेसू॥

माझा तर कोट्यवधी जन्मापर्यंत असाच हट्ट राहील की, जर वरील तर शिवजीलाच वरील नाही तर कुमारीच राहीन. स्वत: शिवजी जरी शंभर वेळा म्हणाले, तरीही मी नारदांच्या उपदेशाचा त्याग करणार नाही. ॥ ३ ॥

मैं पा परउँ कहइ जगदंबा। तुम्ह गृह गवनहु भयउ बिलंबा॥
देखि प्रेमु बोले मुनि ग्यानी। जय जय जगदंबिके भवानी॥

जगज्जननी पार्वती नंतर म्हणाली की, मी आपल्या पाया पडते, आपण आपल्या घरी परत जावे. कारण पुष्कळ उशीर झाला आहे. (शिवजीचरणी पार्वतीजीचे असे) प्रेम पाहून ज्ञानी मुनी म्हणाले— हे जगज्जननी! तुझा जयजयकार असो, जयजयकार असो. ॥ ४ ॥

दो०— **तुम्ह माया भगवान सिव सकल जगत पितु मातु।**
नाइ चरन सिर मुनि चले पुनि पुनि हरषत गातु॥ ८१॥

तू माया आहेस आणि शिवजी भगवान् आहेत. तुम्ही दोघे समस्त जगताचे माता-पिता आहात. (असे म्हणून) मुनी पार्वतीजीच्या चरणांवर नतमस्तक होऊन परतले. त्यांची शरीरे वारंवार पुलकित होत होती. ॥ ८१ ॥

जाइ मुनिन्ह हिमवंतु पठाए। करि बिनती गिरजहिं गृह ल्याए॥
बहुरि सप्तरिषि सिव पहिं जाई। कथा उमा कै सकल सुनाई॥

मुनींनी हिमाचलाकडे जाऊन त्यास पार्वतीकडे पाठवले आणि त्याने तिला विनंती करून घरी आणले. पुढे सप्तर्षींनी शिवजीजवळ जाऊन त्यांना पार्वतीचा सर्व वृत्तांत सांगितला. ॥ १ ॥

भए मगन सिव सुनत सनेहा। हरषि सप्तरिषि गवने गेहा॥
मनु थिर करि तब संभु सुजाना। लगे करन रघुनायक ध्याना॥

पार्वतीजीचे प्रेम ऐकताच शिवजी आनंदमग्न झाले. सप्तर्षी प्रसन्न होऊन आपल्या घरी (ब्रह्मलोकात) निघून गेले. त्यानंतर सुजाण शंकरजी आपल्या मनाला स्थिर करून श्रीरघुनाथजींचे ध्यान करू लागले. ॥ २ ॥

तारकु असुर भयउ तेहि काला। भुज प्रताप बल तेज बिसाला॥
तेहिं सब लोक लोकपति जीते। भए देव सुख संपति रीते॥

त्याच काळात तारक नावाचा राक्षस उत्पन्न झाला. ज्याचे बाहुबल, प्रताप आणि तेज फार वाढले होते. त्याने सर्व लोक आणि लोकपालांना जिंकले. त्यामुळे सर्व देवता सुख आणि संपत्ति-रहित झाल्या. ॥ ३ ॥

अजर अमर सो जीति न जाई। हारे सुर करि बिबिध लराई॥
तब बिरंचि सन जाइ पुकारे। देखे बिधि सब देव दुखारे॥

तो अजर-अमर होता म्हणून तो कोणाकडून जिंकला जात नव्हता. त्याच्याशी अनेक प्रकाराने

संत संभु श्रीपति अपबादा । सुनिअ जहाँ तहँ असि मरजादा ॥
काटिअ तासु जीभ जो बसाई । श्रवन मूदि न त चलिअ पराई ॥

जेथे संतांची, शिवांची किंवा भगवान विष्णूंची निंदा कानी पडते, तेथे असा नियम आहे की, शक्य असेल तर निंदा करणाऱ्याची जीभ छाटावी आणि नसेल तर कान बंद करून तेथून निघून जावे. ॥ २ ॥

जगदातमा महेसु पुरारी । जगत जनक सब के हितकारी ॥
पिता मंदमति निंदत तेही । दच्छ सुक्र संभव यह देही ॥

त्रिपुरासुराला मारणारे भगवान महेश्वर हे संपूर्ण जगाचे आत्मा आहेत. ते जगत्पिता आहेत आणि सर्वांचे कल्याण करणारे आहेत. माझा मूर्ख पिता त्यांची निंदा करीत आहे आणि माझा हा देह दक्षाच्याच वीर्यापासून बनला आहे. ॥ ३ ॥

तजिहउँ तुरत देह तेहि हेतू । उर धरि चंद्रमौलि बृषकेतू ॥
अस कहि जोग अगिनि तनु जारा । भयउ सकल मख हाहाकारा ॥

म्हणून मी आपल्या भाळी चंद्रमा धारण करणाऱ्या वृषध्वज शिवांचे मनात स्मरण करून हे माझे शरीर विसर्जित करते.'' असे म्हणत सतीने योगाग्नीने आपले शरीर भस्म करून टाकले. संपूर्ण यज्ञशाळेत हाहाकार माजला. ॥ ४ ॥

दो०—सती मरनु सुनि संभु गन लगे करन मख खीस।
जग्य बिधंस बिलोकि भृगु रच्छा कीन्हि मुनीस ॥ ६४ ॥

सतीचा देहत्याग ऐकून शिवांचे गण यज्ञाचा विध्वंस करू लागले, तेव्हा भृगू ऋषींनी यज्ञाचे रक्षण केले. ॥ ६४ ॥

समाचार सब संकर पाए । बीरभद्रु करि कोप पठाए ॥
जग्य बिधंस जाइ तिन्ह कीन्हा । सकल सुरन्ह बिधिवत फलु दीन्हा ॥

ही वार्ता शिवांना कळली, तेव्हा त्यांनी रागारागाने वीरभद्राला पाठविले. त्याने जाऊन यज्ञाचा विध्वंस केला आणि सर्व देवांना यथोचित प्रायश्चित्त दिले. ॥ १ ॥

भै जगबिदित दच्छ गति सोई । जसि कछु संभु बिमुख कै होई ॥
यह इतिहास सकल जग जानी । ताते मैं संछेप बखानी ॥

शिव-द्रोह्याची जी गती होते, ती दक्षाच्या वाट्याला आली. हा इतिहास सर्व जगाला ठाऊक आहे, म्हणून मी तो येथे थोडक्यात सांगितला आहे. ॥ २ ॥

सतीं मरत हरि सन बरु मागा । जनम जनम सिव पद अनुरागा ॥
तेहि कारन हिमगिरि गृह जाई । जनमीं पारबती तनु पाई ॥

तदपि करब मैं काजु तुम्हारा। श्रुति कह परम धरम उपकारा॥
पर हित लागि तजइ जो देही। संतत संत प्रसंसहिं तेही॥

तरीही मी तुमचे काम करीन. कारण वेद दुसऱ्यावर उपकार करणे हा परमधर्म मानतात. जो दुसऱ्याच्या हितासाठी आपले शरीर अर्पण करतो त्याची महत्ता संत सदा वर्णन करतात. ॥ १ ॥

अस कहि चलेउ सबहि सिरु नाई। सुमन धनुष कर सहित सहाई॥
चलत मार अस हृदयँ बिचारा। सिव बिरोध ध्रुव मरनु हमारा॥

असे म्हणून आणि सर्वांना वंदन करून कामदेव आपले फुलाचे धनुष्य हातात घेऊन वसंत इत्यादि साहाय्यकांना घेऊन निघाला. तिकडे निघाल्यावर कामदेवाने मनात विचार केला की, शिवजीबरोबर विरोध करण्यात माझे निश्चित मरण होणार आहे. ॥ २ ॥

तब आपन प्रभाउ बिस्तारा। निज बस कीन्ह सकल संसारा॥
कोपेउ जबहिं बारिचरकेतू। छन महुँ मिटे सकल श्रुति सेतू॥

त्याने त्यावेळी आपला प्रभाव पसरविला आणि संपूर्ण जगताला आपल्या वश करून घेतले. ज्यावेळी त्या मासळीच्या चिन्हाची ध्वजा असणाऱ्या कामदेवाने आपला प्रभाव दाखविला तेव्हा क्षणभरातच सर्व वेदमर्यादा समाप्त झाली. ॥ ३ ॥

ब्रह्मचर्ज ब्रत संजम नाना। धीरज धरम ग्यान बिग्याना॥
सदाचार जप जोग बिरागा। सभय बिबेक कटकु सबु भागा॥

ब्रह्मचर्य, नियम, नाना प्रकारचे संयम, धैर्य, धर्म, ज्ञान, विज्ञान, सदाचार, जप, योग, वैराग्य इत्यादी विवेकाचे सर्व सैन्य भिऊन पळाले. ॥ ४ ॥

छं०— **भागेउ बिबेकु सहाय सहित सो सुभट संजुग महि मुरे।**
सदग्रंथ पर्बत कंदरन्हि महुँ जाइ तेहि अवसर दुरे॥
होनिहार का करतार को रखवार जग खरभरु परा।
दुइ माथ केहि रतिनाथ जेहि कहुँ कोपि कर धनु सरु धरा॥

विवेक आपल्या सहकाऱ्यांसह पळून गेला. त्याच्या योद्ध्यांनी रणभूमीत पाठ दाखविली. त्यावेळी ते सर्व सद्ग्रंथरूपी पर्वतांच्या गुफेमध्ये जाऊन लपले. (अर्थात् ज्ञान, वैराग्य, संयम, नियम, सदाचारादी ग्रंथातच लिहिलेले राहिले, त्यांचे आचरण सुटले.) संपूर्ण जगतात खळबळ माजली. (आणि सर्व म्हणू लागले-) हे विधाता! आता काय होणार आहे, आमचे रक्षण कोण करील? असा प्रबल कोण आहे, ज्याच्यासाठी रतीच्या पतीने (कामदेवाने) संतापाने हातात धनुष्य-बाण घेतला आहे?

दो०— **जे सजीव जग अचर चर नारि पुरुष अस नाम।**
ते निज निज मरजाद तजि भए सकल बस काम॥ ८४॥

जगतात चर अचर जितके प्राणी स्त्री-पुरुष संज्ञेचे होते ते सर्व आपापल्या मर्यादा सोडून कामाधीन झाले. ॥ ८४ ॥

सब के हृदयँ मदन अभिलाषा । लता निहारि नवहिं तरु साखा ॥
नदीं उमगि अंबुधि कहुँ धाईं । संगम करहिं तलाव तलाईं ॥

सर्वांच्या हृदयात कामेच्छा निर्माण झाली. वेलीला पाहून वृक्षांच्या फांद्या वेलींना आलिंगन देण्यासाठी खाली झुकू लागल्या. नद्या दुथडी भरून समद्राकडे धावू लागल्या आणि तलाव व लहान तळी हे एकमेकात मिसळू लागले. ॥ १ ॥

जहँ असि दसा जड़न्ह कै बरनी । को कहि सकइ सचेतन करनी ॥
पसु पच्छी नभ जल थल चारी । भए काम बस समय बिसारी ॥

जर जडाची (वृक्ष, नदी इत्यादीची) अशी अवस्था झाली तर चेतन जीवांची अवस्था कशी झाली असेल कोण सांगू शकेल? आकाश, जल आणि पृथ्वीवर विचरण करणारे सर्व पशु-पक्षी (आपल्या संयोगाच्या) समयाचे भान विसरून कामांध झाले. ॥ २ ॥

मदन अंध ब्याकुल सब लोका । निसि दिनु नहिं अवलोकहिं कोका ॥
देव दनुज नर किंनर ब्याला । प्रेत पिसाच भूत बेताला ॥

सर्व लोक कामांध होऊन व्याकूळ झाले. चकवा-चकवी रात्र-दिवस पाहत नाहीत. देव, दैत्य, मानव, किन्नर, सर्प, प्रेत, पिशाच, भूत, वेताळ— ॥ ३ ॥

इन्ह कै दसा न कहेउँ बखानी । सदा काम के चेरे जानी ॥
सिद्ध बिरक्त महामुनि जोगी । तेपि कामबस भए बियोगी ॥

हे तर सदा सर्वकाळ कामाचे गुलामच आहेत, असे समजून मी यांच्या अवस्थेचे वर्णन केले नाही. सिद्ध, विरक्त, महामुनी आणि महान योगी सुद्धा कामाधीन होऊन योगरहित आणि स्त्री-विरही झाले. ॥ ४ ॥

छं०— भए कामबस जोगीस तापस पावँरन्हि की को कहै ।
देखहिं चराचर नारिमय जे ब्रह्ममय देखत रहे ॥
अबला बिलोकहिं पुरुषमय जगु पुरुष सब अबलामयं ।
दुइ दंड भरि ब्रह्मांड भीतर कामकृत कौतुक अयं ॥

जिथे योगीश्वर आणि तपस्वी सुद्धा कामाधीन झाले तिथे पामर मानवाची काय कथा? जे सर्व चराचर जगताला ब्रह्ममय पाहत होते ते आता त्याला स्त्रीमय पाहू लागले. स्त्रीया सर्व संसाराला पुरुषमय पाहू लागल्या आणि पुरुष त्याला स्त्रीमय पाहू लागले. दोन घडीपर्यंत संपूर्ण ब्रह्मांडात काम देवरचित हे कौतुक (तमाशा) चालू राहिले.

सो०— **धरी न काहूँ धीर सब के मन मनसिज हरे।**
जे राखे रघुबीर ते उबरे तेहि काल महुँ॥ ८५॥

कोणाच्याही मनात धैर्य राहिले नाही. कामदेवाने सर्वांची मने हरण केली. श्रीरामचंद्रजींनी ज्यांचे रक्षण केले केवळ तेच त्या काळात वाचले गेले. ॥ ८५ ॥

उभय घरी अस कौतुक भयऊ। जौ लगि कामु संभु पहिं गयऊ॥
सिवहि बिलोकि ससंकेउ मारू। भयउ जथाथिति सबु संसारू॥

दोन घडीपर्यंत असा तमाशा चालू राहिला. तोपर्यंत कामदेव शिवजीजवळ पोहचला. शिवजीला पाहून कामदेव घाबरला तेव्हा सर्व संसार पूर्व स्थितीत स्थिर झाला. ॥ १ ॥

भए तुरत सब जीव सुखारे। जिमि मद उतरि गएँ मतवारे॥
रुद्रहि देखि मदन भय माना। दुराधरष दुर्गम भगवाना॥

सर्व जीव तात्काळ असे सुखी झाले जसे नशा घेतलेले लोक नशा उतरल्यावर सुखी होतात. दुराधर्ष (ज्यांना पराजित करणे अत्यंत कठीण आहे) आणि दुर्गम (ज्यांना पूर्ण ओळखणे कठीण आहे) भगवान् (संपूर्ण ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान आणि वैरागयरूपी सहा ईश्वरीय गुणांनी युक्त) रुद्र (महाभयंकर) शिवजीला पाहून कामदेव भयभीत झाला. ॥ २ ॥

फिरत लाज कछु करि नहिं जाई। मरनु ठानि मन रचेसि उपाई॥
प्रगटेसि तुरत रुचिर रितुराजा। कुसुमित नव तरु राजि बिराजा॥

परत जाण्यात लाज वाटत आहे आणि काहीच करता येत नाही. शेवटी मनामध्ये मरण्याचा निश्चय करून त्यांने उपाय रचला. तात्काळ सुंदर ऋतुराज वसंताला प्रगट केले. फुललेल्या नव-नवीन वृक्षांच्या ओळी सुशोभित झाल्या. ॥ ३ ॥

बन उपबन बापिका तड़ागा। परम सुभग सब दिसा बिभागा॥
जहँ तहँ जनु उमगत अनुरागा। देखि मुएहुँ मन मनसिज जागा॥

वन, उपवन, विहीर-तलाव आणि सर्व दिशांचे विभाग फारच सुंदर दिसू लागले. जिकडे-तिकडे जणू प्रेमच ओसंडले आहे, ज्याला पाहून मेलेल्या मनात सुद्धा काम निर्माण झाला. ॥ ४ ॥

छं०— **जागइ मनोभव मुएहुँ मन बन सुभगता न परै कही।**
सीतल सुगंध सुमंद मारुत मदन अनल सखा सही॥
बिकसे सरन्हि बहु कंज गुंजत पुंज मंजुल मधुकरा।
कलहंस पिक सुक सरस रव करि गान नाचहिं अपछरा॥

मेलेल्या मनात सुद्धा कामदेव जागा होऊ लागला. वनाचे सौंदर्य तर अवर्णनीय होते. कामरूपी अग्निचा खरा मित्र शीतल-मंद-सुगंधित वायू वाहत होता. सरोवरात अनेक कमळे विकसित झालेली

होती, ज्यांच्यावर सुंदर भुंग्यांचे समूह गुंजारव करू लागले. राजहंस, कोकीळ आणि पोपट मधुर बोल बोलू लागले आणि अप्सरा गायन करत नाचू लागल्या.

छं०— सकल कला करि कोटि बिधि हारेउ सेन समेत।
चली न अचल समाधि सिव कोपेउ हृदयनिकेत॥ ८६॥

कामदेव आपल्या सेनेसह कोट्यवधी प्रकारच्या सर्व कला (उपाय) करून हरला. परंतु शिवजींची अचल समाधी भंग झाली नाही. तेव्हा कामदेवाला क्रोध आला.॥ ८६॥

देखि रसाल बिटप बर साखा। तेहि पर चढ़ेउ मदनु मन माखा॥
सुमन चाप निज सर संधाने। अति रिस ताकि श्रवन लगि ताने॥

आंब्याच्या झाडाच्या एका सुंदर फांदीवर मनात अत्यंत क्रोधित होऊन कामदेव चढला. त्याने पुष्प धनुष्यावर आपले (पाचही) बाण चढवले आणि अत्यंत क्रोधाने (लक्ष्याकडे) एकाग्र होऊन ते कानापर्यंत ताणले.॥ १॥

छाड़े बिषम बिसिख उर लागे। छूटि समाधि संभु तब जागे॥
भयउ ईस मन छोभु बिसेषी। नयन उघारि सकल दिसि देखी॥

कामदेवाने तीक्ष्ण पाच बाण सोडले, जे शिवजींच्या हृदयात लागले. तेव्हा त्यांची समाधी भंग झाली आणि ते जागे झाले. ईश्वराच्या (शिवजींच्या) मनात फार क्षोभ झाला. त्यांनी डोळे उघडून चहूकडे पाहिले.॥ २॥

सौरभ पल्लव मदनु बिलोका। भयउ कोपु कंपेउ त्रैलोका॥
तब सिवँ तीसर नयन उघारा। चितवत कामु भयउ जरि छारा॥

जेव्हा त्यांनी आंब्याच्या पानांत (लपलेल्या) कामदेवाला पाहिले तेव्हा त्यांना फार राग आला, त्यामुळे तिन्ही लोकात थरकाप उडाला. त्यावेळी शिवजीने तीसरा डोळा उघडला. त्या डोळ्याने पाहताच कामदेव जळून भस्म झाला.॥ ३॥

हाहाकार भयउ जग भारी। डरपे सुर भए असुर सुखारी॥
समुझि कामसुख सोचहिं भोगी। भए अकंटक साधक जोगी॥

जगतात चहूकडे हाहा:कार माजला. देवता घाबरल्या, दैत्य सुखी झाले. भोगीलोक कामसुखाचे स्मरण करून चिंता करू लागले आणि साधक योगी निष्कंटक झाले॥ ४॥

छं०— जोगी अकंटक भए पति गति सुनत रति मुरुछित भई।
रोदति बदति बहु भाँति करुना करति संकर पहिं गई॥
अति प्रेम करि बिनती बिबिध बिधि जोरि कर सन्मुख रही।
प्रभु आसुतोष कृपाल सिव अबला निरखि बोले सही॥

योगी निष्कंटक झाले. कामदेवाची पत्नी रती आपल्या पतीची झालेली ही दशा ऐकताच मूर्च्छित पडली. रडत ओरडत अनेक प्रकाराने करुणा भाकत ती शिवजीजवळ गेली. अत्यंत प्रेमाने अनेक प्रकारची विनंती करीत हात जोडून समोर उभी राहिली. शीघ्र प्रसन्न होणाऱ्या कृपाळू शिवजीने अबलेला (असाहाय्य स्त्रीला) पाहून सुंदर (तिला सांत्वना देणारे) वचन उद्गारले—

दो०— **अब तें रति तव नाथ कर होइहि नामु अनंगु।**
बिनु बपु ब्यापिहि सबहि पुनि सुनु निज मिलन प्रसंगु॥ ८७॥

हे रती! आतापासून तुझ्या स्वामीचे नाव अनंग राहील. तो विना शरीराचाच सर्वांना व्यापेल. आता तू आपल्या पतीला प्राप्त करण्याविषयी माझी गोष्ट ऐक. ॥ ८७॥

जब जदुबंस कृष्न अवतारा। होइहि हरन महा महिभारा॥
कृष्न तनय होइहि पति तोरा। बचनु अन्यथा होइ न मोरा॥

जेव्हा पृथ्वीचा मोठा भार उतरविण्यासाठी यदुवंशात श्रीकृष्णाचा अवतार होईल, तेव्हा तुझा पती त्यांच्या पुत्राच्या (प्रद्युम्नाच्या) रूपात उत्पन्न होईल. माझे हे वचन खोटे होणार नाही. ॥ १॥

रति गवनी सुनि संकर बानी। कथा अपर अब कहउँ बखानी॥
देवन्ह समाचार सब पाए। ब्रह्मादिक बैकुंठ सिधाए॥

शिवजीचे वचन ऐकून रती निघून गेली. आता दुसरी कथा वर्णन (विस्ताराने) करून सांगतो. ब्रह्मादी देवतांनी हा सर्व समाचार ऐकला आणि ते वैकुंठाला निघून गेले. ॥ २॥

सब सुर बिष्नु बिरंचि समेता। गए जहाँ सिव कृपानिकेता॥
पृथक पृथक तिन्ह कीन्हि प्रसंसा। भए प्रसन्न चंद्र अवतंसा॥

मग तेथून विष्णु आणि ब्रह्मदेवासह सर्व देवता कृपाधाम शिवजी कडे गेले. त्या सर्वांनी शिवजींची वेगवेगळी स्तुती केली, तेव्हा शशिभूषण शिवजी प्रसन्न झाले. ॥ ३॥

बोले कृपासिंधु बृषकेतू। कहहु अमर आए केहि हेतू॥
कह बिधि तुम्ह प्रभु अंतरजामी। तदपि भगति बस बिनवउँ स्वामी॥

कृपासागर शिवजी म्हणाले—हे देवतांनो! सांगा, आपण कशासाठी आलात? ब्रह्मदेव म्हणाले—हे प्रभो! आपण अंतर्यामी आहात, तरीही हे स्वामी! भक्तिवश होऊन मी आपणाला विनंती करतो. ॥४॥

दो०— **सकल सुरन्ह के हृदयँ अस संकर परम उछाहु।**
निज नयनन्हि देखा चहहिं नाथ तुम्हार बिबाहु॥ ८८॥

हे शंकर! सर्व देवतांच्या मनात असा परम उत्साह आहे की, हे नाथ! ते आपल्या नेत्रांनी आपला विवाह पाहू इच्छितात. ॥ ८८॥